सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक ३५७ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# ईकेवायसी अभावी जिल्ह्यातील पावणे दोन लाख पूरग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित

- ३ लाख ४१ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर ४०९ कोटी १९ लाख झाले जमा
- पूर व अतिवृष्टी बाधित ५ लाख २७ हजार शेतकऱ्यांना आजपर्यंत ६४९ कोटी मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

अतिवृष्टी आणि पूर स्थितीमुळे जिल्ह्यातील बाधित ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड केल्या आणि या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रूपयांची मागणी अहवालाद्वारे केली आहे. यातील सर्वच रक्कम मंजूर झाली असून, यातील ५ लाख २७ हजार १८८ शेतकऱ्यांना आजतागायत ६४८ कोटी ९५ लाख ३४ हजार ९८३ रूपये मंजूर झाले असून, त्यापैकी ३ लाख ४१ हजार ०९५ शेतकऱ्यांच्या



खात्यावर आजतागायत ४०९ कोटी १९ लाख ८४ हजार ०५२ रूपये झाले जमा झाले आणि ईकेवायसीअभावी १ लाख ७५ हजार १८१ शेतकऱ्यांचे शासनाकडून आलेले २१२ कोटी २३ लाख ४३ हजार ५८४ रूपये जमा होवू शकलेले नाहीत. उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावरही येत्या २ ते ३ दिवसात पैसे जमा होतील, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली. आजतागायत जवळपास ९० ते ९५ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे पडले असून, उर्वरित बाधित शेतकऱ्यांनाही लवकरच पैसे मिळणार आहेत. शासनाने महापुराच्या संकटात नुकसान भरपाई देण्याचा शब्द दिला होता. इतकेच नाहीतर घरांच्या बाधित कुटुंबांना दिवाळीपूर्वी पैसे मिळाले तर सर्वच पूरग्रस्तांना दिवाळीसाठी कीट वाटप केले आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळू लागल्याने महापुराच्या संकटातून खचलेल्या शेतकऱ्यांना यातून नक्कीच बळ मिळणार आहे.


जिल्ह्यातील १०३ महसूल मंडलात अतिवृष्टी झाली होती; २१ ते २३ सप्टेंबरपर्यंत महापुराचे मोठे संकट्ही ६ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर ओढवले होते. राज्य सरकारने भरपाईसाठी तीन हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी आणि महापुराने बाधित शेतकरी एकूण संख्या ७ लाख ६४ हजार १७३ इतके आहेत. (उर्वरित पान ५ वर)

### 'ॲग्रीस्टॅक'साठी जिल्हाभरात कॅम्प सुरू

जिल्ह्यातील अजून १० ते १२ टक्के लोकांचे ॲग्रीस्टॅक झाले नसल्याने त्यांच्या खात्यावर ही नुकसान भरपाईची रक्कम मिळणार नाही. त्याही शेतकऱ्यांना लवकर पैसे मिळावे यासाठी गावोगाव शिबिरे घेवून त्या शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅक करून घेतले जात आहेत. तर आम चे अधिकारी, कर्मचारी मोठमोठ्या गावात जावून प्रत्येक गावातील २० ते २५ माणसांशी चर्चा करून शासनाकडून येणारी मदत मिळते की नाही? याचीही चौकशी करून त्याचे अहवाल आमच्याकडे पाठवित आहेत.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी सोलापूर**

## विचारपुष्प




आपल्या कार्यकर्त्यांना संघकार्य करण्याचा आदेश देण्याऐवजी प्रेरणा द्या. त्यांना कार्यासाठी उत्साह द्या. आपल्याला आदेश दिला जातो आहे, असे कोणालाही चुकूनसुद्धा वाटता कामा नये, असे तुमचे वागणे, बोलणे असले पाहिजे. त्याला असे वाटले पाहिजे की हे कार्य म्हणजे आपले जीवितकार्यच आहे आणि असे वाटले की तो पूर्ण तन्मयतेने त्या कार्याला वाहून घेईल.

**- लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

## महत्त्वाचे

### बाजारात पुन्हा निराशेचे ढग

**मुंबई** : गुरुवारच्या सत्रात शेअर बाजारात निराशाजनक वातावरण राहिले. आयटी आणि ऑटो वगळता सर्व



निर्देशांक विक्रीच्या दबावाखाली राहिले. निर्देशांक ९० अंकांनी खाली येत ८३,३६९ वर तसेच निफ्टी ७८ अंकांनी घसरून २५,५२० वर बंद झाला. परकीय गुंतवणूकदारांनी शेअर्स विक्रीचा सपाटा लावल्याने बाजारात निराशा पसरली. त्याचा परिणाम म्हणून निर्देशांक तसेच निफ्टीत किरकोळ का असेना घसरण झाली. सर्वाधिक घसरण पॉवर ग्रीड्च्या शेअर्समध्ये दिसून आली. त्यापाठोपाठ इटर्नल, बजाज फायनान्स, आयसीआयसीआय बँक, एनटीपीसी यांनाही धक्का बसला. या घसरणीच्या वातावरणातही एशियन पेण्ट्स, रिलायन्स, महिंद्रा, अल्ट्राटेक सिमेंट आणि टीसीएसचे शेअर वधारले होते.

### महाराष्ट्राला थंडीची चाहूल; तापमान घटणार

**सोलापूर** : राज्यात मागील दोन ते तीन आठवड्यांपासून अवकाळी पावसाचा जोर कायम होता. परतीच्या पावसाने आणि बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या पट्ट्याने वातावरण आर्द्र आणि अस्थिर होते. पण आता अखेर राज्यभरासह सोलापूर शहर-जिल्ह्यात थंडीची चाहूल लागण्यास सुरुवात झाली आहे. भारतीय हवामान खात्याने पुढील २४ तासात तापमान घटण्याचा अंदाज वर्तवला असून मुंबईसह राज्याच्या बहुतांश भागात गारवा वाढणार आहे. ७ नोव्हेंबरपासून हवामानात स्पष्ट बदल होणार असून कोरडे आणि थंड वातावरण निर्माण होईल.

### भगवंत मैदानावर आज 'वंदे मातरम' कार्यक्रम

**बार्शी** : वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आज भगवंत मैदान येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून बार्शीकरांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसीलदार एफ. आर.शेख यांनी केले आहे.

# 'वंदे मातरम्'चा आज शतकोत्तर सुवर्ण महोत्सव

- भारतीय स्फूर्तिगीताच्या रचनेला १५० वर्षे पूर्ण
- आज देशभरात १५० ठिकाणी भरगच्च कार्यक्रम

**नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात 'वंदे मातरम्'चा नारा देत अनेक ज्ञात-अज्ञात देशभक्तांनी मृत्यूला कवटाळले. या स्फूर्तीगीताच्या रचनेला १५० वर्ष पूर्ण झाली असून यानिमित्त सरकारने देशभरात १५० ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी दिल्लीच्या इंदिरा गांधी स्टेडियममध्ये अशाच एका कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

भारताचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' यंदा १५० वे वर्धापन दिन साजरे करत आहे. केंद्र सरकारने या निमित्ताने देशभरातील १५० ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. वंदे मातरम हे सामूहिक गायले जाईल. शिवाय, सर्व कार्यक्रमांमध्ये एक ज्येष्ठ नेता, मंत्री किंवा अधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

सांस्कृतिक मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, पंतप्रधान 'वंदे मातरम्'च्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होतील. दरम्यान, जम्मू आणि काश्मीरमध्ये या कार्यक्रमांबाबत इस्लामबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. मिरवाइज उमर फारूख यांच्या नेतृत्वाखालील मुत्ताहिदा मजलिस-ए-उलेमाने केंद्रशासित प्रदेश सरकारवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सरकारने सर्व शाळांना 'वंदे मातरम्'ला समर्पित संगीत आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्याच्या आदेशावर आक्षेप घेतला आहे.

इस्लामिक संघटनेचा असा युक्तिवाद आहे की 'वंदे मातरम्' कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे बंधनकारक आहे. मुस्लिम बहुल भागात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची हिंदुत्ववादी विचारसरणी लादण्याचा हा प्रयत्न आहे. ७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये शालेय मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी, अधिकारी, निवडून आलेले प्रतिनिधी, पोलिस अधिकारी आणि डॉक्टरांसह नागरिकांचा सहभाग असेल. या कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम्'चे सामूहिक गायन समाविष्ट असेल. (वृत्तसंस्था)




### महाराष्ट्रात १५ ठिकाणी कार्यक्रम

**मुंबई** : 'वंदे मातरम्'या राष्ट्रगानाला १५० वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्ताने भारतीय जनता पार्टीतर्फे राज्यात १५ ठिकाणी कार्यक्रम होणार आहेत. केंद्रीय रस्ते बांधणी मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह राज्यातील अनेक मंत्री सहभागी होणार असल्याची माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी गुरुवारी दिली. नागपूर, अकोला, ठाणे, रायगड, पुणे, अहिल्यानगर, सातारा, जळगाव, धुळे, छत्रपती संभाजीनगर, कुलाबा (मुंबई), मानखुर्द, अंधेरी, मालाड या ठिकाणी हे कार्यक्रम होतील.

वेदमंत्राहून आम्हां वंद्य, वंदे मातरम्। (प्रासंगिक) (पान ४ वर)

### या प्रमुख ठिकाणी देखील गायिले जाईल 'वंदे मातरम्'

७ नोव्हेंबर रोजी १५० महत्त्वाच्या ठिकाणी वंदे मातरम गायले जाईल, त्यानंतर स्वदेशी उत्पादने वापरण्याची प्रतिज्ञा केली जाईल. या काळात कविता लेखन, पठण आणि चित्रकला असे अनेक इतर कार्यक्रम देखील आयोजित केले जातील. तसेच कारगिल युद्ध स्मारक, अंदमान आणि निकोबार सेल्युलर जेल, ओडिशातील स्वराज आश्रम, आग्रा येथील शहीद स्मारक उद्यान आणि वाराणसीतील नमो घाट यांचा समावेश आहे.


पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी लागलेली रांग

# बिहारमध्ये पहिल्या टप्प्यात ६४ टक्के मतदान

### तेजस्वी यादव, सम्राट चौधरींचे भाग्य ईव्हीएम बंद

**पाटणा, ६ नोव्हेंबर**

बिहार विधानसभेच्या पहिल्या टप्प्यात १२१ जागांवर गुरुवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६४.४६ टक्के मतदान झाले. पहिल्या टप्प्यात एकूण १३१४ उमेदवार रिंगणात होते.

पहिल्या टप्प्यातील उमेदवारांत ११९२ पुरुष, तर १२२ महिलांचा समावेश आहे. या टप्प्यात १०२ जागा सामान्य उमेदवारांसाठी, १९ टक्के अनुसूचित जातींसाठी राखीव आहेत. या टप्प्यात तीन कोटी ७५ लाख १३ हजार ३०२ मतदारांनी मतदानाचा अधिकार पूर्ण करावा, यासाठी निवडणूक आयोगाने साधने उपलब्ध करून दिली. यात एक कोटी ९८ लाख ३५ हजार ३२५ पुरुष, तर एक कोटी ९८ लाख ३५ हजार २१९ महिला आणि ७५८ तृतीयपंथी मतदारांचा समावेश होता.

यातील राघोपूर विधानसभा मतदारसंघात राजदचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव रिंगणात आहेत. तेजस्वी यादव यांनी याच मतदारसंघातून निवडणूक कारकीर्दीची सुरुवात केली होती. २०१५ आणि २०२० मध्ये त्यांनी या जागेवरून विजय मिळवला आहे. भाजपाने येथे मागील वेळी सतीशकुमार यांना उमेवदवारी दिली. त्यांनी २०१० मध्ये जदयूच्या तिकिटावर राबडीदेवी यांचा पराभव केला होता. (वृत्तसंस्था)

# पार्थ पवारांशी संबंधित जमीन प्रकरणात उपनिबंधक निलंबित

### ३०० कोटींच्या सौद्याच्या चौकशीचा आदेश

**पुणे, ६ नोव्हेंबर**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्याशी संबंधित ३०० कोटी रुपयांच्या जमीन व्यवहाराबद्दल महाराष्ट्र महसूल विभागाने एक उपनिबंधकाला निलंबित केले आणि या व्यवहाराची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. सात दिवसांमध्ये चौकशी समिती अहवाल सादर करणार आहे.



प्राथमिकदृष्ट्या हा प्रकार गंभीर दिसत असल्याने चौकशीचा आदेश देण्यात आला आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. असे असले तरी, या मुद्यावर विरोधकांनी महायुतीवर टीका केली आहे. सरकारी मालकीची ४० एकर महार वतन जमीन पार्थ पवार भागीदार असलेल्या अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपीला ३०० कोटी रुपयांत विकण्यात आली. यावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

नियमाप्रमाणे सरकारी जमीन खाजगी प्रतिष्ठानाला विकता येत नाही, असे त्याने सांगितले. सरकारी जमीन खाजगी प्रतिष्ठानाला कशी विकली गेली आणि नियमांनुसार सूट देण्यात आली की नाही, हे तपासण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली, अशी माहिती नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे यांनी वृत्तसंस्थेला दिली.

या जमिनीचा सात-बाऱ्याची नोंद मुंबई सरकारच्या नावे आहे. प्रॉपर्टी कार्डवर त्याच्या मालकाचे नाव असून, ती खाजगी प्रतिष्ठानाला विकण्यात आल्याचे दिसून आले. या मुद्यावर वृत्तसंस्थेने पार्थ पवार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. या नोंदणीत नाव असलेले पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील हे कंपनीचे सहमालक आहेत. (वृत्तसंस्था)

### पार्थ पवार यांच्या कंपनीवर गुन्हा दाखल?

पार्थ पवार संचालक असलेल्या अमेडिया कंपनीवर गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती समोर येत आहे. मुद्रांक शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी याबाबत माहिती दिल्याचं एका वृत्तवाहिनीकडून सांगण्यात आलं. मुद्रांक शुल्क विभागाचे सहनोंदणी महानिरीक्षर रवींद्र मुठे यांनी ही माहिती दिली आहे. या प्रकरणात सब रजिस्टरवरही गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती आहे. अमेडिया होल्डिंग्स एलएलपी कंपनीला आणि मुद्रांक शुल्क विभागाने नोटीस बजावल्याची माहिती समोर आली आहे. स्टॅम्प ड्युटी म्हणजेच मुद्रांक शुल्कची दोन टक्के रक्कम भरण्यासाठी ही नोटीस बजावण्यात आली आहे. अमेडिया कंपनीला दोन टक्के प्रमाणे सहा कोटी रुपये मुद्रांक शुल्क म्हणून भरावे यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे.

# रैना, धवनची कोट्यवधींची मालमत्ता ईडीने केली जप्त

**नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

एका कथित बेकायदेशीर ऑनलाईन बेटिंग संकेतस्थळाच्या कारवायांशी संबंधित अवैध सावकारी प्रकरणाच्या चौकशीचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) माजी क्रिकेटपटू सुरेश रैना व शिखर धवन यांची ११.१४ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे, असे अधिकृत सूत्रांनी गुरुवारी सांगितले.

१ नावाच्या ऑनलाईन बेटिंग साईटविरुद्धच्या प्रकरणात धवनची ४.५ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता आणि रैनाचा ६.६४ कोटी रुपयांचा म्युच्युअल फंड जप्त करण्याचा तात्पुरता आदेश अवैध सावकारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) जारी करण्यात आला आहे, असे सूत्रांनी सांगितले. दोन्ही माजी क्रिकेटपटूंनी १ आणि त्याच्या सरोगेट्सच्या जाहिरातीसाठी 'जाणूनबुजून' परदेशी संस्थांसोबत एंडोर्समेंट करार केले होते, असे चौकशीत आढळले आहे. या चौकशीचा भाग म्हणून ईडीने युवराज सिंग व रॉबिन उथप्पा यांसारख्या माजी क्रिकेटपटूंशिवाय अभिनेता सोनू सूद, उर्वशी रौतेला, मिमी चक्रवर्ती आणि अंकुश हाजरा यांचीही चौकशी केली आहे.


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
सोन्यासारखा आधार
टीजेएसबी सुवर्ण कर्जाची साथ

आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करा
व्याजदर 8.60%* द.सा. पासून
*अटी व शर्ती लागू
www.tjsb.bank.in | ✆ : 022 - 48897222


# स्वेच्छानिवृत्तीसंदर्भात नवीन मार्गदर्शक तत्त्व

**नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

केंद्र सरकारने शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छानिवृत्ती (व्हीआरएस) संदर्भात महत्वाची मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. पेन्शन आणि पेन्शनर कल्याण विभागाने नेशनल पेन्शन सिस्टम (एनपीएस) अंतर्गत युनिफाइड पेन्शन स्कीम (यूपीएस) निवडली आहे, अशा कर्मचाऱ्यांसाठी हे मार्गदर्शक निर्देश जारी करण्यात आले आहेत.

नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, निवडलेले केंद्रीय कर्मचारी नियम १३ अंतर्गत स्वेच्छानिवृत्तीचा लाभ घेऊ शकतात. या नियमानुसार, जर कोणत्याही कर्मचाऱ्याने २० वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल, तर त्याला स्वतःहून सेवामुक्त होण्याचा अधिकार आहे. मात्र, यासाठी कर्मचाऱ्याने आपल्या नियुक्ती प्राधिकरणाला किमान तीन महिने आधी लेखी स्वरूपात निवृत्तीची सूचना देणे अनिवार्य आहे.

म्हणजेच, २० वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर स्वेच्छानिवृत्ती घेऊ इच्छिणाऱ्यांना पूर्वसूचना देणे आवश्यक असेल. नव्या प्रणालीअंतर्गत स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना पेन्शन, ग्रॅच्युइटी, आणि इतर निवृत्तीवेतनाचे लाभ पात्रतेनुसार देण्यात येतील.

# 'मनसे'शी आघाडी नाही, काँग्रेस ठाम

### मुंबई महानगरपालिका स्वबळावर लढण्याच्या तयारीत

**मुंबई, ६ नोव्हेंबर**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मनसेसोबत आघाडी करणार नसल्याच्या भूमिकेवर काँग्रेस ठाम असून, टिळक भवन येथे काँग्रेस नेत्यांच्या बैठकीत मनसेसोबत न जाण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. महाराष्ट्र काँग्रेस याबाबत लवकरच दिल्ली हायकमांडला याबाबत कळवणार असल्याचे कळते.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, सर्वच राजकीय पक्ष जोरदार तयारीला लागले आहेत. मोठ्याप्रमाणात बैठकांचा सपाटा




लागला आहे. त्या पृष्ठभूमिवर काँग्रेस पक्षाची बैठक झाली. यात मनसे सोबत न जाण्याबाबतची मागणी एकमुखाने करण्यात आली. मुंबई महापालिका निवडणूक स्वबळावर लढल्यास जास्त जागा काँग्रेस लढू शकतो आणि जास्त जागा जिंकू शकतो, असा आशावाद यावेळी व्यक्त करण्यात आला. तर महाविकास आघाडीतील उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षासोबत आघाडी करण्यास या बैठकीत अनुकूलता दर्शविण्यात आल्याचे वृत्त आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरे गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीसोबत दिसत असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज ठाकरे महाविकास आघाडीसोबत जाणार असल्याची चर्चा सुरु होती. मात्र, आता काँग्रेसने या निवडणुकांसाठी मनसेसोबत आघाडी करणार नाही, असा पवित्रा घेतला असल्यानं आघाडीत बिघाडी होत की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. (तभा वृत्तसेवा)

### शरद पवार गट घेणार स्थानिक पातळीवर निर्णय

दरम्यान, स्थानिक परिस्थिती पाहून युती आघाडी बाबत निर्णय घ्या, अशा सूचना शरद पवार गटाच्या झालेल्या बैठकीत पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यात अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्याशी युती करण्यास हरकत नसल्याचे या बैठकीत स्पष्ट करण्यात आलेचेही सांगण्यात येत आहे. याचा अर्थ राष्ट्रवादी काँग्रेस श. प. गटाला कोणाताही पक्ष अस्पृष्य नाही. शरद पवार गटाची ही भूमिका देखील आघाडीसाठी घातकच मानली जात आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### अस्वल पकडण्यासाठी जपानने सैन्य केले तैनात

**टोकियो :** जपानने अस्वलांना पकडण्यासाठी अनेक भागात स्व-संरक्षण दल तैनात केले, जे विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की ते पर्वतीय प्रदेशात वाढत्या धोक्याचे कारण आहेत. एप्रिलपासून, देशभरात अस्वलांचे १०० हून अधिक हल्ले झाले आहेत, ज्यामध्ये १२ लोकांचा मृत्यू झाला आहे. बहुतेक मृत्यू अकिता प्रीफेक्चर आणि शेजारच्या इवाते शहरात झाले आहेत. या वर्षी अकितामध्ये अस्वल दिसण्याचे प्रमाण सहा पटीने वाढून ८,००० पेक्षा जास्त झाले आहे. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ लागल्याने, प्रांतीय राज्यपालांनी लष्कराला पाचारण केले. एसडीएफचे सैन्य काझुनो शहरात पोहोचले, जिथे ते अस्वलाला पकडण्यासाठी स्टीलचे सापळे लावण्यात स्थानिक अधिकाऱ्यांना मदत करत आहेत.

### पॅन आधारशी जोडण्यास ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत

**नवी दिल्ली :** पॅन कार्ड आधारशी जोडण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. दिलेल्या मुदतीत हे न केल्यास पॅन कार्ड निष्क्रिय केले जाईल. याचा फटका पगार ठेवी किंवा एसआयपीसारख्या गुंतवणुकीमध्येही बसू शकतो. पॅन-आधार जोडण्याची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीनेही करता येईल. त्यासाठी आयकर विभागाच्या संकेतस्थळावर जावे लागेल.

### कालमेगी वादळाचा कहर, फिलीपाईन्समध्ये आणिबाणी

**मनिला :** कालमेगी वादळामुळे झालेल्या विध्वंसाच्या पृष्ठभूमीवर फिलिपिन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड मार्कोस ज्युनियर यांनी गुरुवारी देशात आणीबाणी जाहीर केली. त्यांनी म्हटले की, वादळामुळे आतापर्यंत २४१ लोकांचा मृत्यू झाला, तर अजूनही १२७ लोक बेपत्ता आहेत. नैसर्गिक आपत्ती देशासाठी मोठे संकट आहे. मार्कोस यांनी निवेदनात म्हटले की, वादळाचा सर्वाधिक तडाखा सेबू प्रांताला बसला आहेत. कालमेगी भागात २० लाख लोक प्रभावित झाले आणि ५६ लाखांहून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवावे लागले. आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांसोबत चर्चा केल्यानंतर देशात आणीबाणी जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे सरकारला आपत्कालीन मदत निधीचे वितरण जलद करता येईल आणि अन्न साठवणूक किंवा किंमती वाढण्यापासून रोखता येईल.

### सैनिकी शाळेत सातवीच्या विद्यार्थ्याची आत्महत्या

**इटानगर :** अरुणाचल प्रदेशातील पूर्व सियांग जिल्ह्यातील निगलोक सैनिकी शाळेतील सातवीच्या विद्यार्थ्याच्या मृत्यूप्रकरणी, पीडितेची बहीण ताडू लुनियाने वरिष्ठांवर रॅगिंगचा आरोप केला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करताना त्यांनी सांगितले की, रात्री ११ वाजताच्या सुमारास दहावीचे आठ विद्यार्थी आणि आठवीतील तीन विद्यार्थी ज्युनियर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात घुसले. त्यानंतर वरिष्ठांनी सातवीच्या विद्यार्थ्यांना धमकावले आणि तिच्या भावाला जबरदस्तीने दहावीच्या वसतिगृहात नेले. लुनिया म्हणाली की, तिच्या भावाचा रात्रभर मानसिक आणि शारीरिक छळ करण्यात आला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये तिचा भाऊ सकाळी ५:४५ च्या सुमारास त्याच्या वसतिगृहाबाहेर दिसतो. थोड्याच वेळात तो एका रिकाम्या वर्गात गेला, जिथे त्याची सुसाईड नोट सापडली. त्यात लिहिले होते, वरिष्ठांनी मला खूप त्रास दिला, आता काय करावे हे मला कळत नाही.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८३,३११.०१ (-१४८.१४) |
| निफ्टी | २५,५०९.७० (-८७.९५ ) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२१,००० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,४९,८०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.८ | २३.0 |
| अमरावती | ३३.२ | १६.७ |
| भंडारा | ३२.० | २१.० |
| बुलडाणा | ३०.६ | १७.५ |
| चंद्रपूर | ३२.० | २१.० |
| गडचिरोली | ३१.४ | २१.६ |
| गोंदिया | ३१.१ | २०.२ |
| नागपूर | ३१.९ | १९.४ |
| वर्धा | ३२.० | १९.२ |
| वाशीम | ३१.० | १९.४ |
| यवतमाळ | ३२.० | १९.६ |

# व्याप्त काश्मीर पुन्हा भडकले

## ‘जनरेशन झेड’चे उग्र आंदोलन, गोळीबार युवकांचा संताप



◆ **मुझफ्फराबाद, ६ नोव्हेंबर**

शिक्षण प्रणालीत सुधारणा करण्याची मागणी आणि महाविद्यालये व विद्यापीठातील फी दरवाढीविरोधात व्याप्त काश्मिरात शहबाज सरकारविरोधात सुरू असलेले ‘जनरेशन झेड’ चे आंदोलन गुरुवारी चिघळले. हजारोंच्या संख्येने तरुण रस्त्यावर उतरले आणि त्यांनी शासकीय वाहने, मालमत्तांची तोडफोड आणि जाळपोळ केली. विद्यार्थ्यांच्या एका गटावर करण्यात आलेल्या गोळीबारानंतर विद्यार्थी आक्रमक झाले.

शिक्षण प्रणालीत सुधारणा करण्याच्या मागणीसाठी मागील तीन दिवसांपासून व्याप्त काश्मीरातील विविध शहरांत विद्यार्थ्यांची निदर्शने सुरू आहे. सुरुवातीला ही निदर्शने फी वाढ आणि मूल्यांकन प्रक्रियेच्या विरोधात होती. शांततापूर्ण मोर्चे काढण्यात येत होते. अशातच गुरुवारी एका अज्ञात व्यक्तीने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गटावर गोळीबार केला, त्यात तीन विद्यार्थी जखमी झाल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली. त्यानंतर संतप्त विद्यार्थ्यांनी रस्ते रोखून टायर जाळले आणि शासकीय मालमत्ता, बसेसची तोडफोड जाळपोळ करण्यात आली. ‘जनरेशन झेड’जिंदाबाद आणि पाकिस्तान सरकारविरोधात जोरदार घोषणाजी आंदोलकांनी केली. सध्या व्याप्त काश्मिरात तणापूर्ण परिस्थिती असून पोलिस आणि सुरक्षा दलाचे अतिरिक्त पथक तैनात करण्यात आले. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, गोळीबार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरू आहे. विद्यार्थ्यांनी महामार्ग रोखले असून लाहोरला जाणारी वाहतूक विस्कळीत झाली, सरकारचे मंत्री आंदोलकांसोबत चर्चा करीत आहे. ◂(वृत्तसंस्था)

### विद्यार्थ्यांच्या मागण्या काय ?

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी देखील या आंदोलनात सामील झाले आहेत. त्यांचा मुख्य असंतोष नवीन ई-मार्किंगच्या डिजिटल मूल्यांकन प्रणालीबद्दल आहे. सहा महिन्यांच्या विलंबानंतर ३० ऑक्टोबर रोजी प्रथम वर्षाच्या इंटरमिडिएट परीक्षेचे निकाल जाहीर झाले, परंतु अनेक विद्यार्थ्यांना खूप कमी गुण मिळाल्याने निकालांवरून संताप व्यक्त झाला.

# रा. स्व. संघासंबंधी निर्णयावरील स्थगितीविरुद्धची याचिका फेटाळली

## कर्नाटक सरकारला पुन्हा एकदा झटका

◆ **बंगळुरू, ६ नोव्हेंबर**

रा. स्व. संघाच्या सार्वजनिक ठिकाणांवरील कार्यक्रमांवर प्रतिबंध लादणाऱ्या निर्णयाविरुद्ध कर्नाटक उच्च न्यायालयाच्या एकलपीठाने दिलेल्या स्थगितीच्या विरोधात राज्य सरकारने दाखल केलेली याचिका उच्च न्यायालयाने फेटाळत काँग्रेस सरकारला झटका दिला आहे. कर्नाटक सरकारच्या निर्णयाविरुद्ध दिलेल्या स्थगितीचा आदेश हटवण्यासाठी निर्णण देणाऱ्या एकलपीठात याचिका दाखल करा, असे न्या. एस. जी. पंडित आणि गीता के. बी. यांच्या खंडपीठाने म्हटले आहे.

सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही खाजगी संस्थेच्या कार्यक्रमांसाठी सरकारची परवानगी घ्यावी लागेल, असा आदेश काही दिवसांपूर्वी कर्नाटक सरकारने दिला होता. या आदेशाचे उल्लंघन करून आयोजित केलेला कोणताही कार्यक्रम किंवा रॅली भारतीय न्याय संहितेच्या अंतर्गत बेकायदेशीर मानली जाईल, असेही यात म्हटले होते. या सरकारी आदेशात रा. स्व. संघाचे थेट नाव घेण्यात आले नव्हते. मात्र, रा. स्व. संघाच्या दक्षिणेतील कार्यक्रम प्रभावित करण्याचा हेतू या आदेशामागे होत.

कर्नाटक उच्च न्यायालयाच्या एकलपीठाने २२ ऑक्टोबर रोजी या सरकारी आदेशाला स्थगिती दिली होती. एकसाथ चालावे, असे लोकांना वाटत असल्यास त्यांना का रोखले जाऊ शकते, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला होता.

राज्य सरकारने अपील दाखल करण्याऐवजी एकलपीठाच्या न्यायमूर्तींकडून स्पष्टीकरण मागावे, असा सल्ला कर्नाटक उच्च न्यायालयाच्या दोन सदस्यीय खंडपीठाने दिला. हा आदेश अनौपचारिक भेटीगाठी नव्हे तर, रॅली आणि मिरवणुकांसारख्या संघटित कार्यक्रमांसाठी आहे, असा युक्तिवाद ॲडव्होकेट जनरल शशी किरण शेट्टी राज्य सरकारच्या वतीने केला. विरोध आंदोलनांसाठी सरकारने अगोदरच फ्रीडम पार्क आणि क्रीडा आयोजनसाठी कांतीरवा स्टेडियम उपलब्ध केले असल्याचे त्यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

### सरकारचे अपील सुनावणीयोग्य नसल्याचा दावा

सरकारचे अपील सुनावणीयोग्य नसल्याचा युक्तिवाद याचिकाकर्ती संघटना पुनश्चेतना सेवा संघ आणि वुई केअर फाऊंडेशनच्या वतीन वरिष्ठ वकील अशोक हरनाहल्ली यांनी केला. या नियमाप्रमाणे क्रिकेट खेळणाऱ्या समूहांनाही रोज परवानगी घ्यावी लागेल, असे त्यांनी सांगितले. दोन्ही बाजूंच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी १७ नोव्हेंबर रोजी ठेवली.

## एलआयसीला दुसऱ्या तिमाहीत १०,०९८ कोटींचा नफा

**मुंबई :** देशातील सर्वात मोठी विमा कंपनी, भारतीय जीवन विमा महामंडळ (एलआयसी) ने २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत १०,०९८ कोटींचा नफा नोंदवला आहे, जो मागील वर्षीच्या तुलनेत ३०.६५ टक्के वाढ आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीत कंपनीला ७,७२९ कोटींचा नफा झाला होता. जुलै-सप्टेंबर तिमाहीत कंपनीने प्रीमियममध्ये १,२६,९३० कोटी जमा केले, जे २०२५ च्या याच कालावधीच्या तुलनेत ५.४९ टक्के जास्त आहे, जेव्हा प्रीमियममध्ये १,२०,३२६ कोटी जमा झाले होते.

# भाजपाचे राज्यातील निवडणूक प्रमुख ठरले

## एकनाथ शिंदेंच्या बालेकिल्ल्यात गणेश नाईक प्रभारी

◆ **मुंबई, ६ नोव्हेंबर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर भाजापने राज्यातील सर्व जिल्ह्यांतील निवडणूक प्रमुख निवडले आहेत. एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला ठाण्यात मंत्री गणेश नाईक यांची निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. ठाणे शहर, ग्रामीण, कल्याण, उल्हासनगर, मीरा भाईंदर, भिवंडी, नवी मुंबई या सर्व ठिकाणी गणेश नाईक निवडणूक प्रभारी असणार आहेत.

बीड जिल्ह्यातही महत्त्वाच्या नियुक्त्या केल्या आहेत. बीड जिल्हा निवडणूक प्रमुखपदी आ. सुरेश धस तर निवडणूक प्रभारी म्हणून मंत्री पंकजा मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात नितेश राणे निवडणूक प्रभारी तर, पुणे ग्रामीणमध्ये गणेश बिडकर यांच्यावर निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. मुंबईत आशिष शेलार हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. त्याचबरोबर सोलापूर जिल्ह्यात मंत्री जयकुमार गोरे हे प्रभारी असणार आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये मंत्री अतुल सावे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. नांदेड जिल्ह्यात खासदार अशोक चव्हाण हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्यात खासदार धनंजय महाडिक हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. रायगडमध्ये प्रशांत ठाकूर हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. नाशिकमध्ये गिरीश महाजन तर जळगावमध्ये संजय सावकारे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. पुणे जिल्ह्यात केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. रत्नागिरीत निरंजन डावखरे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत, तर साताऱ्यात मंत्री शिवेंद्रराजे भोसले हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### मुंबईत लोकलने चार प्रवाशांना उडवले

**मुंबई :** मुंबईत लोकलच्या धडकेत चार प्रवाशांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे रेल्वे कर्मचाऱ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे मध्य रेल्वे मार्गावरील लोकल वाहतूक विस्कळीत झाली असताना, हा अत्यंत दुर्दैवी अपघात घडला. सँडहर्स्ट रोड स्टेशनजवळ रुळांवरून पायी चालणाऱ्या चार प्रवाशांना अंबरनाथ फास्ट लोकलने धडक दिली.

# वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार

## संतप्त गावकऱ्यांनी शंकरपूर-आंबोली मार्ग रोखला

◆ **चिमूर, ६ नोव्हेंबर**

तालुक्यातील शंकरपूर-आंबोली मार्गावरील ठाणारीठ परिसरात असलेल्या शेतात कापूस वेचत असताना वाघाने शेतकऱ्यावर हल्ला करून ठार केले. ही घटना बुधवार, ५ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. ईश्वर भरडे (५२) असे मृतकाचे नाव आहे.



मृतक ईश्वर भरडे

ईश्वर भरडे बुधवारी दुपारी १२ वाजता शेतातील कापूस वेचण्यासाठी गेले होते. सायंकाळ झाल्यानंतरही ते घरी परत आले नसल्याने कुटुंबीयांसह काही नागरिक शेताकडे त्यांना पाहायला गेले. तेव्हा शेताजवळ त्यांची सायकल होती आणि शेतातच त्यांचा मृतदेहही आढळला. त्यांच्या शरीरावर वाघाच्या नखांच्या खोल जखमा होत्या आणि हाताचा एक भाग वाघाने खाल्ला असल्याचे आढळले.

वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत शंकरपूर-आंबोली मार्गावर ‘रास्ता रोको’ आंदोलन करून वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी गावकऱ्यांकडून रेटून धरण्यात आली. गावकऱ्यांनी भरडे यांचा मृतदेह उचलून शंकरपूर-भिसी रस्त्यावरील आंबोली गावाजवळ रस्त्याच्या मधोमध ट्रॅक्टरवर ठेवला. जोपर्यंत वाघाचा बंदोबस्त करण्यात येत नाही तोपर्यंत मृतदेहाची उत्तरीय तपासणी होऊ देणार नाही, अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली. यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वतावरण निर्माण झाले होते.

**मासळ येथे रास्ता रोको**

चिमूर तालुक्यातील नंदरा येथे बुधवारी वाघाने चार बैलांवर हल्ला करून ठार केले. तालुक्यातील ग्रामीण भागात वाघाच्या हल्ल्याचे प्रमाण वाढल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाघाचा लवकरात लवकर बंदोबस्त करण्यात यावा यासाठी आज गुरुवारी मासळ मार्गावरील तुकूम फाटा येथे ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनात माजी जि. प. सदस्य गजानन बुटके, माजी उपसभापती शांताराम सेलवटकर, मासळचे सरपंच विकास धरणे यांच्यासह गावकरी सहभागी झाले होते. ◂(तभा वृत्तसेवा)



# मनोज जरांगेंच्या हत्येचा कट उघडकीस



## दोन संशयित ताब्यात

◆ **जालना, ६ नोव्हेंबर**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना जीवे मारण्याचा कट रचल्याचा खळबळजनक आरोप बीड येथील एका कार्यकर्त्याकडून करण्यात आला आहे. त्यानेच यासंदर्भात जालना पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

बीडमधूनच हा कट रचला गेल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, या प्रकरणात पोलिसांनी दोन संशयित व्यक्तीना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. या तक्रारीमुळे जालना पोलिसांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर आता मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली असून, त्यांच्या या दाव्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, हे सत्य आहे. कट शिजला गेला आहे, हत्या घडवून आणण्याचा किंवा घातपात करण्याचा कट आहे, हे आता उघड होईलच. जालना जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांनी स्वतः या प्रकरणामध्ये लक्ष घातले आहे. त्यामुळे लवकरच या प्रकरणात दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल. हा कट खूप मोठ्या व्यक्तीने रचला आहे. या सर्व बाबी तपासातून स्पष्ट होतीलच. मी उद्या अकरा वाजता यावर पत्रकारांशी सविस्तर बोलणार आहे, सध्या मी ते सर्व पुरावे पहात असल्याचे जरांगे यांनी म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# राज्यातील अंगणवाडी, आशा वर्कर, बांधकाम, घरेलु कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत पाठपुरावा करु

## खासदार डॉ. मेधाताई कुलकर्णी यांची भारतीय मजदूर संघ प्रदेश महिला अभ्यास वर्गात घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ६ नोव्हेंबर-**

आंगणवाडी, आशा वर्कर आणि इतर महिला कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय मजदूर संघ ठाम प्रयत्न करेल, असे प्रतिपादन खासदार डॉ. मेधाताई कुलकर्णी यांनी केले.

भारतीय मजदूर संघाच्या ७०व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र प्रदेश महिला अभ्यासवर्गाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. सौदामिनी सभागृह, मंगळवार पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. खासदार डॉ. कुलकर्णी म्हणाल्या. अभ्यासवर्गात विविध शासकीय योजना, कामगारांना मिळणारे अल्प वेतन, सामाजिक सुरक्षा, तसेच कार्यपद्धतीतील तृटी या विषयांवर सखोल चर्चा झाली. म



हिला आरोग्य विषयावर बोलताना डॉ. मुक्ता उमरजी (एम. डी. गायनॅकॉलॉजिस्ट) म्हणाल्या, ‘‘महिला कार्यकर्त्यांनी स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य दिल्यास सशक्त कुटुंब आणि सुदृढ समाज निर्माण होईल.’’

या अभ्यासवर्गाचा उद्देश म्हणजे संघटनेतील महिला कार्यकर्त्यांना संघटनात्मक, सामाजिक आणि कामगार क्षेत्रातील विषयांवर प्रशिक्षण देणे हा आहे. व्यक्तिमत्त्व विकास, असंघटित क्षेत्रातील महिला कामगारांसाठीच्या कल्याणकारी योजना, कामगार क्षेत्रातील नव्या आव्हाने आणि उपाययोजना यावर तज्ञांनी मार्गदर्शन केले.

चिंतन सत्रात श्री.राहुल पुंडे यांनी पंचपरिवर्तन या विषयात मार्गदर्शन केले, नोकरी करणाऱ्या महिलांनी कुटुंब, नोकरी , व सामाजिक संघठन यांच्या नियोजन करून सामाजिक काम करावे, असे मनोगत संध्या देशपांडे, सहभागी महिलांना प्रशस्ती पत्र देऊन समारोप भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अँड अनिल ढुमणे यांनी केले. भारतीय मजदूर संघ महाराष्ट कार्यक्रमाचे प्रदेशाध्यक्ष अध्यक्ष अँड. अनिल ढुमणे होते.

कार्यक्रमास राष्ट्रीय उपाध्यक्षा, नीता चोबे, शिल्पा देशपांडे, बाळासाहेब भुजबळ, अर्जुन चव्हाण, तसेच विविध जिल्ह्यांतील महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या अभ्यासवर्गाचे आयोजन आणि समन्वय वंदना कामठे, शर्मिलाताई पाटील, तृप्ती आळती, संजना वाडकर, वनिता सावंत, मनिषा ढुमणे, सुभाष सावजी , सुरेश जाधव, धनंजय इनामदार, बेबीराणी डे, रोहिणी पाटसकर व कामगार महासंघाचे पुण्यातील पदाधिकाऱ्यांनी केले असून त्यांच्या प्रयत्नांमुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

# गंभीर गुन्हे दाखल असलेले नेते रिंगणात





**श्यामकांत जहागीरदार**



◆ **नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीचा पहिला टप्पा आटोपला असून दुसऱ्या टप्प्यातील मतदान ११ नोव्हेंबरला होत आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात गंभीर गुन्ह्यांचे आरोप असलेले अनेक उमेदवार उतरले आहेत.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात १२२ मतदारसंघात १३०३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहे, यातील १२९७ उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रातून मिळालेल्या माहितीनुसार दुसऱ्या टप्प्यातील ३२ टक्के उमेदवारांवर विविध प्रकारचे, तर २६ टक्के उमेदवारांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. १९३ उमेदवारांवर खुनाचे तर ७९ उमेदवारांवर खुनाच्या प्रयत्नांचे आरोप आहेत. ५२ टक्के उमेदवारांवर महिलांसंदर्भातील अत्याचाराचे तर ३ उमेदवारांवर बलात्काराचे गुन्हे दाखल आहेत.

प्रशांतकिशोर यांच्या जनसुराज पक्षाच्या ११५ पैकी ५१, बसपाच्या ९१ पैकी १२, राजदच्या ७० पैकी २७, भाजपाच्या ५३ पैकी २२, जदयुच्या ४४ पैकी ११, आपच्या ३९ पैकी १२, लोजपाच्या १५ पैकी ९, भाकपा मालेच्या ६ पैकी ४ तर भाकपाच्या ४ पैकी २ उमेदवारांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. विशेष म्हणजे निवडणुकीचा अर्ज दाखल करतांना सोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्रातून उमेदवारांनीच आपल्यावरील गुन्ह्यांचा तपशील सादर केल्यामुळे यावर अविश्वास ठेवण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स आणि बिहार इलेक्शन वॉच या संघटनांच्या अहवालातून ही माहिती देण्यात आली आहे.बिहारची जी प्रतिमा देशभर निर्माण झाली, त्यात सुधारणा होण्याची गरज आहे.

न्यायालयातून राजकीय पक्षांच्या या गुन्हेगारीवृत्तीच्या उमेदवारांना अद्याप शिक्षा झाली नसली तरी जनतेच्या न्यायालयात म्हणजे निवडणुकीच्या रिंगणात मतदार या उमेदवारांचा निकाल कसा लावतात, ते मतमोजणीनंतरच समजणार आहे.

**पहिल्या टप्प्यातील ४२३ उमेदवारांवर विविध गुन्हे**

पहिल्या टप्प्यातील १२१ मतदारसंघात १३०३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते, यातील ४२३ म्हणजे ३२ टक्के उमेदवारांवर विविध स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. यातील २७ टक्के म्हणजे ३५४ उमेदवारांवर गंभीर स्वरुपाचे वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. यातील ३३ उमेदवारांवर खुनाचे, ८६ उमेदवारांवर खुनाच्या प्रयत्नांचे तर ४२ उमेदवारांवर महिलांसंदर्भातील गुन्ह्यांचे आरोप आहेत. दोन उमेदवारांवर तर बलात्कारांचेही गुन्हे दाखल आहेत.

### छत्तीसगडमध्ये जहाल महिला माओवाद्याची शरणागती

◆ **रायपूर, ६ नोव्हेंबर**

छत्तीसगडमधील खैरागड-छुईखदान-गंडाई (केसीजी) जिल्ह्यातील पोलिसांसमोर गुरुवारी एका जहाल महिला माओवाद्याने शरणागती पत्करली. तिच्या शिरावर १७ लाख रुपयांचे बक्षीस होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

कमला सोडी असे तिचे नाव आहे आणि ती माड विभाग तसेच माओवाद्यांच्या मध्यप्रदेश-महाराष्ट्र-छत्तीसगड (एमएमसी) क्षेत्रात सक्रिय होती, असे केसीजीचे पोलिस अधीक्षक लक्ष्य शर्मा यांनी सांगितले. राज्य सरकारच्या नवीन शरणागती आणि पुनर्वसन धोरणाने प्रभावित होऊन तिने आत्मसमर्पण केले, असे त्यांनी सांगितले. केसीजी मध्यप्रदेश सीमेवर असून, छत्तीसगडची राजधानी रायपूरपासून ९० किमी अंतरावर आहे. कमला सोडी मागील १४ वर्षांपासून माओवादी चळवळीत होती. ती संघटनात्मक कार्ये आणि हिंसाचारात गुंतली होती. यात नक्षलभरती, प्रचार आणि सुरक्षा दलावर हल्ल्यांचा कट आखण्यासारख्या कारवायांचा समावेश होता, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# मध्य प्रदेश सरकारने फेटाळली शहाबानोच्या मुलीची याचिका

## हक चित्रपट प्रदर्शन थांबवण्याची केली होणी मागणी

◆ **इंदूर, ६ नोव्हेंबर**

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने शहा बानो बेगम यांच्या मुलीने दाखल केलेली याचिका फेटाळून लावली आहे. त्यांनी हक या हिंदी चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्याची मागणी केली होती. या मागणीत कोणतेही तथ्य नाही, असे म्हणत उच्च न्यायालयाने त्यांची मागणी फेटाळून लावली आहे.



उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठाने ४ नोव्हेंबर रोजी दिलेल्या या आदेशामुळे आणि त्याची प्रत गुरुवारी देण्यात आल्याने ७ नोव्हेंबर रोजी चित्रपटाच्या प्रदर्शनाचा मार्ग मोकळा झाला. यामी गौतम धर आणि इमरान हाश्मी यांची मुख्य भूमिका असलेला हक हा चित्रपट शाह बानो बेगम यांच्या जीवनावर आणि कायदेशीर संघर्षावर आधारित असल्याचे म्हटले जाते. १९८५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने घटस्फोटित मुस्लिम महिलांना पोटगीचा अधिकार देण्यासाठी केलेल्या ऐतिहासिक खटल्यामुळे बानो यांचे निधन झाले.

इंदूर येथील रहिवासी बानो यांचे १९९२ मध्ये निधन झाले. त्यांची मुलगी सिद्दीका बेगम खान हिने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. हा चित्रपट कुटुंबाच्या संमतीशिवाय बनवण्यात आला आहे आणि तिच्या दिवंगत आईच्या आयुष्यातील वैयक्तिक पैलू चुकीचे सादर करण्यात आले असल्याचा दावा त्यांनी केला होता.

परिणामी, याचिका कोणत्याही गुणवत्तेपासून वंचित असल्याचे आढळून आले आहे आणि त्यामुळे ती फेटाळण्यात येत आहे, असे इंदूर खंडपीठाचे न्यायमूर्ती प्रणय वर्मा यांनी आदेशात म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# बांगलादेशात भडकला हिंसाचार

## निवडणूक प्रचाराच्या सुरुवातीला अनेक ठिकाणी हल्ले, जाळपोळ

◆ **ढाका, ६ नोव्हेंबर**

बांगलादेशमध्ये फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आतापासूनच विविध पक्षाकडून प्रचारमोहीम सुरू झाली आहे. अशातच देशातील अनेक भागात हिंसाचार उसळला आहे. चितगावमध्ये विरोधी बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात् बीएनपीचे उमेदवार इरशाद उल्लाह यांच्यावर गोळीबार करण्यात आला. समाजकंटकांनी शासकीय बस आणि मालमत्तांची जाळपोळ केली. हिंसाचारांच्या घटनांत २५ पेक्षा अधिक नागरिक जखमी झाले.



बांगलादेशात सध्या मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वात अंतरिम सरकार सत्तेत आहे आणि फेब्रुवारी २०२६ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. तथापि, निवडणूक प्रचारादरम्यान देशात हिंसाचार उफाळला असून परिस्थिती तणावपूर्ण आहे. चितगावमधील घटनेनंतर कुमिल्ला जिल्ह्यात, बीएनपी पक्षाच्या अनेक नेत्यांच्या घरांना आगी लावण्यात आल्या. याशिवाय रस्त्यावर उतरून कट्टरपंथीयांनी जाळपोळ केली. चितगाव पोलिसांना गुन्हेगारांना लवकरात लवकर पकडण्यासाठी कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. बांगलादेशच्या सामाजिक आणि राजकीय संस्कृतीत कोणत्याही स्वरूपात हिंसाचार आणि धमकीचे राजकारण अस्वीकार्य आहे. सरकारने सर्व राजकीय पक्षांना आणि त्यांच्या समर्थकांना शांतता राखण्याचे आणि शांततापूर्ण निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करण्याचे आवाहन केले.

(वृत्तसंस्था)

### वातावरण बिघडविण्यात परदेशी शक्तींचा हात

बीएनपीचे नेते अन्वरुल हक म्हणाले, विद्यापीठ विद्यार्थी संघटना निवडणुकांमध्ये जमात-समर्थित विद्यार्थी संघटनांच्या अलिकडच्या विजयामुळे देशात अस्थिरता वाढली आहे. जमात-ए-इस्लामी आणि काही सरकारचे सल्लागार मोहम्मह युनूस देशातील वातावरण बिघडवण्यासाठी एकत्र काम करत आहेत. काही परदेशी शक्तींचाही यात सहभाग आहे. देशातील लोक निश्चितच धार्मिक आहेत, परंतु ते अतिरेकीपणाच्या विरोधात आहेत.

### जमात-ए-इस्लामीवर कारवाई करण्याची मागणी



सरकारने निवेदनात म्हटले की, सरकार फेब्रुवारीतील सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निष्पक्षपणे घेण्याची तयारी करीत आहे. या काळात कोणत्याही पद्धतीचा हिंसाचार खपवून घेतला जाणार नाही. हिंसाचार घडवून निवडणुका लांबणीवर टाकण्याचा कोणताही डाव यशस्वी होवू देणार नाही. दरम्यान बीएनपीने जमात-ए-इस्लामीवर निवडणुकीचे वातावरण बिघडवल्याचा आरोप केला आणि हिंसाचारांच्या घटनांसाठी जमात ए इस्लामीला जबाबदार धरले आहे.

# राजदच्या जंगलराजमध्ये शून्य विकास

### प्रचारसभेतून मोदींचा हल्लाबोल ● सरकार चालवण्याच्या नावाखाली झाली लूटमार



◆ **अररिया, ६ नोव्हेंबर**

१९९० ते २००५ या १५ वर्षांच्या काळात जंगल राज सरकारने बिहार पूर्णपणे उद्ध्वस्त केला. सरकार चालवण्याच्या नावाखाली केवळ लूटमार झाली. त्यांनी सत्तेवर असताना एकही एक्सप्रेसवे बांधला नाही, कोसी नदीवर पूल बांधला नाही, क्रीडा संकुले, वैद्यकीय महाविद्यालये, आयआयटी, आयआयएम यापैकी काहीही बांधलेले नाही, हे जंगलराजचे सत्य आहे असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी प्रचारसभेतून राजदवर केला.

बिहारच्या अररिया येथील एका जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, जंगल राज चालवणारे स्वतःला तुमचे पालक मानत होते. पण मोदी वेगळे आहेत. माझे पालक हे लोक आहेत. तुम्ही माझे स्वामी आहात, तुम्ही माझे रिमोट कंट्रोल आहात, आमच्यासाठी जनता हीच सर्वोच्च आहे. आज बिहारला विकसित राज्य बनवण्यासाठी मतदानाचा पहिला टप्पा होत आहे. बिहारच्या कानाकोपऱ्यातून समाज माध्यमावर मतदान केल्याचे छायाचित्र पोस्ट केले जात आहे. बिहारमधील मतदानासाठी तरुणांमध्येही अभूतपूर्व उत्साह आहे. मी सर्व मतदारांचे अभिनंदन मानतो आणि सर्वांना बाहेर पडून मतदान करण्याचे आवाहन करतो. आज, बिहारमध्ये एकच आवाज घुमत आहे: पुन्हा एकदा, एनडीए सरकार, पुन्हा एकदा, सुशासनाचे सरकार. या भावनेमागे माता आणि बहिणींच्या आशा आणि तरुणांची स्वप्ने आहेत. तरुणांनो, लक्षात ठेवा की तुमचे स्वप्न मोदींचा संकल्प आहे.

(वृत्तसंस्था)

# अनैतिक शब्दांचा वापर करणाऱ्या संकेतस्थळांवर बंदी घालण्याची तयारी सुरू

◆ **नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

सरकारने अनेक वेळा पोर्नोग्राफिक संकेतस्थळांवर बंदी घालण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु त्यात यश आले नाही. या दरम्यान, केंद्र सरकार आता अनैतिक संबंधांशी संबंधित शब्दांचा वापर करणाऱ्या सामग्रीवर बंदी घालणारी सामग्री बंदी लागू करण्याची तयारी करत आहे. अशा संज्ञा आणि संबंधित सामग्रीवर बंदी घालण्यासाठी सरकार लवकरच इंटरनेट सेवा प्रदात्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याचे उद्दिष्ट ठेवते.

आयटी मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, बाल पोर्नोग्राफी व्यतिरिक्त, इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या इतर अनेक पोर्नोग्राफिक सामग्रीची विस्तृत श्रेणी आहे जी आंतरराष्ट्रीय स्तरावर बेकायदेशीर नाही. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की भारतात या प्रकारच्या सामग्रीवर पूर्णपणे बंदी घालणे कठीण आहे.

आयटी मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की सरकार वेळोवेळी आवश्यकतेनुसार अशा सामग्रीवर बंदी घालते. तथापि, तंत्रज्ञान आणि इंटरनेटचे आंतरराष्ट्रीय स्वरूप पाहता, अशा सुमारे ४० दशलक्ष वेबसाइट्सवर बंदी घालणे सोपे काम नाही.

**सरकार लवकरच मार्गदर्शक तत्वे जारी करणार**

या प्रकरणाशी परिचित असलेल्या अधिकाऱ्याच्या मते, या प्रकारच्या कंटेंटवर पूर्णपणे बंदी घालण्यासाठी सरकार आयएसपी, इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी सतत चर्चा करत आहे.

भारतीय समाजात निषिद्ध मानल्या जाणाऱ्या लैंगिक संबंधांसाठी वापरल्या जाणाऱ्या संज्ञा असलेल्या कंटेंटवर बंदी घालण्यासाठी लवकरच मार्गदर्शक तत्वे जारी केली जाण्याची शक्यता आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. असे अनेक शब्द आधीच ब्लॉक केले गेले आहेत आणि त्यानंतर दर्शक संख्या कमी झाली आहे. याची भरपाई करण्यासाठी, कंटेंट निर्माते नावे बदलून कंटेंट तयार करत आहेत. अशा कंटेंटला ब्लॉक करण्यासाठी देखील प्रयत्न केले जातील.

(वृत्तसंस्था)

# वलसाडमध्ये २२ कोटींचे अमली पदार्थ जप्त

◆ **अहमदाबाद, ६ नोव्हेंबर**

महसूल गुप्तचर संचालनालय अर्थात् डीआरआयने गुजरातमधील वलसाड जिल्ह्यातील एका कारखान्यावर छापा टाकत २२ कोटींचे अल्प्राझोलम नावाचे अमली पदार्थ जप्त केले. या कारवाईत चार जणांना अटक करण्यात आली.

जप्त केलेले अमली पदार्थ तेलंगणात पाठविण्याची योजना होती, मात्र तत्पूर्वीच कारवाई करण्यात आली. डीआरआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, गोपनीय माहिती मिळाल्यानंतर आमच्या पथकाने कारखान्यावर लक्ष ठेवले. कारखान्यात अमली पदार्थ असल्याचे निदर्शनात आल्यानंतर छापा टाकण्यात आला आणि बेकायदेशीर औषध उत्पादन युनिटचा भंडाफोड झाला. रिॲक्टर, सेंट्रीफ्यूज, रेफ्रिजरेशन युनिट आणि हीटिंग मेंटल अशी उत्पादन उपकरणे यावेळी जप्त करण्यात आली. छाप्यात ९.५५ किलो अल्प्राझोलम आणि ४३१ किलो कच्चा माल आणि रसायने जप्त करण्यात आली. अटक केलेल्या चौघांमध्ये दोन मुख्य आरोपी, एक कर्मचारी आणि तेलंगणाहून औषधी खरेदी करण्यासाठी आलेल्या एका ग्राहकाचा समावेश आहे.

(वृत्तसंस्था)

# केरळमध्ये उभारणार देशातील पहिले न्यायालयीन शहर

### ६१ न्यायालये, न्यायाधीशांचे बंगले

◆ **कोची, ६ नोव्हेंबर**

केरळमधील कोची येथे देशातील पहिले न्यायालयीन शहर बांधले जाणार आहे. कोची जिल्ह्यातील कलामसेरी येथे २७ एकर जागेवर हे न्यायालयीन शहर बांधले जाईल, ज्याचा अंदाजे खर्च १००० कोटी रुपये असेल आणि ते १० वर्षांत आकार घेईल.



हे न्यायालयीन शहर एकाच शहरात रहिवाशांना व्यापक न्यायालयीन सेवा आणि सुविधा प्रदान करेल. त्यात सर्व प्रकारच्या न्यायालयीन सेवा आणि प्रणाली असतील. केरळच्या सर्व संस्था आणि न्यायाधिकरण न्यायालये येथे असतील.

**एआय-सज्ज न्यायालय**

राज्याचे कायदा मंत्री पी. राजीव यांनी सांगितले की, १७ एकरच्या या विस्तीर्ण संकुलात १.२ दशलक्ष चौरस फूट उच्च न्यायालय संकुल असेल. शिवाय, हे न्यायालयीन शहर उपग्रह इंटरनेट-सक्षम न्यायालये, एआय-सक्षम न्यायालये, न्यायिक अकादमी आणि जलद खटल्यांचे निराकरण यासारख्या सुविधा प्रदान करेल.

केरळमधील कोची जिल्ह्यात बांधण्यात येणाऱ्या या न्यायिक शहराच्या प्रकल्पासाठी १,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येईल. १० वर्षांनंतर, या न्यायिक शहराचा आकार आणि सुविधा सर्वोच्च न्यायालयाच्या तुलनेत जास्त करण्याची योजना आहे. पूर्ण झाल्यानंतर, एर्नाकुलम येथे असलेले केरळ उच्च न्यायालय देखील न्यायिक शहरात स्थलांतरित केले जाईल.

**तीन टॉवर्स**

केरळमध्ये बांधण्यात येणाऱ्या या न्यायिक शहरात कलम १४, १९ आणि २१ वर आधारित तीन टॉवर्स असतील, जे संविधानाच्या मुख्य तत्त्वांनुसार समानता, स्वातंत्र्य आणि जीवनाच्या मूलभूत अधिकारांची हमी देतात. मुख्य टॉवर ७ मजली उंच असेल आणि इतर दोन टॉवर प्रत्येकी ६ मजली उंच असतील.

**६१ न्यायालये**

या न्यायिक शहरात ६१ न्यायालये असतील. याशिवाय, न्यायाधीशांचे बंगले, कायदा संस्था-महाविद्यालये, प्रशासकीय शाखा, चेंबर्स, मध्यस्थी केंद्र, भरती कक्ष, माहिती केंद्र, सभागृह, सर्व एकाच ठिकाणी असतील. त्याची रचना आता तयार केली जात आहे.

(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### माधुरी दीक्षितच्या कॅनडा दौऱ्यावरून वाद



**नवी दिल्ली** : माधुरी दीक्षितचा कॅनडा दौरा वादाने वेढला गेला आहे. अभिनेत्रीने २ नोव्हेंबर रोजी कॅनडामध्ये कार्यक्रम सादर केला. तथापि, ती ७:३० वाजता होणाऱ्या कार्यक्रमासाठी १० वाजता पोहोचली, ज्यामुळे चाहते संतप्त झाले. शोच्या आयोजकांनी एक निवेदन जारी करून वादासाठी माधुरीला जबाबदार धरले आणि म्हटले की तिच्या टीमने तिला चुकीची माहिती दिली, ज्यामुळे ती उशिरा पोहोचली. आता, माधुरी दीक्षितच्या टीमने तिच्या कराराची एक प्रत जारी केली आहे, ज्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की माधुरीला फक्त ६० मिनिटे म्हणजेच १ तास स्टेजवर राहायचे होते, ज्यामध्ये चाहत्यांसोबत प्रश्नोत्तर सत्र देखील समाविष्ट होते. ही संपूर्ण घटना व्यवस्थापनाच्या चुकीमुळे घडली. माधुरीकडून कोणताही विलंब किंवा निष्काळजीपणा झाला नाही. ती दिलेल्या वेळेवरच आली, असे आता आयोजकांनी म्हटले आहे.

### ऐश्वर्या घेणार घटस्फोट



**मुंबई** : मनोरंजन जगतातील अनेक जोड्यांच्या घटस्फोटांच्या बातम्या सातत्याने येत आहेत. त्यात आता छोट्या पडद्यावरील अभिनेत्री ऐश्वर्या शर्मा हिची देखील भर पडली आहे. ऐश्वर्या आणि तिचा नवरा नील भट्ट यांनी लग्नाच्या अवघ्या चार वर्षातच घटस्फोटाचा निर्णय घेतला आहे. तसा अधिकृतपणे अर्जही दाखल केल्याचे समजते. हे दोघे 'गुम है किसी के प्यार में' या मालिकेच्या सेटवर भेटले होते. मालिकेदरम्यानच त्यांनी लग्न केले. रिॲलिटी शोमध्ये या जोडप्याला बरेच प्रेम मिळाले. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्यात दुरावा निर्माण झाल्याची चर्चा होती आणि ते वेगळे राहत होते. मध्यंतरी नील एका वेगळ्याच तरुणीसोबत फिरताना दिसला तर ऐश्वर्याने एकटीनेच दिवाळी साजरी केली. या सर्व फोटो, व्हिडीओवरून दोघांमध्ये फाटल्याचे स्पष्ट झाले.

### पुष्करला मिळाला यूएईचा गोल्डन व्हिसा



**मुंबई** : दुबई हे अनेक भारतीय कलाकारांसाठी आवडीचे ठिकाण आहे. केवळ सुट्ट्या घालवण्यासाठी नव्हे तर व्यावसायिक कारणांसाठी आणि कायम वास्तव्यासाठी अनेक कलाकार तेथे स्थानांतरीत होत आहेत. आता मराठी अभिनेता पुष्कर जोग याला यूएईचा गोल्डन व्हिसा मिळाला आहे. त्याने फेसबुकवर पोस्ट शेअर करत याबद्दल माहिती दिली आहे. मुलीच्या चांगल्या भविष्यासाठी आणि तिच्या कल्याणासाठी यूएईचा गोल्डन व्हिसा मिळवल्याचे त्याने सांगितले. केवळ पुष्करच नाही तर अनेक कलाकारांनी दुबईला आपले दुसरे घर बनवले आहे. दाक्षिणात्य सुपरस्टार अजित कुमार, आर. माधवन, संजय दत्त, मौनी रॉय, विवेक ओबेरॉय यांनीही दुबईत घर घेतले आहे.

# भारतीय निवडणुका हा जागतिक चर्चेचा विषय

## आफ्रिकेतील खासदार भेटीवर येण्यास इच्छूक

◆ **नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

भारतीय निवडणूक आयोग सध्या बिहार विधानसभा निवडणुका घेण्यात व्यस्त आहे. मतदानाच्या बाबतीत ही एक मोठी निवडणूक आहे, ज्यामध्ये एकूण ७५ दशलक्ष मतदार सहभागी झाले आहेत. भारतीय निवडणूक आयोगाच्या यशस्वी आणि सुरळीत कामकाजाला जगभरात मान्यता मिळत आहे. निवडणूक जवळून पाहण्यासाठी भारताला भेट देण्याची इच्छा दक्षिण आफ्रिकेच्या खासदारांनी व्यक्त केली आहे.



निवडणूक आयोगाच्या प्रवक्त्याने या घटनेचे स्पष्टीकरण देताना सांगितले की, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना दक्षिण आफ्रिकेतून फोन आला होता. हा फोन दक्षिण आफ्रिकेच्या निवडणूक आयोगाचे अध्यक्ष मोसोथो मोएप्पा यांचा होता. त्यांनी बिहार निवडणुकीसाठी मुख्य निवडणूक आयुक्तांना शुभेच्छा दिल्या आणि दक्षिण आफ्रिकेच्या खासदारांनी भारताला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली.

प्रवक्त्यांच्या मते, मोएप्पा म्हणाले की, काही खासदार जगातील सर्वात पारदर्शक आणि कार्यक्षम निवडणूक प्रक्रियेचे बारकाईने निरीक्षण करण्यासाठी आणि त्याबद्दल जाणून घेण्यासाठी लवकरच भारताला भेट देऊ इच्छितात.

जगातील सर्वात मोठी लोकशाही सध्या एका मोठ्या राज्यातील विधानसभा निवडणुकांवर लक्ष ठेवून आहे. त्यामुळे, संपूर्ण जगाचे लक्ष आहे. ६ नोव्हेंबर रोजी, बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडले. यासाठी निवडणूक आयोगाचे अनेक अधिकारी हजर होते. पहिल्यांदाच, बिहारमधील सर्व मतदान केंद्रांवर सीसीटीव्हीद्वारे देखरेख ठेवली जात आहे. अधिकाऱ्यांच्या मते, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त एसएस संधू आणि विवेक जोशी संपूर्ण निवडणुकीचे निरीक्षण करत आहेत.

(वृत्तसंस्था)


# स्वातंत्र्याचे प्रेरणागीत 'वंदे मातरम्'



भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे प्रतिध्वनी करणारे एक असे गाणे आहे जे केवळ देशभक्तीची भावना जागृत करत नाही तर मातृभूमीला देवी म्हणून पूजण्याच्या परंपरेला देखील जिवंत करते. बंगाली कादंबरीतून ते संपूर्ण राष्ट्राचा आवाज बनले आणि ते ब्रिटिश राजवटीचा पाया हादरवणाऱ्या स्वातंत्र्य चळवळीचे प्रतीक झाले. चला इतिहासाची पाने उलटून पाहूया जिथे राष्ट्रवादाची ज्योत पहिल्यांदा प्रज्वलित झाली होती.

**उत्पत्ती: बंकिमचंद्रांच्या लेखणीतून जन्म**

'वंदे मातरम्'ची मुळे १९ व्या शतकातील बंगालमध्ये आहेत, जेव्हा भारत ब्रिटिश वसाहतवादी राजवटीने जळून खाक झाला होता. या गाण्याचे लेखक बंकिमचंद्र चट्टोपाध्याय होते, ज्यांना बंगाली साहित्याचे जनक म्हणून ओळखले जाते. बंकिमचंद्र एक प्रशासकीय अधिकारी होते, परंतु त्यांची कामे राष्ट्रवादाच्या प्रखरतेने भरलेली होती. हे गाणे ७ नोव्हेंबर १८७५ रोजी घरी बसलेले असताना रचले गेले. काही इतिहासकारांच्या मते, हे गाणे अचानक प्रेरणेने लिहिले गेले.



बंकिम यांनी ते संस्कृत आणि बंगाली भाषेच्या मिश्रणात रचले आहे, जिथे संस्कृत श्लोक मातृभूमीचे गौरव करतात आणि बंगाली भाग भावनिक खोली प्रदान करतो. गाण्याच्या पहिल्या ओळी आहेत:

**वंदे मातरम्**
**सुजलाम् सुफलाम् मलयाजशिताम्**
**शस्यशालाम् मातरम्**

हे गाणे प्रथम त्यांच्या प्रसिद्ध कादंबरी आनंदमठमध्ये प्रकाशित झाले, जे १८८२ मध्ये पूर्ण झाले आणि बंगाली मासिक बंगदर्शनमध्ये मालिकाबद्ध झाले. ही कादंबरी १८ व्या शतकातील संन्यासी बंडात घडली, जिथे भुकेल्या भिक्षूंनी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध बंड केले. 'वंदे मातरम्' हे कादंबरीतील भिक्षूंचे युद्धगीत आहे, ज्यामध्ये मातृभूमीला देवी दुर्गा म्हणून चित्रीत केले आहे. बंकिमचंद्रांनी त्यांच्या पुतण्याला हे गाणे रचण्यास प्रेरित केले, परंतु मूळ संगीत नंतर जादवपूर विद्यापीठातील संगीतकारांनी विकसित केले. या गाण्याचा उद्देश स्पष्ट होता: भारतीयांमध्ये मातृभूमीवरील प्रेम आणि परकीय राजवटीविरुद्ध संघर्षाची भावना जागृत करणे.

### राष्ट्रीय गीताची स्थिती: १९५० ची ऐतिहासिक घोषणा

स्वातंत्र्यानंतर 'वंदे मातरम्' ला राष्ट्रीय मान्यता मिळाली. २४ जानेवारी १९५० रोजी भारताच्या संविधान सभेने ते राष्ट्रगीत घोषित केले. डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली हा निर्णय घेण्यात आला. त्याच दिवशी 'जन गण मन्'ला राष्ट्रगीत करण्यात आले. कादंबरीच्या फक्त पहिल्या दोन कडव्यांना राष्ट्रगीत म्हणून स्वीकारण्यात आले. कारण संपूर्ण गाण्याला मुस्लिम लीगचा आक्षेप होता. जवाहरलाल नेहरू आणि मौलाना अबुल कलाम आझाद यांनी तडजोड केली. आज, सरकारी कार्यक्रमांमध्ये पहिले दोन कडवे गायले जातात.'वंदे मातरम्' वादापासून वाचलेले नाही. २००६ मध्ये शताब्दी समारंभात काही मुस्लिम संघटनांनी धार्मिक कारणास्तव निषेध केला, परंतु सर्वोच्च न्यायालयाने ते देशभक्तीचे प्रतीक म्हणून ओळखले. या गाण्याचा वारसा चित्रपट, शाळा आणि क्रीडा स्पर्धांमध्ये जिवंत आहे.

### स्वातंत्र्य चळवळीतील भूमिका: ब्रिटिशांना अस्वस्थ करणारा नारा

वंदे मातरम हे केवळ एक गाणे नव्हते; ते स्वातंत्र्यलढ्याचे युद्धघोषक बनले. १८९६ मध्ये कलकत्ता काँग्रेस अधिवेशनात ते पहिल्यांदा सार्वजनिकरित्या गायले गेले, जेव्हा रवींद्रनाथ टागोर यांनी ते त्यांच्या स्वतःच्या सुरात गायले. टागोरांच्या आवाजाने हे गाणे अमर केले. १९०५ च्या बंगालच्या फाळणीदरम्यान, हे गाणे स्वदेशी चळवळीचे प्रतीक बनले. बाळ गंगाधर टिळक, लाला लजपत राय आणि बिपिन चंद्र पाल यांसारख्या नेत्यांनी ते रॅलींमध्ये गायले. ब्रिटिश सरकार इतके घाबरले की १९०७ मध्ये त्यांनी या गाण्यावर बंदी घातली. तरीही, अरबिंदो घोष आणि सुभाषचंद्र बोस यांसारख्या क्रांतिकारकांनी ते गुप्तपणे गायले. महात्मा गांधींनीही त्याचे कौतुक केले, परंतु संपूर्ण गाणे स्वीकारण्यास ते कचरले कारण त्यात हिंदू देवतांचे संदर्भ होते, जे मुस्लिम समुदायाला वेगळे करू शकते. तरीही, चळवळीवर त्याचा प्रभाव प्रचंड होता. १९३७ मध्ये, रवींद्रनाथ टागोर यांनी एका ऑर्केस्ट्रामध्ये ते सादर केले, ज्यामुळे ते जगाचे लक्ष वेधले गेले. त्या काळात भारत देश पारतंत्र्यात होता. पराधीनतेच्या अंधारात भारतीयांचा आत्मविश्वास हरवला होता. पण 'वंदे मातरम्'च्या प्रत्येक ओळीने लोकांच्या मनात पुन्हा रक्त उसळायला लागलं. प्रत्येक शब्दातून जणू आईच्या पदराचा स्पर्श जाणवत होता. त्या गीताने भारतीयांना आठवण करून, 'आपली मातृभूमी जिवंत आहे आणि तिचं रक्षण करायचं दायित्व आपल्या रक्तात आहे!'



त्या काळातील प्रत्येक स्वातंत्र्यसेवकाच्या तोंडात 'वंदे मातरम्'हा मंत्र होता. ब्रिटिशांची सत्ता हादरली कारण या दोन शब्दांत संपूर्ण भारत एकवटला होता. ज्यांच्या हातात तलवार नव्हती, त्यांनी 'वंदे मातरम्'च्या हाकेने लढा दिला. त्या हाकेत गोळी नव्हती, पण तर हृदयात झिरपणारा बाण होता.

## अग्रलेख...

# फटाके आणि हायड्रोजन बॉम्ब

बिहारमधील विधानसभा निवडणुकांचे रंगात आलेले राजकारण केवळ मतांची टक्केवारी, जाती-धर्माची परंपरागत गणिते एवढ्या मर्यादित मुद्यांभोवती फिरणारे राहिलेले नाही. आता होत असलेली ही निवडणूक म्हणजे, भाजपाच्या राष्ट्रीय स्तरावरील राजनीतीला मिळणारा कौल असेल. काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या निवडणूक राजनीतीचा बाजच वेगळा आहे. बिहारमधील निवडणुकांच्या तोंडावर त्यांनी उचलून धरलेल्या मतचोरीच्या मुद्याचा नवा अंक 'एच फाईल्स' या नावाने बुधवारी सादर करण्यात आला. हरयाणामध्ये २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत २५ लाख मतांची चोरी झाल्याचा व मतदार यादीत अनेक नावांची दुबार किंवा त्याहून अधिक वेळा नोंद झाल्याचा आरोप करून त्यास पुष्टी देणारे काही पुरावेही त्यांनी माध्यमांसमोर मांडले. हे सारे एक नियोजनबद्ध कारस्थान असल्याचा आरोप करून त्यांनी निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा नवा प्रयत्न केला. त्यांचा हा नवा कथित हायड्रोजन बॉम्ब सत्ताधारी भाजपाला आणि केंद्रीय निवडणूक आयोगाला जोरदार धक्का देणार, अशी जोरदार हवा त्यांच्या पत्रकार परिषदेआधी काँग्रेस व भाजपाविरोधी आघाडीने तयारही केली होती; पण या पक्षांचाच अपेक्षाभंग झाला. निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांच्या या आरोपांचे खंडन केले आहे.

मतदार यादीत दोष असेल तर काँग्रेसच्या बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांनी त्यास वेळीच आक्षेप का घेतला नाही, निवडणुकीआधी प्रसिद्ध झालेल्या यादीबाबत एकदाही तक्रार किंवा आक्षेप नोंदविला नाही, अनेक वेळा मतदान करणाऱ्यांना रोखले नाही आणि मतदान केंद्रांतील त्रुटी दाखविल्या नाहीत, हा निवडणूक आयोगाचा खुलासा लोकशाही प्रक्रियेशी सुसंगत असाच आहे. राहुल गांधी यांनी माध्यमांसमोर कितीही आवेशांत कागदपत्रांचे गठ्ठे उघडले, मतदारांना समोर उभे करून मतचोरीच्या कहाण्या रचल्या, तरी ज्या लोकशाही यंत्रणेच्या कारभारास आव्हान देण्यासाठी न्यायालये हाच योग्य मार्ग ठरतो; तिकडे जाण्याची मात्र त्यांची तयारी नाही. आपण माध्यमांच्या साक्षीने देशासमोर जे काही उघड करीत आहोत, ते न्यायालयांस दिसत असल्याने न्यायालयाने याची दखल घ्यावी ही त्यांची अपेक्षा म्हणजे, लोकशाही यंत्रणांना आपल्या अपेक्षेनुसार वागविण्याचा व वाकविण्याचा प्रयत्न ठरू शकतो. राहुल गांधी यांना त्यांच्या आरोपांचे ठोस पुरावे घेऊन न्यायालयासमोर जावे लागेल. कारण लोकशाहीमध्ये तोच एक न्याय मिळविण्याचा न्याय्य मार्ग असतो. पण तसे होणार नसल्याने राहुल गांधींच्या कथित हायड्रोजन बॉम्बचा स्फोट तर होणे शक्य नाहीच; पण त्यांना अपेक्षित असलेला परिणामही साधता येणार नाही. हरयाणाच्या निवडणुकीतील गैरप्रकारांचे आरोप बिहार निवडणुकांच्या तोंडावर करण्यासाठी माध्यमांचा मंच वापरून बिहारी मतदारांच्या मनात निवडणूक यंत्रणा, सरकार, न्यायालये आदी लोकशाही व्यवस्थांविषयी संशयाचे ढग उभे करण्याचा आणि जनतेस संभ्रमित करून त्याचा तात्कालिक राजकीय फायदा घेण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. ही नीती बिहारमध्ये तेजस्वी यादव यांच्या निवडणूक नीतीपेक्षा वरचढ ठरेल आणि या निवडणुकीत प्रभावी ठरू पाहणाऱ्या तेजस्वी यादव यांच्या प्रतिमेहून राहुल गांधी यांची प्रतिमा उजळण्याच्या प्रयत्नापलीकडे या कथित हायड्रोजन बॉम्बचा परिणाम होईल, अशी शक्यता धूसरच आहे. लोकशाहीतील कोणत्याही यंत्रणांची कार्यपद्धती संशयातीत असली पाहिजे आणि त्यांच्या कामगिरीवर कोणतेही बोट दाखविले जाऊ नये ही रामराज्याची संकल्पना आहे. राहुल गांधी यांनी न्यायालयात न जाता या यंत्रणांवर जाहीर आरोपांचे सत्र अवलंबिले असल्याने, त्यातून तावूनसुलाखून निघण्याकरिता आयोगास अग्निपरीक्षा देणे भाग पडावे, हाच या राजकारणाचा बाज दिसतो.

बिहारच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाप्रणीत रालोआसमोर लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव यांनी मोठे आव्हान उभे केल्याची जोरदार हवा निर्माण करण्यात आली आहे. निवडणुकीच्या राजकारणात अशी रणनीती आखली जातेच. तेजस्वी यादव यांनीही प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीस सरकारी नोकरी देण्याचे आश्वासन दिले आहे. 'बिहार का तेजस्वी प्रण' असे त्यांच्या आश्वासनाचे वर्णन केले जात आहे. मागच्या निवडणुकीतही त्यांनी दहा लाख रोजगारांची हमी दिली होती; पण हे रोजगार कोठून आणणार, याचा कोणताच ठोस आराखडा त्यांनी मांडला नाही. त्यामुळेच बेरोजगारीमुळे हतबल झालेल्या आणि बौद्धिक विकासाची आस असलेल्या युवक मतदारांना तेजस्वी यादव यांची ही घोषणा भुलवू शकली नाही. निवडणुकीआधी केल्या जाणाऱ्या अशा घोषणांतून पुढे येणाऱ्या काही प्रश्नांची उत्तरे तेजस्वी यादव यांच्याकडे नाहीत. या घोषणांचा राज्याच्या तिजोरीवर होणारा परिणाम कसा रोखणार याचा काहीच आराखडा त्यांच्याकडे नाही. त्यामुळे घोषणांच्या अंमलबजावणीबाबत जनतेच्या मनात विश्वास रुजविणे तेजस्वी यादव यांना सोपे नाही. एका बाजूला तेजस्वी यादव यांची आश्वासनांची खैरात, राहुल गांधी यांचा निवडणूक आयोगाविरुद्धचा संघर्ष आणि दुसरीकडे गेल्या दहा वर्षांच्या केंद्रातील सत्ताकाळात आणि नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या कारकीर्दीत बिहारच्या जनतेमध्ये झालेल्या मानसिक परिवर्तनाची कसोटी या निवडणुकीत पुन्हा लागणार आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीतील भाजपाच्या विजयानंतर बुधवारी नवी दिल्लीत पक्षाच्या मुख्यालयाच्या प्रांगणात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आयोजित केलेल्या धन्यवाद बिहार मेळाव्यात पक्षाचे नेते आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विजयाचे नेमके विश्लेषण केले होते. तळागाळातील प्रत्येक माणसापर्यंत विकासाची फळे पोहोचून त्याच्या जगण्याला अर्थ प्राप्त करून देणे हा खरा विकास आहे, ही पक्षाची भावना मोदी यांनी त्या मेळाव्यात अधोरेखित केली होती. बिहारने ही भावना ओळखली, याचाही त्यांनी उल्लेख केला. बिहारचे राजकारण सामाजिक रचनेभोवती फिरत ठेवण्याचा भाजपेतर पक्षांच्या राजकारणाचा डाव या निवडणुकीत फसला होता. बिहार हे कर्तबगारांचे राज्य आहे. या राज्याने देशाला अनेक सनदी अधिकारी दिले. पोलिस सेवेत उल्लेखनीय काम करणारे अनेक अधिकारी बिहारमधूनच देशाच्या कानाकोपऱ्यात गेले. साहजिकच या राज्यातील प्रत्येक तरुणाच्या डोळ्यात उत्कर्षाची स्वप्ने कधीपासूनच रुजलेली आहेत; पण ती स्वप्ने साकारण्याच्या साधनांचा स्थानिक पातळीवर अभाव हे बौद्धिक विकासासमोरील मोठे आव्हान आहे. प्रशांत किशोर सारख्या नेत्याने आपल्या पक्षाचा प्रचारही या जाणिवेभोवती केंद्रीय ठेवण्याचा प्रयत्न चालविला आहे. भाजपाने समस्येच्या मुळाशी जाण्याचा निर्धार केला होता आणि बिहारमधील तरुणाला त्याच्या क्षमतांचा विकास घडविता येईल अशा शैक्षणिक सुविधा राज्यातच उपलब्ध करून देण्याची ग्वाहीदेखील दिली होती.

निवडणुकीआधीचे आडाखे आणि मतदारांची मानसिकता, मतदानाआधीची गणिते यांमध्ये खूप अंतर असते. बिहारच्या राजकारणाची गणिते राज्यातील सुमारे १४ टक्के यादव, सुमारे १८ टक्के मुस्लिम, ३० टक्के मागासवर्गीय, अनुसूचित जाती-जमाती, अन्य समाजाच्या मतपेट्यांवर केंद्रित होत असत. भाजपा आघाडीने या राजकारणास पूर्णविराम देऊन केवळ विकासाच्याच भाषेवर भर दिला. सर्व वयोगटांतील आणि समाजघटकांतील महिलांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महिला केंद्रित विकास योजनांवर दिलेला भर आणि त्याच्या जोडीला नितीश कुमार यांच्या सरकारने आपल्या सत्ताकाळात विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या शैक्षणिक योजना या मुद्यांनी जातिपातीच्या या प्रस्थापित राजकारणावर मात केली आहे. महिला हा भाजपाचा 'सायलेंट व्होटर' आहे, हे बिहारमधील महिलांनी भाजपाला दिलेल्या भरघोस पाठिंब्यावरून याआधीही सिद्ध झाले आहे. आता या निवडणुकीआधी बिहारमध्ये महिलांसाठी जाहीर केलेल्या पॅकेजमुळे यात भरच पडेल, असे चित्र विरोधकांनीही ओळखले आहे. बिहारच्या विधानसभा निवडणुकीतून उमटणारे राष्ट्रीय राजकारणाचे रंग राहुल गांधींचे भविष्य ठरविणार आहेत, यात मात्र शंका नाही.

---

## प्रासंगिक

**परिमल नळकांडे**

# वेदमंत्राहून आम्हां वंद्य, वंदे मातरम्।

समाजाला ऐक्याच्या सूत्रात बांधणारे व राष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा म्हणून भारतीयांच्या हृदयी असलेले 'माते तुला वंदन असो' असा साधा-सरळ अर्थ असलेले शब्द ज्याला हिमालयाची उत्तुंगता, गंगेची निर्मलता लागू पडते असे 'वंदे मातरम्' हे गीत. अत्यंत सरल शब्द आणि तरल भावना असलेल्या या गीतांच्या शब्दात मधुरता जरी असली, तरी या शब्दांनी देवीदेवतांच्या हाती असलेल्या शत्रुसंहारक अस्त्रांचे रूप धारण केले. राष्ट्राच्या, चळवळीच्या जडणघडणीत अनेक व्यक्तींचे, संघटनांचे कर्तृत्व व कामगिरीचे मोठे योगदान राहिले आहे. केवळ या एका गीताने किंबहुना त्यातील किमान दोन शब्दांनी राष्ट्राच्या इतिहासाला वळण देण्याचे उदाहरण अपवादात्मकच असावे. ते दोन शब्द म्हणजे वंदे मातरम्! हे एक आश्चर्यच म्हणावं लागेल. क्रांती आणि अहिंसा या दोन्ही विचारांचं एकत्रीकरण असलेले हे शब्द व दोन्ही विचारधारा ज्या गीतासमोर नतमस्तक होतात ते हे गीत प्रचंड लोकप्रिय ठरलं आहे.

बंकिमचंद्र चट्टोपाध्य यांच्या अलौकिक प्रतिभेतून १८७५ मध्ये 'वंदे मातरम्' हे गीत निर्माण झाले. बंकिमचंद्रांनी आपल्या प्राचीन परंपरेचे भान ठेवत केलेले राष्ट्र चिंतन; या चिंतनातून समृद्ध देशाचे पाहिलेले स्वप्न आणि मातृभूमीच्या सर्व पुत्रांमध्ये एकत्वाची भावना ठेवून समर्पणाचा केलेला निर्धार ही या गीताची वैशिष्ट्ये. त्यामुळेच वंदे मातरम् हे चिरंतर टिकणारी साहित्यकृती आहे. या गीताच्या बळावरच अनेक सर्वसामान्यांनी स्वतःला स्वातंत्र्यलढ्यात झोकून दिले, अनेकांनी हौतात्म्य पत्करले, भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या यज्ञात स्वतःला समिधा म्हणून समर्पित केले म्हणून हे गीत केवळ साहित्यकृती न राहता त्याहीपेक्षा सर्वोच्च स्थानावर आसनस्थ झालेला दैवी मंत्र ठरला आहे.

आपली संस्कृती मातृप्रधान आहे. देशाला मातृभूमी असे संबोधणे असा आदर्श अथर्वऋषींनी अथर्ववेदामधील पृथ्वीसूक्तात घालून दिला होता. विस्मृतीत गेलेली ही कल्पना १८५० च्या सुमारास बंगाली प्रतिभावंत कवी व संपादक असलेल्या ईश्वरचंद्र गुप्त यांनी 'जननी भारत भूमी आर केन थाक तुम्ही' या कवितेतून पुनरुज्जीवित केली. त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांचे शिष्य बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या अलौकिक प्रतिभेतून वंदे मातरम्च्या रूपाने अतीव सुंदर असा आविष्कार प्रकट झाला. बंकिमचंद्रांना बंगालमध्ये 'ऋषिबंकिम' असे संबोधले जाते. स्वतः बंकिमचंद्र ऋषितुल्य असल्यामुळे त्यांनी रचना केलेले 'वंदे मातरम्' या शब्दांना वेदमंत्रांचे स्थान मिळाले आहे. दरवर्षीप्रमाणे बंकिमचंद्र आपल्या जन्मगावी नौहाटी कांटलापाडा येथे १८७५ च्या आश्विन महिन्यात नवरात्र उत्सवानिमित्ताने गेले. अष्टमीच्या उत्तररात्री मां दुर्गेची पूजा करीत असताना त्या मूर्तीत त्यांना भारतमाता दिसल्याचा भास झाला आणि



राक्षस महिषासुराच्या जागी इंग्रज दिसू लागले. त्याचवेळी त्यांनी 'आमार दुर्गोत्सव' हा लेख नवमीच्या पहाटेला लिहिला; तेच 'वंदे मातरम्'चे प्रथम लिखित गद्य स्वरूप. या लेखानंतर अवघ्या एका महिन्याने कार्तिक शुद्ध नवमी ७ नोव्हेंबर १८७५ या दिवशी नौहाटी येथे बंकिमचंद्रांनी एक हाती 'वंदे मातरम्' संस्कृत भाषेमध्ये पद्य स्वरूपात लिहून पूर्ण केले. पुढे सात वर्षांनी १८८२ मध्ये 'आनंदमठ' कादंबरीत हे गीत त्यांनी कथानकात गुंफले. 'गीतांजली'कार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी १८९६ मध्ये कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेचे अधिवेशनात 'वंदे मातरम्' सादर करीत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. चेतनेचा आवाज व राष्ट्राचा आत्मा वंदे मातरम् बनले. महर्षी अरबिंदो, मॅडम भिकाजी कामा, कवी सुब्रमण्यम भारती, लाला हरदयाल, लाला लजपत राय या महापुरुषांनी त्यांची वर्तमानपत्रे व मासिकांच्या नावामध्ये 'वंदे मातरम्'चा समावेश केला. महात्मा गांधीसुद्धा अनेक वर्षे आपल्या पत्राचा शेवट 'वंदे मातरम्'ने करीत असत.

वंगभंग चळवळीच्या दरम्यान कलकत्ता येथील टाऊन हॉलमध्ये २० ऑगस्ट १९०५ रोजी सभेत अचानक कोणीतरी 'वंदे मातरम्' अशी घोषणा केली आणि या दोन शब्दांच्या सामूहिक गर्जनेने अवघा आसमंत दुमदुमून गेला. या प्रसंगापासून हे गीत स्वातंत्र्यलढ्याचे युद्धघोष बनले व इंग्रज सरकारला धडकी भाडवणारे शब्दरूपी अस्त्र बनले. बंकिमचंद्र 'वंदे भारत' असे न लिहिता 'वंदे मातरम' असे लिहीत. कारण भारतीय संस्कृतीच्या राष्ट्रवादाचे सूत्र मातृ पूजनात आहे. आपल्या जन्मभूमीचे दृश्यात्मक दर्शन व्हावे, असे सामर्थ्य या शब्दात आहे. भारतभूमी माझी मातृभूमी आहे; तिच्यासाठी मी स्वतः सर्वस्व अर्पिल, अशी भावना 'वंदे मातरम्'च्या उच्चारणातूनच प्रत्येकाच्या मनात निर्माण होते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्यानंतर २४ जानेवारी १९५० रोजी झालेल्या घटना समितीच्या शेवटच्या सभेत 'जन गण मन'ला राष्ट्रगीत म्हणून तर 'वंदे मातरम्'ला राष्ट्रीय गीताचा दर्जा देण्यात आला. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी राष्ट्रगीत व राष्ट्रीय गीत यांना समान सन्मान दिला जावा, असे यावेळी सांगितले. समाजाच्या राष्ट्रीय चेतनेसाठी 'स्व'च्या आधारावर राष्ट्र उभारणीच्या कार्यात समाजाला सक्रिय करण्यासाठी 'वंदे मातरम्' या पवित्र गीताचे पठन कुटुंब प्रबोधनाचा भाग व्हावे त्यातून परम वैभवी राष्ट्र निर्मितीच्या दिशेने अग्रेसित होता येईल.?

संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी तसेच मातृभूमीच्या प्रति समर्पण भाव जागृत करून तो चिरंतन तेवत राहावा याकरिता बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी वंदे मातरम् ही जी अजरामर दैवी कलाकृतीचा मंत्र रचला त्याचे पठन व पारायणे प्रत्येक भारतीयाच्या कुटुंबात झाले तर विश्वव्यापी, विश्वगुरू 'भारत' याची देही याची डोळा आपण निश्चितच पाहू शकू, याचा सार्थ अभिमान मी भारतीय म्हणून प्रत्येकाला असेल. 'वंदे मातरम' हे भारत ह्या विश्वव्यापी राष्ट्राचे आत्मगीत असून त्याची प्रेरणा सर्वांना मिळत राहो व राष्ट्रीय चेतना व राष्ट्रनिर्मितीच्या या पवित्र वेळी या महान दैवी मंत्राच्या भावनेचा अंगीकार भारतीयांमध्ये होवो. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला महान उद्देश देणाऱ्या व मातृभूमीला सुजलाम् सुफलाम् बनण्यासाठी प्रेरणास्रोत बनलेला हा मंत्र ज्याची 'नमस्ते सदा वसले मातृभूमे' ही पुढील आवृत्ती बनली. ज्यातून राष्ट्र प्रथम हा ध्यास घेणारे व्यक्तित्व निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून अविरत प्रयत्न होत आहेत. भारत माता ही नेतृत्वाची भूमी आहे. कर्तृत्वाची, गुरूंची भूमी आहे. अखिल विश्वाचे नेतृत्व करण्याची क्षमता असलेल्या या भारतभूमीचे मोठेपण निर्विवादपणे जगाने आज मान्य केले आहे; ते एकाच कारणाने, ते म्हणजे या भारतभूमीला आम्ही माता मानतो. तिला आम्ही सदैव नतमस्तक आहोत. म्हणूनच आज वंदे मातरम् या गीताचे १५० वर्षे पूर्ण होत असताना हे गीतही आपल्या ओठांवर सहज येते...

वेदमंत्राहून आम्हां वंद्य, वंदे मातरम्।

९८५०७८९५७४

---

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# इष्टाचा स्वीकार हीच श्रद्धा

आपण खरोखरच देवाची पूजा करतोय की, देवाच्या नावाने अधर्माचे तांडव करतोय, असा प्रश्न पडण्यासारखी परिस्थिती आजकालही उद्भवते. उदाहरण म्हणजे- नवस फेडण्याच्या नावाखाली नवजात बालकांना वेदना देण्याची प्रथा आजही अनेक ठिकाणी आहे. त्यातली एक प्रथा म्हणजे- देवाच्या कृपेची परतफेड म्हणून आई-वडील बाळाला थंड पाण्यात क्षणभर बुडवतात. त्याप्रसंगी भोवतालचे लोक टाळ्या वाजवतात, आरती म्हणतात आणि त्या लहान जिवाचे थरथरणारे शरीर त्या साऱ्यांच्या श्रद्धेसाठी एक माध्यम ठरते. अशी प्रथा कोणे एके काळी देवाला प्रसन्न करण्याच्या असोशीतून सुरू झाली असेलही. त्यावेळी आणि त्यानंतरदेखील बरेच काही घडले. त्या साऱ्यांचा उच्चार करण्याची आता गरज नाही. कारण ते दुरुस्त होऊ शकत नाही. गतकाळात काय झाले, याची उजळणी करण्यापेक्षा वर्तमान आणि भविष्य दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आपल्या समाजाने अनेक अनिष्ट प्रथा-परंपरा मागे सोडल्या. म्हणूनच आज भारतीयांचा बोलबाला जगभर आहे. श्रद्धा आणि संस्कृती न सोडताही हा समाज जगात नाव कमावता झाला, याचे कारण या समाजातील सामूहिक विवेकात दडलेले आहे. मात्र, आजच्या काळातही नदीत सोडलेले बाळ देवाच्या कृपेने वाचले तर देव पावतो आणि नशिबाने अपघात झाला तर देवाची मर्जी, असा प्रकार होत असेल तर ते धक्कादायक आणि धोकादायकही आहे. ईश्वरावरील श्रद्धा इतकी क्रूर आणि अमानुष असू शकत नाही. ईश्वराला फक्त माणुसकी हवी असते. माणसांचे आपसातले प्रेम हवे असते. श्रद्धेच्या नावाखाली त्याला कोणत्याही प्राणिमात्राला त्रास दिलेला चालत नाही. तरीही हे असे घडत असते तेव्हा धक्का बसतो. श्रद्धाळूंना देव पावतो, असे आपण



म्हणतो तेव्हा ईश्वरी शक्तीवर विश्वास ठेवून आपले कर्म करीत असलेल्यांचे अंतिमतः कल्याण होते, असाच त्याचा साधा अर्थ असतो. पण, श्रद्धेला अविवेकाची काजळी चढते तेव्हा त्यातून अंधश्रद्धेचा जन्म होतो आणि असे अघोरी काही तरी घडते आणि अशा श्रद्धाभावावरच प्रश्नचिन्हे उपस्थित केली जाऊ लागतात. देवावरचा विश्वास, व्रत, उपवास आणि नवस यांमुळे अनेकांना मानसिक बळ मिळते हे खरे आहे. जीवनातील संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य मिळते हेही खरे. पण, नवस फेडण्याच्या नावाखाली असे काही तरी अघोरी कृत्य होत असेल तर देवही त्यांना माफ करणार नाही. नवजात बालकांचा नवस फेडण्यासाठी केले जाणारे असले अघोरी प्रकार हे त्या कुटुंबासह साऱ्या समाजासाठी लांच्छनास्पद आहेत.

मध्यप्रदेशातील भैसदेही (जिल्हा बैतुल) येथे नवस फेडण्याच्या नावाखाली बालकांना नदीच्या पाण्यात सोडण्याची प्रथा आजही अस्तित्वात आहे. देवावर विश्वास ठेवणे आणि देवाच्या नावाने निरागसाच्या जिवाशी खेळणे यात फरक आहे. दुर्दैवाने अंधश्रद्ध व्यक्तींना यातील फरक कळत नाही. श्रद्धा माणसाला उन्नत करते तर अंधश्रद्धा अध:पतनाकडे नेते, हे अशा लोकांना समजावून सांगण्याची गरज आहे. नवस फेडण्याच्या नावाखाली बालकांना पाण्यात सोडण्यात कसलीही श्रद्धा नाही; ती मानवी मनाची भीती आणि पूर्णपणे अंधविश्वासच होय. काही परंपरा काळानुरूप बदलण्याची गरज असते. आधुनिक भारताला श्रद्धा हवी आहेच. डोळस श्रद्धा ही भारतीय समाजाची ओळख आहे, पण अंधश्रद्धा हा आपल्या समाजासाठी ठसठसता व्रण आहे, हेही तेवढेच खरे. नवस कोण्या एका जाती-धर्मातच केला जातो असे नाही. अडचणीत आलेली प्रत्येक व्यक्तू देवाचा धावा करते आणि इच्छा पूर्ण झाल्यावर त्याची परतफेडही करते, म्हणजे नवस फेडते. सश्रद्ध असलेल्या हिंदू समाजाची प्रतिमा प्रगतिशील आणि विज्ञानवादी समाज अशी आहे. अशा समाजाला बदनाम करण्यासाठी काही लोक नेहमीच टपलेले असतात. त्यामुळे असे प्रकार आपल्या भोवताली कुठेही घडत असतील, नजरेस येत असतील तर ते थांबविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. हिंदू समाजातील जाणत्या जनांची ही जबाबदारी आहे. आपला समाज प्रगत झाला याचा अर्थ प्रत्येकाच्या घरी श्रीमंती आली असा होत नसतो. समाज तेव्हाच खऱ्या अर्थाने प्रगत होतो, जेव्हा तो अनिष्टाला मागे सोडून इष्टाचा स्वीकार करतो आणि इष्टाचा स्वीकार हीच खरी ईश्वरी आराधना आणि हीच खरी श्रद्धा होय.

९८८१९०३७६५

---

## विशेष

**मोरेश्वर बडगे**

# विरोधी पक्ष लढूच शकत नाहीत!

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचं बिगुल वाजलं आहे. २ डिसेंबर रोजी पहिल्या टप्प्यात नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुका होणार आहेत. मतदार याद्या सदोष असल्याचे कारण पुढे करून निवडणुका पुढे ढकलू मागणाऱ्या विरोधी पक्षांना हा तडाखा आहे. त्यांना आता लढावेच लागेल; पण लढणार कसे? संविधानाचे 'लाल पुस्तक' दाखवून राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीत जनतेला भुलवले. त्यामुळे महाराष्ट्रात भाजपाला खड्डा पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नितीशकुमार, चंद्राबाबू नायडू यांची मदत घ्यावी लागली. विधानसभा निवडणुकीत कुठलाही नॅरेटिव्ह नव्हता. त्यामुळे विरोधकांनी मार खाल्ला. आता त्यांनी 'मत चोरी' नावाचा नवा मुद्दा शोधला आहे. मतदार याद्या सदोष आहेत, असे सांगून त्यांनी निवडणुकाच पुढे ढकला, याद्या दुरुस्त करून मग निवडणुका घ्या, असा धोशा चालवला आहे. लोकसभेत जिंकले तेव्हा विरोधकांना मतदार यादीतले दोष दिसले नाहीत. मुळात ते निवडणुकीला घाबरले आहेत. जनता आपल्याला जवळ करणार नाही, ही भीती त्यांना सतावते आहे. त्यातून हे नखरे सुरू झाले आहेत. पण निवडणुका होणार. विरोधकांना त्या लढाव्याच लागणार. नाही म्हणून सांगणार कोणाला? राजकीय पक्ष निवडणुकांसाठीच असतो. निवडणुकाच लढायच्या नाहीत म्हटले तर पक्षच संपतो. तुम्ही पाहाल. राज ठाकरेंपासून उद्धव ठाकरेंपर्यंत सारे लढतील. लढले नाही तर त्यांचेच लोक त्यांना सोडून बंडखोर म्हणून लढतील. शेवटी प्रत्येकाला आपापले राजकारण आहे.

शरद पवार कित्येक वर्षे सत्तेत होते. काही केले नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न त्यांना सोडवावा, असे वाटले नाही. मतदार याद्या सुधाराव्या, असे वाटले नाही. मात्र सत्ता गेली की मागायला हे मोकळे. मत चोरी विरोधी पक्षही रोखू शकतो. त्यासाठी निवडणूक आयोगाची गरज नाही. कोर्टात जायची गरज नाही. बुथवर चाणाक्ष पोलिंग एजंट ठेवले तर मत चोरी तिथल्या तिथे पकडता येते; पण हे करायची विरोधकांची तयारी नाही. त्यांना राजकारण करायचे आहे. प्रहारचे नेते बच्चू कडू चार वेळा आमदार होते. त्या काळात त्यांना शेतकरी आठवला नाही. आता रिकामपण आल्यावर शेतकऱ्यांचे आंदोलन चालवत आहेत. उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांचीही अशीच अवस्था आहे. मुंबईमध्ये उद्धव यांचे देऊळ पाण्यात आहे. २५ वर्षे एकहाती राहिलेली मुंबई महापालिका हातची जाणार या जाणिवेने उद्धव अस्वस्थ आहेत. त्या मानसिकतेतूनच त्यांनी २० वर्षांपूर्वी वेगळे झालेल्या भावाला सोबत घेतले. तरीही माहोल सुधारत नाही हे पाहून त्यांनी लोकांमध्ये संभ्रमावस्था पसरवणे सुरू केले आहे. निवडणूक



आयोगासारख्या संवैधानिक संस्थेविषयी लोकांमध्ये संशय निर्माण केला जात आहे. निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुले बनला, असे ते म्हणतात. त्या जोशात मतदार याद्यांची चिरफाड करताना ठाकरे बंधू थकत नाहीत. दुबार मतदारांचा विषय मांडताना विरोधकांनी केवळ मराठी माणसांचीच नावं सांगितली. हिंदू-मराठी माणसंच दोन-तीन वेळा नोंदणी करून भाजपाला जिंकवतात, असे त्यांना सुचवायचे आहे का? मतदार याद्यांमध्ये गफलत नाही, असे भाजपाने कधीही म्हटलेले नाही. पण विरोधकांनी लपवली ती मुस्लिम दुबार मतदारांची नावं भाजपा नेते आशिष शेलार यांनी उजेडात आणली. राष्ट्रवादीचे नेते रोहित पवार १२४३ मतांनी जिंकले. त्यांच्या मतदारसंघात दुबार मुसलमान मतदारांची संख्या ५५३२ आहे. नाना पटोले फक्त २०८ मतांनी जिंकले. तेथे मुसलमानांची दुबार मतं ४७७ आहेत. ही यादी ठाकरेंना का दिसली नाही? भोईर, पाटीलच का दिसले? मतदार याद्या सदोष आहे असे म्हणता, पण याच याद्यांच्या जोरावर महाराष्ट्र विकास आघाडीने लोकसभेच्या ३१ जागा जिंकल्या आहेत. तेव्हा तर कोणी ओरडा केला नाही. लोकसभेच्या वेळी होत्या त्याच मतदार याद्यांवर विधानसभा निवडणूक झाली. आपण जिंकलो तर सारे बरोबर. हरलो तर मतचोर हा विरोधकांचा शुद्ध कांगावा आहे. विरोधकांनी आखलेले हे 'फेक नॅरेटिव्ह' आहे. शेलारमामांनी ठाकरेंना बरोब्बर उघडे पाडले. मतदार याद्या निर्दोष असल्या पाहिजेत, असे साऱ्यांनाच वाटते. त्या आधार कार्डशी, बँक खात्याशी जोडल्या तरच ते होऊ शकते. पण तशी कोणाची इच्छा आहे? त्या ऐवजी मोर्चा काढणेच विरोधकांना आवडते.

मतदार याद्यांमधील घोळाकडे लक्ष वेधण्यासाठी ठाकरे बंधूंनी मुंबईत मोर्चा काढला. या मोर्चाला 'सत्याचा मोर्चा' असे नाव दिले गेले. सत्य शोधावं लागणाऱ्या या मोर्चात मुलूखमैदान तोफ म्हणून ओळखले जाणारे उबाठाचे खासदार संजय राऊत नव्हते. 'गंभीर आजार झाल्याने दोन महिने आपण सार्वजनिक जीवनात दिसणार नाही' असे संजय राऊत यांनी मागेच जाहीर केले होते. मात्र पूर्ण मोर्चात त्यांचे नाव घेण्याची इच्छाही कोणाला झाली नाही हे नवलच. सकाळी नित्यनियमाने सत्ताधाऱ्यांविरोधात राऊत सडकून टीका करत. गेली सहा वर्षे ते ही गोष्ट नित्यनियमाने करत आले आहेत. सत्ताधारी 'सकाळचा भोंगा' म्हणून त्यांची टिंगल उडवतात तो भाग वेगळा. पण हा भोंगा सध्या बंद आहे. नियती कोणाला चुकली? असे म्हटले जाते तेच खरे. मात्र त्यांची दखल सर्वप्रथम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घ्यावी हेही नवलच. 'तुमच्या तब्येतीत सुधारणा होवो यासाठी मी प्रार्थना करतो' असे ट्विट मोदींनी केले. दैनिकाचा जाहिरात व्यवस्थापक, वार्ताहर, पुढे कार्यकारी संपादक, नंतर शिवसेनेचे राज्यसभा सदस्य या विविध रूपात राऊतांची ओळख द्यावी लागेल. बाळासाहेब ठाकरे यांच्या जवळचे ते होते. आताही उद्धव ठाकरे यांचा चेहरा म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाते. चांगल्या आणि वाईट अर्थाने त्यांनी शिवसेनेला सदा चर्चेत ठेवले. असा मोहरा निवडणुकांच्या ऐन रणधुमाळीत मैदानात नाही, याचा उबाठाला नक्कीच फटका बसणार आहे. राऊत यांना नक्की काय झाले हे अजून बाहेर आलेले नाही. मात्र, त्यांची जागा कोण घेणार याची महाराष्ट्राला उत्सुकता आहे. आंदोलनाचा विषय येतो तेव्हा एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते. मुळात विरोधी पक्षच उरला नाही. आंदोलन करणार कोण? जनतेची लढाई लढणे हा मूळ धर्म विरोधी पक्ष विसरले. आताही आंदोलनं होतात; पण ती टीव्हीवरच्या कॅमेऱ्यापुरती. कॅमेरे बंद झाला की आंदोलन संपते. पूर्वी जॉर्ज फर्नांडिस, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर आदी नेते लाठ्या खात रस्त्यावर आडवे होत. आताच्या हायफाय आंदोलकांना साधेही खरचटत नाही. पण म्हणून आंदोलनं संपली अशातला भाग नाही. आंदोलनं होतात. विरोधी पक्ष त्यात उतरतच नाही. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी तब्बल तीन वर्षे आंदोलन केले. पण विरोधी पक्षाने बघ्याचीच भूमिका घेतली. बच्चू कडू यांच्या शेतकऱ्यांच्या ताज्या आंदोलनात विरोधकांनी झोकून देणे अपेक्षित होते, पण विरोधी पक्ष अलिप्त राहिले. त्यामुळे अपेक्षित रिझल्ट मिळत नाहीत. मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी निघालेला जीआर फुसका निघाला आणि कडू यांच्या हाती कर्जमाफीचे गाजर आले. अण्णा हजारे यांच्या लोकपाल आंदोलनात भाजपा पूर्ण ताकदीने उतरला होता. लोकचळवळ उभी करण्याकरिता प्रचंड मेहनत करावी लागते. तसली आंदोलन हल्ली दुर्मिळ झाली आहेत.


९८२२२६२७३५

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

## वन विभागाला जागे करण्याची गरज

केंद्र सरकार जनतेच्या हितासाठी कटिबद्ध आहे. मात्र राज्यातील वाढते राजकारण सामान्य माणसाला विचार करायला लावणारे आहे. शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्यात सध्या ठिकठिकाणी बिबट्या हा वन्यप्राणी आढळून येतो आहे. जिल्हयतील खेड, शिरुर आदी तालुक्यात बिबट्यांनी काही शेतकऱ्यांवर हल्ला केल्याचीही जोरदार चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे ''कुत्रे कमी आणि बिबट जास्त'' अशी टीकाही अनेकांकडून होत आहे. वनविभाग सतर्क असून यासाठी पुरेपुर प्रयत्न सुरू आहेत. मात्र या बाबीकडे लक्ष देण्याची गरज आहे.



अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालये गावाबाहेर असल्याने धोका संभवण्याची शक्यता नाकारता येत नाही. परराज्यातून बिबटे राज्यात येत नाही ना, असा प्रश्नही मनात येतो. आजही ग्रामीण भागात, शेतशिवारात वन्यप्राण्यांचा मोठा हैदोस पाहायला मिळतो आहे. रानडुक्कर, रोही, माकडे यांच्यामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शेतात अनेकदा शेतकऱ्यांवरही हल्ले होतात. माणसाचे जीवन एवढे स्वस्त झाले का? मंत्रिमहोदय आणि वनविभागाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. मानवी वस्तीमध्ये राहून प्रामाणिकपणे जगणारे पाळीव कुत्रे यांची संख्या कमी होणार नाहीत. त्यांच्यावरही बिबट्यांचे हल्ले होणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. तातडीने सापळे रचून खुलेआम फिरणाऱ्या बिबट्यांचा बंदोबस्त करावा,

**सचिन नागरे**/९६०४३२१४३२

## वाचक पत्रे

## पालिका निवडणुकीचा उत्सव प्रारंभ

नगर पालिका निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. शहरात राजकीय चर्चा, उमेदवारांची धावपळ, कार्यकर्त्यांची लगबग, पोस्टर-बॅनरची गर्दी आणि सोशल मीडियावर सुरू झालेले प्रचारयुद्ध या सर्वांमुळे आता वातावरणात एक वेगळाच 'उत्सव' जाणवू लागला आहे. होय, हा उत्सव आहे लोकशाहीचा, जनतेच्या सत्ताधिकाराचा आणि नागरी जबाबदारीचा! नगर पालिका निवडणुका म्हणजे केवळ सत्तेचा बदल नाही, तर शहराच्या भविष्याची दिशा ठरवणारा निर्णायक टप्पा आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, नाल्या, उद्याने, बाजारपेठा ही केवळ सेवा नाहीत; हीच आपल्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाची गती आहेत. त्यामुळे मतदारांची निवड, त्यांचा विचार आणि निर्णय या सर्वांची किंमत प्रचंड आहे. आजची निवडणूक जनतेसाठी एक आरसा आहे. या आरशात उमेदवारांचे वचन, कामगिरी, प्रामाणिकता आणि जनतेशी असलेला संवाद स्पष्टपणे दिसतो. गेल्या पाच वर्षांत कोण खरंच जनतेसोबत उभा राहिला, कोण फक्त निवडणुकीच्या वेळीच दिसतो आणि कोणी खऱ्या अर्थाने विकासाला दिशा दिली हे सर्व मतदार ओळखू शकतात. आजच्या राजकीय वातावरणात प्रचाराचे माध्यम बदलले आहे. एकेकाळी घराघरापर्यंत जाऊन घेतलेला संवाद आता सोशल मीडियावरच्या पोस्ट आणि व्हिडीओंमध्ये परिवर्तित झाला आहे. परंतु जनतेच्या मनात पोहोचणारी गोष्ट अजूनही तीच आहे प्रामाणिकपणा आणि कामाची नोंद. या बळावरच उमेदवार निवडून येतील, हे लक्षात असले पाहिजे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस

tbedit2016@gmail.com

---

## आजचे संघगीत-३९

शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५

### करी बांधु या पवित्र कंकण

करी बांधु या पवित्र कंकण ॥धृ.॥

इतिहासाच्या पानोपानी पूर्व दिव्य ते बसले लपुनी
रम्य भविष्याची त्यामधुनी भव्य मंदिरे पुनश्च उभवुन ॥१॥

निजरुधिराची अर्घ्य अर्जुन ज्यांनी केले स्वराष्ट्रपूजन
कृतज्ञतेने तयांस वंदुन कर्तव्याचे करू जागरण ॥२॥

स्वार्थाचे ओलांडुन कुंपण व्यक्तित्वाचा कोषहि फोडुन
विसरुन अवघे अपुले मीपण विराट साक्षात्कार जागवुन ॥३॥

जो हिंदू तो अवघा माझा, घोष एक हा फिरून गर्जा
मुक्तिमार्ग हा एकच समजा, अन् सर्वांना द्या समजावुन ॥४॥

ध्वजराजाला साक्ष ठेवुनी आज बोलु या निश्चयवाणी
शुभसंकल्पा हीच पर्वणी राहिल निष्ठा उरी चिरंतन ॥५॥



# आगामी निवडणुकीसाठी सर्व ताकदीनिशी सज्ज व्हा : उपमुख्यमंत्री अजित पवार

## सोलापूर शहर जिल्ह्याची मुंबईत झाली आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ नोव्हेंबर-**

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सोलापूर शहर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची ताकद वाढवा. निवडणुकीसाठी सर्व ताकदीनिशी सज्ज व्हा. अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूर शहर जिल्हाच्या अनुषंगाने मुंबईत बोलावलेल्या आढावा बैठकीत दिल्या.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले पाहिजे.सर्व ताकद पणाला लावा असे आवाहन देखील अजित पवार यांनी केले.

बैठकीस प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, सोलापूर जिल्ह्याचे संपर्क मंत्री तथा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा तथा राष्ट्रवादीचे नेते रूपाली चाकणकर, सोलापूर शहराध्यक्ष संतोष पवार, जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, आनंद चंदनशिवे, सचिव प्रमोद भोसले, आनंद मस्तारे, इरफान शेख आदींसह प्रमुख पदाधिकारी, नेतेमंडळी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. आढावा बैठकीत सोलापूर शहराचे अध्यक्ष संतोष पवार यांनी शहराच्या कार्याचा आढावा अजित पवार यांच्यासमोर सादर केला. शहराच्या निवडणुकीसाठी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते सज्ज असून, महापालिका निवडणुकीसाठी सर्वच्या सर्व जागा लढण्याची तयारी आहे. सर्व ताकद लावून निवडणूक लढवू आणि जिंकू असा आशावाद देखील पवार यांनी या बैठकीत व्यक्त केला. त्यानंतर संजय शिंदे आणि कल्याण काळे यांनी देखील जिल्हास्तरावरील नगरपरिषद आणि नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आपल्या कार्याचा आढावा बैठकीत सादर केला. त्यांनी देखील आगामी निवडणुका स्वबळावर जिंकण्याचे योजना आखल्या असून, जास्तीत जास्त जागा जिंकून आणण्याचे आश्वासन यावेळी दिले. निवडणुकीच्या त्या अनुषंगाने सर्व पदाधिकारी कार्यकर्ते कार्य करत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तदनंतर प्रदेश उपाध्यक्ष म्हणून किसन जाधव आणि आनंद चंदनशिवे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. या बैठकीस सोलापूर शहर जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# व्हॉईस ऑफ मीडिया सोलापूर जिल्हाध्यक्षपदी बालाजी फुगारे; उपाध्यक्षपदी तौफिक नदाफ

**मुंबई, दि. ६ नोव्हेंबर-**

व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम या पत्रकारांच्या जागतिक संघटनेची सोलापूर जिल्हाध्यक्षपदी बालाजी फुगारे तर उपाध्यक्षपदी तौफिक नदाफ यांची निवड झाली.



बालाजी फुगारे



तौफिक नदाफ

संघटनेची सोलापूर जिल्हा नूतन कार्यकारिणी जाहीर झाली आहे. यात सोलापूर जिल्ह्यातील अनेक पदाधिकाऱ्यांचा राज्य कार्यकारिणीतही समावेश करण्यात आला आहे. संस्थापक अध्यक्ष संदीप काळे आणि प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांच्या उपस्थितीत पंढरपूर येथे झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. **अन्य पदाधिकारी असे :** राज्य संघटक सुरज सरवदे, सोलापूर महानगराध्य धनराज बगले, सोलापूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष माऊली डांगे, राज्य कार्यकारिणी सदस्य सौरभ वाघमारे, मंदार लोहकरे आणि रवी लव्हेकर. विविध तालुक्याचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य असे : सुरज कौलगे, गणेश गांडुळे (पंढरपूर), सचिन राठोड (उत्तर सोलापूर), अरिफ नदाफ, राजदत्त रसाळगेकर (दक्षिण सोलापूर), जहूर सय्यद, मैनुद्दीन नदाफ, उजेफ इनामदार (खजिनदार, सोलापूर शहर मध्य), शितलकुमार मोठे, हर्षवर्धन गाडे (करमाळा), सिद्धेश्वर माने, शब्बीर मुलानी (सांगोला), बाळकृष्ण गायकवाड (माढा), स्वागत खपाले, अण्णा भोसले (माळशिरस), रोहिदास भोरकडे, बापू मासाळ (मंगळवेढा),

**पंढरपूर शहर :** जगदीश डांगे, नागेश काळे, गोपाळ माळी (सचिव), पूजा खपाले (प्रसिद्धीप्रमुख), समाधान व्हनसाळे (खजिनदार), अजित देशपांडे (कार्याध्यक्ष). सदस्य : श्रीराम थेटे, माऊली लोखंडे, तेजस गांजाळे, संदीप बागल, अमोल माने आणि सूर्यकांत माने. **मोहोळ :** विजय पुजारी, नानासाहेब ननवरे , वैभव जावळे (खजिनदार), वसीम शेख (सचिव), भैय्यासाहेब कांबळे (सहसचिव), सदस्य- पद्माकर सोनटक्के, बाळासाहेब पारवे, दिनेश सातपुते, योगेश शिंदे सोमनाथ मुसंडे.

**सोलापूर शहर :** धनराज बगले, विजय पारसेकर. सदस्य : रश्मी मोहोळकर, आकाश इंगळे, तेजस मुद्दे, राजेश भोई, कोकणे दत्तात्रय संपकाळ, चेतन लिघादे, भावना मंगलपल्ली, अक्षदा चव्हाण, दत्ता केरे आणि मंजुषा दोरकर.

## पान १ वरुन

# शेतकरी मदतीपासून वंचित

बाधित क्षेत्र ६ लाख ०४ हजार ६४१.४३ हेक्टर इतके असून, या सर्वांचा एकूण अपेक्षित निधी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ इतका असून, याचा फायनल अहवाल शासनाकडे नुकताच पाठविला आणि त्यास पूर्णपणे मंजुरीही मिळाली आहे. त्यानुसार पूर्ण रक्कम मंजुरीचा जीआरही आला आहे. यानुसार आता शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट रक्कम जमा होवू लागली असून, ॲग्रीस्टॅक केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना थेट मदत मिळत आहे. ही रक्कम मिळविण्यासाठी आता ई-केवायसीचीही गरज नाही. यामुळे शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकमध्ये आपले नाव नोंदवून नुकसान भरपाई आपल्या बँक खात्यावर पाडून घ्यावी, असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. जिल्ह्यात ६ लाख ९० हजार ७३६ इतके पीएम किसान सन्मान योजनेत शेतकरी समाविष्ट आहेत; यातील ६ लाख ५३ हजार १०७ शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक केलेला आहे. यामुळे याद्या जसजशा अपलोड होत आहेत; त्याच धर्तीवर शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसेही पडत राहणार आहेत. हे पैसे दिल्लीतून येत असल्याने सर्व शेतकऱ्यांची टॅली करूनच ते पैसे टाकत असल्याने पैसे मिळण्यास विलंब लागत आहे. असाही निर्वाळा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला आहे. यामुळे शेतकऱ्यांनी कसलाही गैरसमज करून घेवू नये, सर्वच शेतकऱ्यांच्या खात्यावर हे पैसे येणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या महापुरात अनेकांची शेती खरडून गेली आहे; अनेकांचा ऊस व फळबागा वाहून गेल्या आहेत; विहिरी बुजल्या आहेत, अशा शेतकऱ्यांना येत्या थोड्याच दिवसात पैसे मिळणार आहेत. अतिवृष्टीची नुकसान भरपाई झाल्यावर या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीचा हात मिळणार असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.

# अभ्यासाच्या टेंन्शनमुळे तरूणीची आत्महत्या

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर -**

अभ्यासाच्या टेंन्शनमुळे सुरतगाव (ता. तुळजापूर) येथे २१ वर्षिय तरूणीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना बुधवारी रात्री ११ च्या सुमारास घडली. कल्पना गजेंद्र बोचरे (वय २१, रा. सुरतगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे आत्महत्या केलेल्या तरूणीचे नाव आहे. कल्पना बोचरे या बारामती येथील एका महाविद्यालयात बी कॉमच्या दुसऱ्या वर्गात शिक्षण घेत होत्या. ५ नोव्हेंबर रोजी रात्री ११ च्या सुमारास राहत्या घरी असताना कल्पना बोचरे हिने अभ्यासाच्या टेंन्शनमुळे तणावातून पिकावर फवारणी करण्याचे कीटकनाशक औषध प्राशन केले. त्यामुळे कल्पनाला त्रास होऊ लागल्याने मामा कृषणा यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉ. ओंकार तलकोकुल यांनी घोषित केले.


## कळंब नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२५

### मतदान केंद्रनिहाय मतदान यादी प्रसिध्दी सुचना

या सुचनेद्वारे कळंब शहरातील सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, कळंब नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक-२०२५ कामी मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाद्वारे मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला होता. त्यानुषंगाने आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी मतदान केंद्र निहाय मतदार यादी प्रसिध्द करणेकरीता मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशानुसार मतदान केंद्र निहाय मतदार यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर मतदान केंद्र निहाय मतदार यादी नगर परिषदेचे अधिकृत संकेतस्थळ : https:mahaulb.in/MahaULB/index-home आणि नगर परिषद कळंब कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध राहील. सदर वेबसाईटवरुन मतदार यादी डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**ठिकाण : कळंब**
**दिनांक : ०७/११/२०२५**

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद कळंब**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस डी. सोलापूर, सब डी व ता. बार्शी येथील व आसपास भागातील रहिवाशी यांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डी. सोलापूर सब.डी.व ता. बार्शीपैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील मौजे नाईकवाडी प्लॉट, परंडा रोड, १०० फुटी रस्त्या जवळ असलेला आर.सी.सी. बंगा त्याचा सर्वे नं. ४१७/१ब४ याचा जुना गट सर्वे नं. ९१८ व नवीन गट क्र. ९२४ यातील पूर्वेकडील प्लॉट क्रमांक ५ याचे एकूण क्षेत्र १६५० चौ.फुट १५३.२८७ व १५३.२८७ व १.५३२८ आर चौ.मी. यास याचे चतूःसिमा पूर्व-प्लॉट नं-१६ श्री गायकवाड यांचे घर, दक्षिणेस-प्लॉट नं- ६ श्री गांधी, पश्चिमेस-सदर प्लॉट नं. ५ पैकी उर्वरित क्षेत्र १६५० चौ. मी. उत्तरेस- अंतर्गत रस्ता २० फुट येणेप्रमाणे चतुःसिमेतील आतील बांधकाम असलेला बंगला व त्यातील सर्व फर्निचर सह व वहिवाटीच्या हक्कासह व या जागेची पाणी, वागणूक उत्तर बाजूने आहे. आतील सर्व तदंगभूत वस्तु हक्कासह येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही समीना अस्लम शेख रा. नाईकवाडी प्लॉट, बार्शी जी. सोलापूर यांच्या मालकीची कब्जे वहिवाटीची असून त्यांनी आमचे अशीलास कायमखुश खरेदी देण्याचे ठरवून ईसार अन्वये इसारा पोटी रक्कम घेतलेली आहे. समीना अस्लम शेख यांनी सदरची मिळकत ही निर्वेध निर्जोखमि व बिनबोजाची असल्याबाबत आमचे अशिलास खात्री दिली आहे.

सबब या जाहिर नोटिसिने तमाम जनतेस कळविण्यात येते की, ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसाच्या आत वर नमूद मिळकतीबाबत कोणाचे काही हक्क, अधिकार, पोटगी, भाडेपट्टा, करारनामा, इसारपावती, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, गहाणखत, बँक प्रकरण, चोळी-बांगडी ई. काही व्यवहार असल्यास मुदतीत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह खाली नमूद पत्त्यावर सक्षम भेटून खात्री करून पटवून घ्यावी. मुदतीत कोणाची काही तक्रार न आल्यास सदरची मिळकत निर्वेध निजोखमी व बिनबोजाची आहे असे समजून ग्रहित धरून आमचे अशील खरेदीबाबतचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाची काही एक तक्रार चालणार नाही म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

**ही जाहीर नोटीस दिली तारीख - ०६/११/२०२५**

सही/-

**सही/-**
**ॲड. अक्षय ना. बिडबाग**
जिल्हा व अति. सत्र न्यायालय, बार्शी
Reg.No. MAH/8545/2021
Adv.Code-2765(M-7972788123)

## जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अ. नं. ११०/२०२५
पुढील नेमली ता. १३/११/२०२५
नि.नं.६

बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
(मे. एच.यु.यु.पाटील सो यांचे कोर्टात)

चंद्रकांत कल्याण आरगडे, वय ३१ वर्ष- ... अर्जदार
धंदा. शेती, रा. तावडी, ता. बार्शी
जि. सोलापूर
विरूध्द
कोणी नाही ...सा.वाला

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद ठिकाणचा रहिवासी असून त्याचे कल्याण लक्ष्मण आरगडे हे वडिल होते तर लिलावती कल्याण आरगडे ही आई होती. सदर अर्जदाराचे वडिल कल्याण लक्ष्मण आरगडे हे दि. ६/४/२०२१ रोजी मौजे तावडी ता. बार्शी येथे मयत झालेले असून अर्जदाराची आई लिलावती कल्याण आरगडे या दि. ६/८/२०२१ रोजी श्रीराम हॉस्पीटल बार्शी येथे उपचारादरम्यान मयत झालेली आहे. मयत कल्याण लक्ष्मण आरगडे व लिलावती कल्याण आरगडे यांना यातील अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस असून अर्जदाराशिवाय मयतास अन्य कोणतीही कायदेशीर वारस नाही अर्जदारास त्यांचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता अर्जदारास कायदेशीर वारस असलेबाबत वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची गरज भासलेली आहे. सदर वारस/हेअरशिप अर्जदाराकडे नसलेले अर्जदारास अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागत आहे असे कथन करून अर्जदाराने वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनासंबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले ता. १३/११/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरूपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोटाचे पुढील योग्य ते हुकुम होतील. हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे ता. १७/१०/२०२५

**वरिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, बार्शी

**सही**
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे भोसरे, ता. माढा, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अ) डि. सोलापूर सब डि. व ता. माढा पैकी भोसरे येथील बिनशेती मिळकत गट नंबर ४७/५/९ क्षेत्र ०० हे. ०२.७८.५६ आर चौ.मी. आकार ०२ रू. ८० पैसे ही मिळकत आमचे अशिलांचे पती व वडील उमेश विठ्ठल शेळके व त्यांचे भाऊ उदय विठ्ठल शेळके यांनी एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून खरेदीखत दस्त क्रमांक २११६/२००५ अन्वये सामाईकात खरेदी केलेली आहे. त्यानंतर उदय विठ्ठल शेळके यांनी त्यांचे हिश्याची दक्षिणेकडील संपूर्ण मिळकत त्यांचा मुलगा आदित्य उदय शेळके याचे नावे बक्षीसपत्र दस्त क्रमांक ३५१९/२०१८ अन्वये दिनांक १९/०७/२०१८ रोजी केलेली आहे. बक्षीसपत्र करून देणार यांचे नाव कमी करणे क्रमप्राप्त असताना देखील गट नंबर ४७/५/९ मधील उर्वरीत क्षेत्रावर आमचे अशिलांचे नावाबरोबर उदय विठ्ठल शेळके यांचे नावाची नोंद पोकळ स्वरूपात राहिलेली आहे. तसेच दरम्यानचे कालावधीत आमचे अशिलांचे पती व वडील उमेश शेळके हे मयत झालेनंतर त्यांचे वारसदार म्हणून आमचे अशिलांचे नावाची नोंद सदर क्षेत्रावर झालेली आहे.

तसेच ब) मौजे भोसरे, ता. माढा, जि. सोलापूर येथील बिनशेती गट नंबर ४७/५/२ क्षेत्र ०० हे. ०२.७८.७३ आर चौ.मी. आकार ०५ रू. ६० पैसे ही मिळकत आमचे अशिलांचे सासरे व आजोबा विठ्ठल त्रिंबक शेळके यांचे नावे असून सदरची मिळकत ही एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातून विठ्ठल त्रिंबक शेळके यांचे नावे खरेदी केलेली आहे. सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचे पती व वडीलांनी तसेच सासरे व दिर यांनी एकत्रात २ बीएचके घराचे आर.सी.सी बांधकाम केलेले असून सदर घरामध्ये आमचे अशिल व त्यांचे सासू, सासरे व दिर एकत्रात राहण्यास आहेत.

सदर वर नमूद दोन्ही मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा कायदेशीर अविभक्त हक्क हिस्सा असून सदर मिळकतीचे अद्याप सरस निरस मानाने वाटप विभाजन झालेले नाही. असे असताना सदर उदय विठ्ठल शेळके हे बेकायदेशीरपणे त्यांचे नाव वर कलम अ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे ७/१२ पत्रकी असलेला गैरफायदा घेऊन तसेच वर कलम ब मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमधील आमचे अशिलांचा कायदेशीर हक्क हिस्सा डावलण्याच्या उद्देशाने विठ्ठल त्रिंबक शेळके हे उदय शेळके याचेशी संगनमत करून सदर मिळकतीमधील क्षेत्र व घर विक्री हस्तांतर करण्याच्या प्रयत्नात असून तशी आमचे अशिलांना धमकी दिलेली आहे. यापूर्वी कुटुंबाच्या उत्पन्नातून मौजे चौभेपिंपरी, ता. माढा येथील आमचे अशिलांचे सासरे यांचे नावे खरेदी केलेली मिळकत आमचे अशिलांचे परस्पर विक्री करून विल्हेवाट लावलेली आहे. आमचे अशिल हे वर नमूद मिळकतीमधील त्यांचा असणारा कायदेशीर हक्क हिस्सा वाटून विभागून मिळणेसाठी योग्य त्या न्यायालयात कायदेशीर दाद मागणार आहेत. तसेच एम.आय.डी.सी. कुर्डूवाडी येथील प्लॉट बाबत देखील वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दिवाणी न्यायालयात वाद प्रलंबित आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीबाबत उदय विठ्ठल शेळके व विठ्ठल त्रिंबक शेळके यांचेसोबत कोणीही साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, बक्षीसपत्र, लीज, लीन, भाडेकरार, बटईपत्र, नोटरी दस्त, ईसारपावती या अथवा तत्सम स्वरूपाचा कोणत्याही प्रकारचा दस्त नोंदविण्यात येवू नये तसेच कोणत्याही वित्तीय संस्थेने, खाजगी सावकाराने, बँकेने वर नमूद मिळकतीवर कर्ज देऊ नये. याउपरही कोणी तसा व्यवहार केलेस तो मुलतः रद्दबातल ठरणार असून तो आमचे अशिलांचे वर नमूद मिळकतीमधील कायदेशीर हक्कांवर मुळीच बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. तारीख- ०६/११/२०२५

सही/-
**अशिलातर्फे ॲडव्होकेट धनाजी पी. बागल**
बी.एस.एल.एल.एल.बी
ऑफीस महात्मा फुले शॉपिंग सेंटर गाळा नं. ११
गांधी चौक, कुर्डुवाडी ता. माढा. जि. सोलापूर
मो-९८९०६१६८६५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील **पेठ-शास्त्री नगर क झोपडपट्टी** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. १७२ ही मिळकत घरजागा आमचे अशिल **१) शशिकांत वसंत कटकधोंड, २) विजय वसंत कटकधोंड** यांचे मयत वडिल **कै. वसंत रखमाजी कटकधोंड** यांचे नावावर असून याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागाचे कर आकारणी विभागास नोंद आह. तसेच आमचे अशिलांचे वडील **कै. यशोदा रखमाजी कटकधोंड** यांच दि. २४/०७/२०१७ रोजी मृत्यु झालेला आहे व तसेच त्यांचे आई **यशोदा वसंत कटकधोंड** हिचेही दि. २५/११/२०२२ रोजी मृत्यु झालेला आहे. या दोघांचे मृत्युपश्चात वर नमुद आमचे दोघे अशिल वारस आहेत. त्यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाही.

सदरहू घरजागेत आमचे अशिल १) शशिकांत वसंत कटकधोंड, २) विजय वसंत कटकधोंड हे दोघेच कायमस्वरूपी राहणेस आहेत. सदरहू घर नं. १७२ शास्त्रीनगर क झोपडपट्टी या मिळकतीवरील आमचे अशिलाचे वडिल कै. वसंत रखमाजी कटकधोंड यांचे नाव कमी करून अशिल **१) शशिकांत वसंत कटकधोंड, २) विजय वसंत कटकधोंड** यांचे नावाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नावे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल म.न.पा.कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार. मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी असू समजून आमचे अशिल त्यांचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**ही जाहीर नोटीस दिली तारीख - ६/११/२०२५**

**सही/-**
**ढेकणे एस. एम. (ॲडव्होकेट)**
रा. १२६-अे वाणी गल्ली बाळे,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी व ता. बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन-डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर नगरपरिषद हद्दीतील वि.क्र. ३९ मधील मिळकत याचा तपशीलः- **जुना गट नं. ९१३, याचा नवीन गट नं. ९१९/१ यापैकी गुंठेवारी निमाधीन झालेला प्लॉट नं. १०**, याचे एकूण क्षेत्रफळ हे. १६५.०० चौ. मी. **यापैकी दक्षिण बाजूचा प्लॉट याचे क्षेत्रफळ हे. ९२.९३ चौ. मी.** आहे असा खुला प्लॉट. **यासी चतुःसीमा पूर्वेस** :- ०६.०० मी रूंदीचा रस्ता, दक्षिणेस :- ०६.०० मी रूंदीचा रस्ता, **पश्चिमेस** :- प्लॉट नं. ११, **उत्तरेस** :- प्लॉट नं. १० पैकी उर्वरित प्लॉट क्षेत्र, येणे प्रमाणे चतुःसीमा पूर्वक खुला प्लॉट, जाणेयेणे साठी रस्ता व पाणी वागणूक जागेच्या **पूर्व आणि दक्षिण** बाजूच्या रस्त्याने जाते व आहे. येणे प्रमाणे तदंगभूत वस्तू हक्कासह खुला प्लॉट.

सदर प्लॉट हा **सौ. सुनिता नवनाथ पायघन** यांच्या खरेदी मालकीचा असून प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे व सदर प्लॉटच्या ७/१२ हक्कापत्रकी त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरचा प्लॉट ते विक्री करू इच्छितात, **गुंठेवारी निमाधीन** प्लॉट विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने **सौ. सुनिता नवनाथ पायघन** यांनी सदरचा गुंठेवारी निमाधीन प्लॉट विक्री करणे बाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे, व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशील बरोबर ठरविला आहे.

सदर खुला प्लॉटवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबधं असल्यास सदरची **नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसाचे आत** आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून खुला प्लॉट/मिळकत बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत/खुला प्लॉट खरेदी करतील. खरेदी नंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्वक जाहीर नोटीस दिली.
**ता. ०६/११/२०२५**

**सही/-**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर**
ऑफिस पत्ता :- गाळा नं. ५१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स, बार्शी. ता. बार्शी, जि. सोलापूर
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)


## सोलापूर विमानतळ परिसरात

# पतंगबाजी, लेझर लाईट, हॅलोजन वापरण्यास मज्जाव

**सोलापूर :** सोलापूर विमानतळ परिसरात पतंगबाजी, लेझर लाईट, हॅलोजन वापरण्यास तसेच मांसाहाराचे वेस्टेज टाकण्यास पोलिस आयुक्तालयाकडून मज्जाव करण्यात आला आहे. असे करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा पोलिस आयुक्तालयाकडून देण्यात आला आहे. विमानतळ परिसरात कोणीही पतंगबाजी अथवा पतंग उडवणार नाही, लेझर लाईट शारपी लाईट अथवा हवेतील हॅलोजन प्रकाश ज्योत टाकणारे लाईट वापरण्यास बंदी आहे. तसेच विमानतळ संरक्षक भिंतीवरून कोणीही आत जाणार नाही. विमानतळ परिसरातील मटण विक्रेते यांच्या दुकानातील वेस्टेज विमानतळ संरक्षक भिंती लगत टाकताना आढळून आल्यास कडक कारवाई करून दुकानचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल. विमानतळ परिसरातील घरावर किंवा उंच जागेवर कोणत्याही प्रकारचा झेंडा अथवा पताका लावू नये.


## टी. सी. हरवली आहे

कान्होपात्रा उत्तमराव पोले या नावाची टी.सी.हरवली आहे. चाकूर येथून अहमदपूरकडे दि. २८ ऑक्टोंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता बसने अहमदपूरकडे प्रवास करीत असताना संत गोविंदबाबा विद्यालय, लातूर रोडची कान्होपात्रा उत्तमराव पोले या नावाची टि.सी. व इतर शैक्षणिक साहित्य हरवले आहेत. टि. सी. व कागदपत्रे सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क करावा. **कान्होपात्रा उत्तमराव पोले ८४५९७७९६५९**

## सोलापुर महानगरपालिका, सोलापुर

**''इंद्रभुवन'' पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापुर - ४१३ ००१**

### जाहिर प्रसिध्दीकरण

सोलापुर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्मार्ट सिटी अंतर्गत होम मैदान लगत स्ट्रीट बाजार ची जागा ''Ready to Eat Food Stall'' स्थापनेसाठी ०३ वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यात येणार आहे. सदर जागा भाड्याने देण्यासाठी ऑफलाइन लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी लिलाव प्रक्रियेत सहभाग नोंदवावे.

**अटी व शर्ती (संक्षिप्त):**

१. सदर ठिकाणी एकुण ४५ स्टॉल्स करिता ऑफलाईन लिलाव प्रक्रिया राबविण्यात येत असुन त्यापैकी ०३ स्टॉल्स हे दिव्यांगाकरिता राखीव ठेवण्यात येत आहे.
२. सदर ठिकाणी १५ चौ. मी. स्टॉलकरिता प्रति महिना र.रु.१,५०९/- व ०९ चौ.मी. स्टॉलकरिता प्रति महिना र.रु.९०५/- इतके भाडे निश्चित केले आहे.
३. इच्छुकांनी प्रवेश फी र.रु.२०००/- मनपाच्या कॅश विभागात दि. १४/११/२०२५ अखेर दुपारी १.०० वाजेपर्यंत भरणा करणे आवश्यक आहे.
४. ऑफलाईन लिलाव प्रक्रिया दि. १७/११/२०२५ रोजी होम मैदान स्ट्रीट बाजार येथे सकाळी ११.०० वाजता घेण्यात येणार आहे.
५. लिलाव प्रक्रिया हि प्रत्यक्ष उपस्थितीत पार पाडणार असल्याने येताना ओळखपत्र (आधार/पॅन) ची छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.
६. सर्वोच्च बोली लावणारा पात्र उमेदवार म्हणून निवडला जाईल.
७. निवड झालेल्या बोलीदाराने निश्चित मुदतीत अनामत रक्कम भरुन करारनामा पूर्ण करणे आवश्यक राहील.
८. जागेचा वापर फक्त Ready to Eat Food Stall या हेतूसाठीच करता येईल.
९. मनपाला कोणत्याही कारणास्तव लिलाव रद्द करण्याचा अधिकार राहील.
१०. संपूर्ण अटी व शर्तीची माहिती मनपा कार्यालयात उपलब्ध आहे.

**सही/-**
**(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)**
**उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी**
**भुमी व मालमत्ता कार्यालय, सो.म.पा.**

## जामश्री रिअलटी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र – 413 001 सीआयएन : L17111PN1907PLC000258
दूरध्वनी : 91 22 43152424 इमेल आयडी: jammill1907@gmail.com वेबसाइट: www.jamshri.in

**30 सप्टेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्धवर्षाच्या कालावधी करीता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचे विवरण** (रु. लाख EPS सोडून)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेल अर्धवर्ष | | संपलेल वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 30.09.2025 (अलेखापरिक्षित) | 30.06.2025 (अलेखापरिक्षित) | 30.09.2024 (अलेखापरिक्षित) | 30.09.2025 (अलेखापरिक्षित) | 30.09.2024 (अलेखापरिक्षित) | 31.03.2025 (लेखापरिक्षित) |
| 1 | एकूण महसूल उत्पन्न | 225.36 | 229.63 | 212.78 | 454.99 | 473.32 | 905.46 |
| 2 | कर आणि अपवादात्मक बाबीं पूर्वीच्या अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी नफा/(तोटा) | (3.31) | 14.82 | (66.91) | 11.51 | (61.14) | (136.92) |
| 3 | कर आणि अपवादात्मक बाबीं पश्च्यात अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | (3.31) | 14.82 | (34.48) | 11.51 | (28.71) | (104.50) |
| 4 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | (4.62) | (5.82) | (4.86) | (10.44) | (9.68) | (19.30) |
| 5 | कर पश्च्यात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) | (4.62) | (5.82) | (4.86) | (10.44) | (9.68) | (19.30) |
| 6 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न (समावेश नफा / (तोटा) (करपश्च्यात) कालावधीसाठी आणि इतर व्यापक उत्पन ( करपश्च्यात)) | (7.93) | 9.00 | (39.34) | 1.07 | (38.39) | (111.64) |
| 7 | समभाग भांडवल | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 |
| | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रु 10/ अखंडित परिचलना करीता मूलभूत व सौम्यिकृत | | | | | | |
| | प्रति शेअर कमाई प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रु 10/- | (0.05) | 0.21 | (0.49) | 0.16 | (0.41) | (1.50) |
| | खंडित परिचलना करीता मूलभूत व सौम्यिकृत प्रति शेअर कमाई | (0.07) | (0.08) | (0.07) | (0.15) | (0.14) | (0.28) |

टिप :अ) उक्त अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षाचा लेखापरीक्षक समितीने आढावा घेतला आहे संचालक मंडळाने त्यांच्या नोव्हेंबर 05, 2025 रोजी घेण्यात आलेल्या सभेत त्यांला मंजूरी दिली आहे.
ब) उक्त निष्कर्ष कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस्) नियम, 2015 सुधारीत असल्याप्रमाणे आणि अधिधिनयमाच्या इतर संबंधित तरतूदींसह वाचाव्याच्या कंपन्या अधिनियम, 2013 च्या कलम 133 च्या अनुषंगाने कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने अधिसूचीत केल्याप्रमाणे इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस् (आयएनडी) नुसार तयार करण्यात आलेले आहेत.
क) 30 सप्टेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षाचा आर्थिक निष्कर्षाच्या बीएसईकडे दाखल केलेल्या सविस्तर प्रारुपाचा उक्त एक उतारा आहे. संपूर्ण प्रारुप बीएसईची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.jamshri.in वर उपलब्ध आहे.

तारीखः **05.11.2025**
ठिकाण : सोलापूर

**जामश्री रिअलटी लिमिटेड करीता**
**सही**
**राजेश दामाणी**
**संयुक्त व्यवस्थापकीय संचालक**

## टूहोम फायनान्स लिमिटेड

**(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )**

Truhome FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८
**मुख्य कार्यालय.** लेव्हल ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२ ब्लॉक,वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
**वेबसाइट:** www.truhomefinance.in

### भौतिक ताबा सूचना

जसे की, निम्नस्वाक्षरीदार हे हे टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनाशिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ च्या (उक्त कायदा ) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३(१२) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ ( उक्त नियम ) नियम ३ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार/सह-कर्जदार/तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती.

कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की अधिकृत अधिकारी टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि नियम ८ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ०५/११/२०२५ रोजी भौतिक ताबा घेतला आहे.

कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे मालमत्तेशी व्यवहार करू नये अशी ताकीद देण्यात येत आहे आणि मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लि) कडून येथे नमूद केलेल्यारकमेसाठी व्याजासह शुल्क आकारला जाईल.कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**1. श्री. स्वप्नील नागनाथ गायकवाड**
**2. श्री नागनाथ विठ्ठल गायकवाड,**
**3. श्रीमती माया नागनाथ गायकवाड**
**सर्वांचा रहिवासी पत्ता असलेला पत्ता: प्लॉट क्र. 33, सर्व्हे क्र. 355/1/D/1, वाखरी, वाल्मिकी नगर, सूर्योदय इंग्रजी माध्यम शाळेजवळ, ता. पंढरपूर, सोलापूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४ तसेच येथे: आर/ओ एटी: पोहरगाव, झेडपी जवळ. शाळा, ता. पंढरपूर, सोलापूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र – ४१३३०४**

**थकबाकी रक्कम**

मागणी सूचना दिनांक: २४.०८.२०२३.
दिनांक ०९/०८/२०२३ रोजी कर्ज खाते क्र. SHLHSOLR0000320 अंतर्गत रु.२६,८०,५१६/- (रुपये सव्वीस लाख ऐंशी हजार पाचशे सोळा फक्त)
आणि पुढील व्याज आणि इतर खर्च, शुल्क आणि खर्चासह.

**मालमत्तेचे वर्णन**


ग्रामपंचायत घर मालमत्ता क्रमांक १८०८ असलेल्या स्थावर मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि भूखंड क्रमांक ३३ ची जमीन सुमारे १५२८.०० चौ. फूट क्षेत्रफळ असलेली जमीन, म्हणजेच/ १४२.८६ चौ. मीटर, सर्व्हे क्रमांक ३५५/१/डी/१/३३, मौजे वाखरी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, उपनिबंधक यांच्या हद्दीत सोलापूर, जि. सोलापूर – ४१३३०४
आणि त्याची सीमा खालीलप्रमाणे आहे: उत्तरेकडे:- रस्ता, दक्षिणेकडे:- गट क्रमांक ३५५/अ/४/२, पूर्वेकडे:- प्लॉट क्रमांक ३२, पश्चिमेकडे:- प्लॉट क्रमांक ३३

ठिकाण - पंढरपूर
दिनांक: ०५.११.२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
टूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

## महत्त्वाचे

### विदित गुजरातीचा फॉस्टिनो ओरोवर विजय



**पणजी** : भारताचा ग्रॅण्डमास्टर विदित गुजरातीने दुसऱ्या जलद डावामध्ये अर्जेंटिनाच्या १२ वर्षीय फॉस्टिनो ओरोचा बचाव मोडून काढण्यात यश मिळवले, तर प्रणव व्ही. आणि प्रणेश एम. यांनीही गुरुवारी येथे झालेल्या फिडे विश्वचषक २०२५ बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करून तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. ३१ वर्षीय विदितने १२ वर्षीय ओरोवर दुसऱ्या जलद डावांत ५२ चालींमध्ये विजय मिळविला. प्रणवने नॉर्वेच्या आर्यन तारीचा पराभव केला, तर प्रणेशने जर्मनीच्या दिमित्रीज कोलार्सचा पराभव करून पुढील फेरीत विश्वविजेत्या गुकेश डी, अर्जुन एरिगासी, पी. हरिकृष्णा, कार्तिक वेंकटरमन आणि दिप्तयन घोष यांच्यासोबत सहभागी झाला. फॉस्टिनोविरुद्ध खेळणे आव्हानात्मक होते. हा सामना सोपा नव्हता, परंतु विजय मिळविला. पुढील फेरीसाठी पात्र होणे चांगले वाटते, असे विदित म्हणाला. फॉस्टिनोची बुद्धिबळ खेळण्याची पद्धत खूप वेगळी आहे, कारण तो संगणकांसह खेळात तरबेज झाला आहे. मागील पिढीपेक्षा त्यांच्याकडे खूप जास्त अनुभव आहे, असे तो म्हणाला.

### सायव्हर-ब्रंटला पहिले स्थान देण्याचा निर्णय हरमनप्रीतचा

**नवी दिल्ली** : दोन वेळा वूमेन्स प्रीमियर लीग विजेत्या मुंबई इंडियन्सकडून (एमआय) नेहमीच हरमनप्रीत कौर आणि नॅट सायव्हर-ब्रंट सारख्या खेळाडूंना कायम ठेवण्याची अपेक्षा होती, परंतु भारतीय कर्णधाराच्या आधी इंग्लंडच्या कर्णधाराचे नाव पहिल्या रिटेन्शन निवडीमध्ये असल्याने अनेकांना आश्चर्य वाटले. शिवाय, २०२५ च्या वर्ल्ड प्रीमियर लीगमध्ये प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा सन्मान जिंकणारी अष्टपैलू नॅटला कर्णधार हरमनप्रीतपेक्षा जास्त किमतीत (३.५ कोटी रुपये) राखण्यात आले आहे, त्याची रिटेन्शन रक्कम २.५ कोटी रुपये आहे. महिला एकदिवसीय विश्वचषक विजेत्या कर्णधार हरमनप्रीतने मुंबई इंडियन्स रिटेन्शन यादीत नॅटला पहिले स्थान देण्याचा निर्णय अलिकडेच घेतला होता. हरमनप्रीत २०२६ साठी एक उत्तम संघ असण्यावर लक्ष केंद्रित करू इच्छिते आणि यामुळेच, तिने निर्णय घेतला की नॅट ही एमआयची पहिली रिटेन केलेली खेळाडू असेल तर ती फ्रेन्चायझीसाठी दुसरी निवड असेल, असे सूत्रांनी सांगितले. नॅट आणि हरमनप्रीतनंतर मुंबई इंडियन्सने वेस्ट इंडीजची कर्णधार हेली मॅथ्यूज, तसेच भारताची अष्टपैलू अमनजोत कौर आणि अनकॅप्ड यष्टिरक्षक-फलंदाज जी. कमलिनी यांना कायम ठेवले आहे, त्यांनी या वर्षी १९ महिला २० विश्वचषक जिंकला आणि २०२५ च्या हंगामात सर्वांना प्रभावित केले.

### आमदार चषक बुद्धिबळ स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**



अक्कलकोटचे लोकप्रिय आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन जगदीश मंगल कार्यालय येथे रविवार ९ नोव्हेंबरला केले आहे. ८, ९, १०, १३, १७, २५ व खुल्या गटात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले असून यात खेळाडूंना रोख बक्षीस व चषक मिळून २५ हजार रुपयांची बक्षीसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे आयोजन विकास नवनाथ कदम यांनी केले असून या स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी भाग घ्यावा, असे आवाहन सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक यांनी केले आहे

### सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या अनुष्का दीक्षितची राज्य कराटे स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**



येथील सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या अनुष्का दीक्षितने बारामती येथे झालेल्या पुणे विभागीय शालेय कराटे स्पर्धेत १४ वर्षांखालील १८ ते २२ या वजनी गटातून अजिंक्यपद मिळविले. या कामगिरीवर तिची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर, प्रचिता जोगदंडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, भीमाशंकरजी पटणे, गुरुराज माळगे, डॉ राजशेखर येळीकर, अॅड. रेवणसिद्ध पाटील, चनबसप्पा नाडगौडा, प्रभुराज मैंदर्गीकर, विलास कारभारी, पशुपतिनाथ माशाळ, समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापिका संगीता गोटे, पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले.

# भारताचा ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय

## चौथा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना ● मालिकेत २-१ अशी आघाडी



महत्त्वपूर्ण दोन बळी टिपणाऱ्या अक्षर पटेलचे अभिनंदन करताना सूर्यकुमार यादव, जितेश शर्मा, बुमराह व शिवम दुबे

◆ **कॅरारा, ६ नोव्हेंबर**

गुरुवारी येथे खेळल्या गेलेल्या चुरशीच्या चौथ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात भारतीय गोलंदाज- डावखुरा फिरकी गोलंदाज अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर आणि मध्यम गती गोलंदाज शिवम दुबेने आपल्या कौशल्याची चुणूक दाखवित ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी रोमहर्षक विजय नोंदविला.

या विजयाबरोबरच भारताने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. आता मालिकेतील पाचवा आणि अंतिम टी-२० सामना शनिवारी ब्रिस्बेन येथे खेळविला जाणार आहे.

ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले व २० षटकांत ८ बाद १६७ धावांवर रोखले. विजयासाठी १६८ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाला भारतीय गोलंदाजांनी आपला हिसका दाखविला व त्यांना लक्ष्य गाठण्याआधीच १८.२ षटकांत ११९ धावांतच गुंडाळले.

अभिषेक शर्मा (२१ चेंडूत २८) व शुभमन गिलने (३९ चेंडूत ४६) पहिल्या गड्यासाठी ५६ धावांची भागीदारी केली. अॅडम झम्पाचा सामना करण्यासाठी तिसऱ्या क्रमांकावर बढती मिळालेला शिवम दुबे (१८ चेंडूत २२) मोठा प्रभाव पाडू शकला नाही, तर कर्णधार सूर्यकुमार यादव (१० चेंडूत २०) दोन षट्कार मारून बाद झाला.

वेगवान गोलंदाज नॅथन एलिस (४ षटकांत २१ धावांत ३ बळी) हा ऑस्ट्रेलियन गोलंदाजांचा पर्याय होता, त्याने आपल्या वैविध्यपूर्ण गोलंदाजी शैलीचा वापर केला. झॅम्पाने आपल्या चार षटकांत ४५ धावा दिल्या, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे त्याने धोकादायक अभिषेकसह तीन बळी घेतले. अभिषेकने झॅम्पाच्या गोलंदाजीवर जास्तीत जास्त धावा काढल्या. डावखुरा वेगवान गोलंदाज बेन द्वारशुइसच्या दुसऱ्या चेंडूवर अभिषेक बाद होऊ शकला असता, पण झेव्हियर बार्टलेटने संधी गमावली.

अभिषेकचा मित्र आणि सलामीचा जोडीदार शुभमन गिल या मालिकेत अद्याप प्रभाव पाडू शकलेला नाही. त्याला त्याच्या धावांसाठी कठोर परिश्रम करावे लागले. त्याने मार्कस स्टोयनिसला जबरदस्त फटका मारून काही दबाव कमी केला आणि नंतर एलिसच्या हळूवार चेंडूला बळी पडला. त्यानंतर विकेट पडत राहिल्या, त्यामुळे डावाचा प्रवाह खराब झाला. अक्षर पटेलने (११ चेंडूत नाबाद २१) शेवटच्या दिशेने आवश्यक चौकार मारले आणि एकूण धावसंख्या १६० च्या पुढे नेली. शेवटच्या पाच षटकांत भारताने ४२ धावांत चार फलंदाज गमावले.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने सावधपणे सुरुवात केली. सलामीवीर मिचेल मार्श (३०) व मॅथ्यू शॉर्टने (२५) पहिल्या गड्यासाठी ३७ धावांची भागीदारी केली, परंतु त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी नियमित अंतराने ऑस्ट्रेलियन फलंदाजांना तंबूत परत पाठविले. सलामी जोडीसह जोश इंग्लिस (१२), टिम डेव्हिड (१४), जोश फिलिप (१०) व मार्कस स्टोयनिस (१७) तेवढे दोन अंकी धावा काढू शकले, परंतु इतर फलंदाज एक अंकी किंवा शून्यावरच बाद झाले व याबरोबरच ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ १८.२ षटकांत ११९ धावात गारद झाला. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने ३ बळी, अक्षर पटेल व शिवम दुबेने प्रत्येकी २ बळी, तर अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह व वरुण चक्रवर्तीने प्रत्येकी १ बळी टिपला. ◀(वृत्तसंस्था)



गुरुवारी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात वन-डे विश्वचषक विजेत्या महिला क्रिकेट संघासोबत राष्ट्रपदी द्रौपदी मुर्मू

# विश्वविजेत्या महिला क्रिकेटपटूंनी राष्ट्रपती मुर्मू यांना दिली जर्सी भेट

◆ **नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी राष्ट्रपती भवनात विश्वचषक विजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघाची भेट घेतली, यावेळी कर्णधार हरमनप्रीत कौरने त्यांना सर्व खेळाडूंनी स्वाक्षरी केलेली संघाची जर्सी भेट दिली.

नवी मुंबई येथे रविवारी झालेल्या महिला वन-डे विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव करून भारताने महिला क्रिकेटमध्ये पहिले जागतिक विजेतेपद पटकावले.

राष्ट्रपती मुर्मू यांनी संघाचे त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल अभिनंदन केले, असे सांगत खेळाडूंनी केवळ इतिहास घडविला नाही, तर तरुण पिढीसमोर आदर्श सुद्धा निर्माण केला आहे. भारतीय महिला क्रिकेट संघ हा भारताचे प्रतिबिंब आहे. ते वेगवेगळ्या प्रदेशांचे, वेगवेगळ्या सामाजिक पार्श्वभूमींचे, वेगवेगळ्या परिस्थितींचे प्रतिनिधित्व करतात, पण ते एकच संघ आहेत, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. संवादादरम्यान, कर्णधार हरमनप्रीत कौरने राष्ट्रपतींना विश्वचषक ट्रॉफी देखील सादर केली. या संघाने बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. ◀(वृत्तसंस्था)

### भारतीय खेळांसाठी महत्त्वाचा क्षण : अमोल मुझुमदार



हरमनप्रीत कौर आणि तिच्या संघाचे पहिले विश्वचषक विजेतेपद हे केवळ देशातील क्रिकेटसाठी एक महत्त्वाचा टप्पा नाही, तर भारतीय खेळांसाठी एक महत्त्वाचा क्षण आहे, असे महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांनी म्हटले आहे. गत आठवड्यात नवी मुंबईत दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी विजय मिळवून भारतीय महिला क्रिकेट संघाने आपला पहिला विश्वचषक विजेतेपद पटकावला आणि देशाच्या क्रीडा इतिहासात एक सुवर्ण अध्याय लिहिला. या विजयाचे वर्णन भारतातील महिला क्रिकेटसाठी एक महत्त्वाचा क्षण म्हणून केले जाते, जो पुरुष संघाच्या १९८३ च्या विश्वचषक विजयाशी समांतर आहे.१९८३ च्या क्षणाबद्दल बोलताना, मला वाटते की हा महिला विश्वचषक केवळ भारतीय पुरुष आणि महिला क्रिकेटसाठीच नव्हे, तर भारतीय खेळांसाठी एक महत्त्वाचा क्षण असावा, असे मुझुमदार यांनी सांगितले.

# रुद्रशक्ती गुरुकुलचे राज्य योंगमुडो स्पर्धेसाठी ९ विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

जिल्हास्तरीय योंगमुडो निवड चाचणी स्पर्धेतून राज्य स्पर्धेसाठी रुद्रशक्ती गुरुकुलच्या ९ खेळाडूंची निवड झाली. हे छत्रपती संभाजीनगर येथे १६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राज्य स्पर्धेत भाग घेतील. त्यांना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन व योगीनाथ फुलारी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे योंगमुडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सचिव नागेश शेट्टीकर व महाराष्ट्र अध्यक्ष रोहित नारकर, सोलापूर अध्यक्ष अनिल विपत यांनी शुभेच्छा दिल्या.

**निवडलेले खेळाडू :** सोनाक्षी माडे, योगिता सरवदे, गौरी माळी, आदिती नल्ला, मान्यता रोहिटे, दुर्वा रोहिटे, ममता अलशेट्टी, वैभवी आळगुंडगी, वैभव माडे.





# इंग्लिश स्कूल वेळापूरला दुहेरी मुकुट

### शालेय जिल्हा खो-खो : पुणे विभागासाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

शालेय जिल्हा खो-खो स्पर्धेत १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटात वेळापूरच्या इंग्लिश स्कूलने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

वसुंधरा कला महाविद्यालय जुळे सोलापूर येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. मुलींनी अंतीम सामन्यात सांगोला (शिवणे) संघावर १ डाव १२ गुणांनी दणदणीत विजय मिळविला. मुलांनी मंद्रूप संघाचा एक डाव सात गुणांनी पराभव केला. या कामगिरीवर दोन्ही संघाची इंदापूर (पळसदेव) येथे होणाऱ्या पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संघास क्रीडा शिक्षक सतीश कदम, शिवाजी जाधव, प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, अर्धनारी नटेश्वर क्रिडा मंडळाचे अध्यक्ष जावेद मुलाणी, वेळापूरचे सरपंच रजनिश बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष अॅड. सुजित कदम, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, संस्थेच्या संचालिका डॉ. मीनाक्षी कदम, सचिवा डॉ. प्रियदर्शनी महाडिक, संचालिका तेजस्विनी कदम, शाळा समिती चेअरमन प्रतापराव पाटील, प्राचार्य आर बी पवार, उपमुख्याध्यापक शिवशरण पठाण, पर्यवेक्षक बी. एस. सावळे यांनी अभिनंदन केले.

# टीम इंडियाची उपकर्णधार स्मृती मंधानाच्या घरी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली भेट



**तभा वृत्तसेवा**
**सांगली, दि. ६ नोव्हेंबर-**

महिला विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेला नमवत ऐतिहासिक विजय मिळवला. टीम इंडियाची उपकर्णधार आणि सांगलीची कन्या स्मृती मंधानाच्या घरी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जाऊन तिच्या आई-वडिलांचे विशेष अभिनंदन केले. याप्रसंगी जिल्हाधिकारी अशोक काकडे देखील उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील स्मृती मंधानाच्या वडिलांना म्हणाले, बाबा, स्मृती आणि तिच्या टीमने जी अतुलनीय कामगिरी केली, त्यामुळे प्रत्येक भारतीय अभिमान व्यक्त करत आहे. ह्या मुलींच्या कामगिरी मुळे ग्रामीण भागातील प्रत्येक मुलगी आकाशाला गवसणी घालेल, असा विश्वास यावेळी पाटील यांनी व्यक्त केला.

टीम इंडियाची उपकर्णधार आणि अनुभवी ओपनर स्मृती मानधना हिने संपूर्ण वर्ल्ड कप स्पर्धेत जबरदस्त सातत्य राखलं. तिने ९ मॅचेसमध्ये ५४.२५ च्या एव्हरेजने एकूण ४३४ रन्स केल्या आणि वर्ल्ड कपच्या एकाच एडिशनमध्ये सर्वाधिक रन्स करण्याचा मिताली राजचा भारतीय रेकॉर्ड मोडला. तिच्या परफॉर्मन्समध्ये १ सेंच्युरी आणि ४ फिफ्टींचा समावेश आहे. तिने प्रतिका रावलसोबत अनेक महत्त्वाच्या पार्टनरशिप्स केल्या. विशेषतः न्यूझीलंडविरुद्धच्या महत्त्वपूर्ण मॅचमध्ये तिने ९५ बॉलमध्ये १०९ धावांची शानदार सेंच्युरी ठोकली, ज्यामुळे टीम इंडियाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. अंतिम मॅचमध्येही तिने ४५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.

# सोलापूरचा शोएब कुरेशी 'एनके श्री'चा मानकरी

## तीन जिल्ह्याच्या शरीरसौष्ठव स्पर्धेत स्पर्धकांचा उच्चांक

### बेस्ट पोझर हजरतअली शेख , मोस्ट इम्प्रुव्हड लातूरचा विनायक बसाने

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

सोलापूर, धाराशिव व लातूर जिल्हा मर्यादित शरीरसौष्ठव स्पर्धेत येथील शोएब कुरेशी एनके श्री चा मानकरी ठरला. सहा गटातील प्रथम विजेत्यामध्ये पुन्हा स्पर्धा झाली व यामध्ये शोएब सरस ठरला. त्याला २१ हजार, सन्मान चिन्ह व सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. बेस्ट पोझरचा मान येथील हजरतअली शेख याने तर मोस्ट इम्प्रुव्हडचा मान लातूरच्या विनायक बसाने याने मिळविला.

नागेश करजगी युथ फाऊंडेशनच्या वतीने, सोलापूर जिल्हा शरीर सौष्ठव संघटनेच्या मान्यतेने यश करजगी यांच्या वाढदिवसानिमित्त ही स्पर्धा आयोजित केली होती. यात १३० खेळाडूंनी सहभाग नोंदविला आजपर्यंतच्या स्पर्धेमधील हा उच्चांक होता.

या स्पर्धेचे उद्घाटन कुमार करजगी, यशराज करजगी व सोलापूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले. विविध ६ वजनी गटातून १ लाखांची रोख बक्षीसे देण्यात आली. प्रत्येक गटात ४, ३, अडीच व २ हजार, सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रमोद काटे, नजीर शेख, गोरख गडसिंग, शकील बडेघर, शरणकुमार कुंभार, शफी शेतसंदी व रतिकांत पाटील यांनी काम पाहिले.



बक्षीस वितरण किसन जाधव, अमोल शिंदे, बिजू प्रधाने व बाळासाहेब तोडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आरिफ मदवार यांनी परिश्रम घेतले.

**विविध वजनी गटाचे अंतिम निकाल (प्रथम चार)**

**५५ किलो** : काशिनाथ देवकते (होटगी), जमीर शेख (मोहोळ), तौफिक चांदा (सोलापूर), विकी राठोड (सोरेगाव).

**६० किलो** : निखिल कांबळे (अहमदपूर), फुरकान रजभरे ( सोलापूर),योगेश जाधव (बार्शी), आकाश वाघमारे (सोलापूर).

**६५ किलो** : विनायक बसाने (लातूर), रितेश फटफटवाले (सोलापूर), विलास बेलदार (मोहोळ), लक्ष्मण कंधारे (लातूर).

**७० किलो** : शहाबाद नदाफ (सोलापूर), नितेश चव्हाण (वेळापूर), हजरत अली शेख (सोलापूर), अमन शेख (करमाळा).

**७५ किलो** : साद रजानी (सोलापूर), अफ्रीद शेख (लातूर), निखिल चव्हाण, जावेद शेख (सोलापूर).

**७५ किलोवरील** : शोएब कुरेशी (सोलापूर), तेजस मुळे (लातूर),अक्षय काळे (सोलापूर), लक्ष सुरवसे (पंढरपूर).




# सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनची हॅटट्रिक

### महाराष्ट्र क्रिकेट संघटनेकडून सलग तिसऱ्यांदा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनचा सलग तिसऱ्यांदा सन्मान केला.

गेली सलग तीन वर्षे सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनने महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडून दिलेल्या सामन्यात, स्पर्धामध्ये उत्तम नियोजन केले होते. तसेच या वर्षी इंदिरा गांधी स्टेडियमचा विशेष करार, सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनने केलेल्या नवनवीन योजना, तसेच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे वरिष्ठ गट, १९, २३ मुला-मुलींचे सराव सामने यशस्वीरित्या घेतल्यामुळे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वार्षिक सभेमध्ये हा विशेष सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहीत पवार यांनी सोलापूरची विशेष प्रशंसा केली. कोल्हापूरचे माजी खासदार छत्रपती राजे संभाजी यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य संघटनेचे सचिव कमलेश पिसाळ, अपेक्स कौन्सिल सदस्य श्री. बोबडे, चेअरमन सचिन मुळे, खजिनदार संजय बजाज, श्री. भांडारकर, श्री. वझे, अतुल गायकवाड, विनायक द्रविड, श्री. मुथा, सुहास पटवर्धन, सुशील शेवाळे, राजू काने,श्री.देशमुख, नीता कदम-कापरे आदी उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### श्रीराम सेना व प्रणीन फाउंडेशन यांच्या मार्फत १८ देशी गोवंशांना जीवनदान

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

श्रीराम सेना व प्रणीन फाउंडेशनच्या प्रयत्नातून १८ देशी गोवंशांना जीवनदान मिळाल्याचे वृत्त प्रसिध्दीस देण्यात आले आहे. मंगळवेढा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मंगळवेढा मरवडे रोडवरील पडवळे चहा कॅन्टीन पासून थोड्या अंतरावर ३ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजताच्या दरम्यान श्रीराम सेना मोहोळ तालुका अध्यक्ष अमोल चौगुले यांना एक टाटा कंपनीच्या ९०९ हे वाहन क्रमांक घ.२८.इ.६३४३ या वाहनातून अवैधरित्या गोवंशाची क्रूरतेने, निर्दयतेने व अमानवीयतेने वाहतूक होत असल्याचा संशय आला. सदरील या टाटा कंपनीच्या चार चाकी वाहनाचा अमोल चौगुले यांनी तात्काळ पाठलाग सुरू करून सदरील गाडी मंगळवेढा मरवडे रोडवरील पडवळे चहा कॅन्टीन पासून काही अंतरावर अडविली. गाडीची पाहणी केली असता. वाहनामध्ये १४ नंदी(बैल) व ४ देशी गाई असे एकूण १८ देशी गोवंश होते. कुठल्याही प्रकारच्या चारा पाण्याची व्यवस्था न करता सोबत जनावरांच्या वाहतुकीचा परवाना नव्हता. गुरांच्या प्राथमिक औषधोपचारासाठी लागणारे मेडिकल किट न बाळगता अगदी दाटीवाटीने कोंबून गाडीतील गोवंशाला दोरखंडाने बांधलेले असल्याचे निदर्शनास आले. गोरक्षकांनी त्वरित महाराष्ट्र स्टेट कंट्रोल ११२ नंबरवर याची सविस्तर माहिती दिली. गाडीतील गुरांची एकंदरीत अवस्था पाहून अमोल चौगुले यांनी श्रीराम सेना सोलापूर जिल्हा अध्यक्ष शितल परदेशी यांना कॉल करून सदरील गाडीची माहिती कळविली. घटनास्थळावर मंगळवेढा पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व कर्मचारी दाखल झाले. कायदेशीरित्या संबंधित प्रकरणातील अवैध गोवंश तस्करी करणारे हे वाहन मंगळवेढा पोलीस स्टेशनमध्ये आणून दाखल करण्यात आले. तसेच या वाहनातील १४ नंदी (बैल) व ४ देशी गाईंना मंद्रूप येथील श्रीकृष्ण गोशाळा येथे सुखरूपरीत्या सोडण्यात आले. या कारवाईत चालक सिद्धाराम बीरप्पा पुजारी यासोबत इतर तीन इसमावर गुन्हा नोंद करण्यात आला. या कारवाईत मंगळवेढा पोलीस स्टेशनचे पिसे व ठाणे अंमलदार रवींद्र बाबर यांचे सहकार्य लाभले. ही कारवाई यशस्वी करण्यासाठी श्रीराम सेना मोहोळ तालुका अध्यक्ष अमोल चौगुले, जिल्हाध्यक्ष शितल परदेशी व गोरक्षक प्रशांत परदेशी, अनिकेत गोरंट्याल, गणेश बिज्जरगी, शुभम फलमारी यांचे सहकार्य लाभले.



### राज्यस्तरीय सौंदर्यवती स्पर्धेत सांगोल्याची सायली कांबळे प्रथम

**सांगोला, दि. ६ नोव्हेंबर -**

दरवर्षी प्रमाणे विटा शहरात गवळी प्रतिष्ठानच्या वतीने विटा महोत्सवात विविध कार्यक्रमाबरोबरच राज्यस्तरीय सौंदर्यवती स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत सांगोल्यातील सायली कांबळे हिने प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत ४० सौंदर्यवतींनी सहभाग नोंदवला होता. सदर स्पर्धेत सायली कांबळे हिची नीलम बाबर यांनी रंगभूषा व वेशभूषा केले होती. स्पर्धेत सायली कांबळे हिने उत्कृष्ट सादरीकरण करून प्रथम क्रमांकाचे सौंदर्यवती पारितोषिक ११ हजार रुपये व सन्मान चिन्ह प्राप्त केले. त्यांच्या यशाबद्दल आम दार सुरेश खाडे व गवळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन गवळी यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. सायली कांबळे ही मिशन हॉस्पिटल, मिरज येथे वैद्यकीय शिक्षण घेत असून सांगोला महाविद्यालयाचे प्रा.डॉ. विधीन कांबळे यांची ती कन्या आहे. सायली कांबळे आणि नीलम बाबर यांचे या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

### पहाटे फिरण्यास गेलेल्याचा मोटार सायकलच्या धडकेत मृत्यू


**बार्शी, दि.६ नोव्हेंबर-**



बार्शी शहरातील परांडा रोडवर आज (दि. ६ नोव्हेंबर) पहाटेच्या सुमारास भरधाव मोटारसायकलने पाठीमागून दिलेल्या जोरदार धडकेत एकाचा जागीच मृत्यू झाला. मृताचे नाव संजय मारुती अनभुले (वय ५५, रा. नाईकवाडी प्लॉट, बार्शी) असे आहे. फिर्यादी विजय मारुती अनभुले (वय ५३) यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते स्वतः महाराष्ट्र विद्यालय, बार्शी येथे नोकरीस असून, दररोज सकाळी भाऊ संजय अनभुले व मावस चुलते भास्कर डिसले यांच्यासह बार्शी-परांडा रोडवर वॉकसाठी जात असतात. आजही पहाटे पाचच्या सुमारास तिघेजण वॉकसाठी गेले होते. सकाळी सहा वाजताच्या दरम्यान परांडा रोडवरील पटेल यांच्या पॅरागॉन चप्पल शोरुमजवळ येताच, मागून भरधाव वेगात आलेल्या हिरो कंपनीच्या एच.एफ. डिलक्स ( एमएच १३ सीआर ८३६६) या मोटारसायकलने संजय अनभुले यांना जोरात धडक दिली. धडकेत ते रस्त्यावर कोसळले. विजय अनभुले व भास्कर डिसले यांनी तातडीने हॉस्पिटल येथे नेले, मात्र डॉक्टरांनी तपासून संजय अनभुले यांना मृत घोषित केले. अपघातानंतर नागरिकांनी मोटारसायकल व दोन्ही युवकांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. मोटारसायकल चालवणाऱ्या युवकाचे नाव लहू पवार (वय १९, रा. इंद्रानगर, पारशीक खारेगाव, ठाणे) असे असून त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे. या घटनेमुळे बार्शी शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

## निधन वृत्त...

### पद्मावती दोशी



**माळशिरस, दि. ६, नोव्हेंबर -**

येथील पद्मावती दोशी (वय ८८ वर्ष )यांचे निधन झाले . त्यांचे पाश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.त्या रासायनीक खताचे व्यापारी व हनुमान शिक्षण संस्थेचे व रामदेव देवस्थानचे सचिव रामभाऊ दोशी व भरत दोशी यांच्या मातोश्री होत्या.

### प्रसाद हरिदास



**पंढरपूर, दि. ६ नोव्हेंबर -**

येथील प्रसिद्ध छायाचित्रकार प्रसाद उर्फ कान्हा हरिभाऊ हरिदास (वय-३४) यांचे बुधवारी (ता.५) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगी, दोन बहिणी असा परिवार आहे. एक उत्तम छायाचित्रकाराचे अकाली निधन झाल्यामुळे मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

# द्राक्ष बागांवर 'न भुतो न भविष्यती' संकट!

### जिल्ह्यातील बागायतदार शेतकरी संकटात

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**



नैसर्गिक संकटांमुळे द्राक्ष पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिकच्या निफाड तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी आपल्या द्राक्षाच्या बागांवर कुऱ्हाडीचे घाव घालून ती वैतागाने उद्ध्वस्त केल्याचे ज्वलंत उदाहरण आहे. नाशिक विभागात ८० टक्के द्राक्ष बागांचे यंदा नुकसान झाले असून, पुणे विभागातही यंदा अतिवृष्टीमुळेच ५० टक्केच्यावर आताच नुकसान झाल्याने द्राक्ष बागायतदार जाम वैतागले असून, यंदा 'न भुतो न भविष्यती' संकट आल्याची खंतही काही शेतकऱ्यांनी आज (दि. ६) दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली.

नाशिकप्रमाणेच पुणे विभागात विशेषत: सोलापूर जिल्ह्यातही या नैसर्गिक संकटांमुळे झालेल्या नुकसानीमुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. ऑक्टोबरच्या द्राक्ष छाटणीनंतर आता नेमकी प्लॉवरिंग स्टेज आणि घड निर्मितीची प्रक्रिया सुरु होती. परतीचा पाऊस सारखाच कोसळत असल्याने शेतकरी बांधवांनी पोटच्या लेकराप्रमाणे जपलेल्या द्राक्षाची मुळे सडून गेली, घड गळून जात आहेत. सूर्यप्रकाश नसल्यामुळे फलधारणा झाली नाही आणि त्यामुळेच द्राक्ष बागेवरती काही जणांनी कुऱ्हाडीचे घाव घालून आपला संताप व्यक्त केला. हे सध्याचे भीषण वास्तव आहे. या बागांवर लाखो रुपये खर्च करूनही हाती काहीच न लागल्याने अनेकजण बागा मोडण्याचे टोकाचे निर्णय घेवू लागले आहेत. यामुळे महाराष्ट्रातील कृषी संकटाचा आणि शेतकऱ्यांच्या हतबलतेचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे. सोलापूर जिल्ह्यात बदललेल्या हवामानामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागात अवकाळी पाऊस आणि सकाळी पडणाऱ्या दाट धुक्यामुळे द्राक्ष बागांवर दुहेरी संकट ओढवले आहे. 'बदलत्या हवामानामुळे द्राक्ष बागांवरती बुरशीजन्य आजारांचा प्रादुर्भाव देखील वाढला आहे,' ज्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

या बुरशीजन्य रोगांपासून द्राक्षांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना अतिरिक्त औषधांची फवारणी करावी लागत आहे. यामुळे त्यांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. एकीकडे अवकाळी पावसाचा थेट फटका आणि दुसरीकडे रोगांचा वाढता प्रादुर्भाव, या दुहेरी संकटामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी हवालदिल झाला असून, मोठ्या आर्थिक नुकसानीच्या भीतीने ग्रासला आहे. यामुळे द्राक्ष बागायदार शेतकऱ्यांचा शासन स्तरावर विचार करून त्यांना मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची आहे.

#### कसं सोसावं हे सारं...!

माझ्यासह अनेक मोठ्या शेतकऱ्यांच्या २० ते ४० एकराच्या आसपास द्राक्ष बागा आहेत. छोट्या-छोट्या कंपन्या चालविल्याप्रमाणे या बागात आमच्याकडे कामगार काम करतात. या कामगारांचा पगार, बागांवरील फवारण्या, आंतरमशागती, खते आदींवर सारखाच लाखांवर खर्च होतो. गत महिन्यात बागांच्या छाटण्या केल्या. किमान नोव्हेंबरमध्ये तरी पाऊस थांबेल...अशी आशा होती मात्र सारख्या पडणाऱ्या पावसाने प्लॉवरिंग स्टेज आणि घडांचे मोठे नुकसान केले आहे. आताच ५० टक्के बागांचे नुकसान झाले आहे. भविष्यात हाती काय लागते का नाही? याची टांगती तलवार आहे...यामुळे कसं सोसावं हे सारं....अशीच आमची द्राक्ष बागायदारांची अवस्था झाली आहे.

**- हनुमंत गवळी, संचालक, द्राक्ष बागायतदार संघ (पुणे विभाग)**

# मंगळवेढा-पंढरपूर मधील विमा प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय : आ.समाधान आवताडे

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.६ नोव्हेंबर -**

जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्ती व काढणी पश्चात नुकसान झालेल्या खरीप हंगामातील पिकांच्या प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत विमा कंपनी आणि प्रशासनाने शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विमा लाभ मिळवून द्यावा अशी सूचना आ. समाधान आवताडे यांनी केली.

शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई बाबत तक्रार निवारण करण्याच्या उद्देशाने तसेच प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्रालयात बैठक पार पडली. सदर बैठकीस कृषी विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, अव्वर सचिव श्रीकांत जांभवडेकर, कृषी उपसंचालक शांत धनवडे, ओरिएंट इन्शुरन्स कंपनीचे राज्य व्यवस्थापक विनायक दीक्षित, शेतकरी प्रतिनिधी सरोज काझी इतर अधिकारी वर्ग उपस्थित होते.



२०२३ च्या खरीप हंगामात मंगळवेढा-पंढरपूर मतदार संघातील ४२ हजार ४६० शेतकऱ्यांनी ८३ हजार ९१ विमा अर्ज भरले होते. त्यापैकी ४६ हजार ४४६ शेतकऱ्यांना १६ कोटी २६ लाख नुकसान भरपाई मिळाली. परंतु याच हंगामातील ४ हजार ५०३ शेतकऱ्यांचे ५ कोटी ७१ लाख रुपयांचे विमा दावे नाकारण्यात आले. अद्यापही पीक विमा निधी शेतकऱ्यांना मिळाला नाही. कंपनीचे म्हणणे अयोग्य असून शेतकऱ्यांना मदत गरजेची आहे.

नैसर्गिक आपत्ती नुकसान आणि काढणी पश्चात नोंदी केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना पिकविम्याचा लाभ मिळाला पाहिजे. कंपनी प्रतिनिधी अथवा सर्व्हेयर यांनी प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक होते. ज्या भागात पर्जन्यमान कमी दाखविले त्या भागात प्रत्यक्ष पाहणी केली असून शेतकऱ्यांची मागणी रास्त असल्याचे आ.आवताडे म्हणाले.

# कार्तिकी यात्रेत तब्बल सहा लाख भाविकांनी घेतले मुख आणि पदस्पर्श दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ नोव्हेंबर -**

कार्तिकी यात्रेच्या काळात सुमारे २ लाख ५४ हजार ५३५ भाविकांनी पदस्पर्श दर्शन तर ३ लाख ३७ हजार ३३४ भाविकांनी मुखदर्शन असे एकुण ५ लाख ९१ हजार ८६९ भाविकांनी विठुरायाच्या दर्शनाचा लाभ घेतल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

#### कार्तिकी यात्रा २०२५ दरम्यान एकूण ११ दिवसांच्या कालावधीत भाविकांची खालीलप्रमाणे नोंद

पदस्पर्शदर्शन भाविक संख्या : २ लाख ५४ हजार ५३५, मुखदर्शन भाविक संख्या : ३ लाख ३७ हजार ३३४, एकूण दर्शन घेतलेले भाविक : ५ लाख ९१ हजार ८६९ श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या नियोजनबद्ध व्यवस्थापनामुळे व प्रशासनच्या मदतीने यात्रा यशस्वीपणे पार पडली अशी माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



श्री क्षेत्र पंढरपूर येथे दरवर्षीप्रमाणे यंदा कार्तिकी यात्रा २०२५ मोठ्या उत्साहात पार पडली. यात्रेच्या कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.भाविकांच्या सेवेसाठी चहा व पाणी वाटप केंद्रे, उपवास खिचडी वाटप, लाइव्ह दर्शन व्यवस्था, डिजिटल सूचना फलक व बोर्ड, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, दर्शन रांगेत सुरक्षा रक्षकांची नेमणूक, तसेच वैद्यकीय सुविधा अशा सर्व सोयी-सुविधांचा समावेश होता.या सर्व सोयींमुळे भाविकांनी अत्यंत आनंदाने आणि समाधानाने श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातांचे दर्शन घेतले अशी माहिती प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.



# उर्वरित विकासकामांसाठी भाजपमध्ये

### विक्रमसिंह शिंदे : भाजप आपल्याला नवीन नाही; कन्हेरगांव गावभेट दौऱ्याप्रसंगी प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.६ नोव्हेबर-**

माढा तालुक्यातील ऊर्वरीत विकासकामे मार्गी लावण्यासाठी भाजप मध्ये गेलो आहोत.दादांच्या माध्यमातून राहिलेली विकासकामे पूर्ण करण्याचा म ानस असल्याचे प्रतिपादन माजी सभापती विक्रमसिंह शिंदे यांनी केले.

कन्हेरगांव (ता.माढा) येथे गावभेट दौऱ्याप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले की, माजी आ.दादांनी राज्यात शिवसेना-भाजप युतीचे सरकार असताना शासनाच्या बरोबर जाण्याचा निर्णय घेऊन भीमा-सीना प्रकल्प मंजूर करून तालुक्यातील विकासाला चालना दिली. या माध्यमातून तालुक्यात हजारो एकर शेती बागायत झाली. अनेक विकास कामे मार्गी लागली होती. यामुळे भाजप आपल्याला नवीन नाही असे त्यांनी सांगितले.

यावेळी उपसरपंच लिंबाजी मोरे, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे संचालक शिवाजी डोके, कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे, अकोले खुर्द येथील संभाजी उर्फ गोटू पाटील, सरपंच श्रीकांत बनसोडे, माजी चेअरमन नागेश मोरे, सोमनाथ कदम, दादासाहेब खोचरे, रामलिंग खोचरे, हनुमंत पाटील, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब पाटील, योगेश खोचरे, गणेश माने, समाधान चव्हाण, दशरथ चव्हाण, तुषार काशीद, रतिलाल केदार, सचिन माने, जोतीराम भरगंडे, रावसाहेब डोके, नागेश माने, सोमनाथ लोखंडे , अमोल मोरे, धनाजी माने, आप्पासाहेब कोळी, प्रकाश माने, शिवाजी पाटील, विलास कदम, महादेव मोरे, वैजनाथ चव्हाण, किरण खोचरे, बिभीषण मोरे, विशाल पवार, शंभूराजे डोके उपस्थित होते.

यावेळी उपसरपंच लिंबाजी मोरे व संचालक शिवाजी डोके यांच्या हस्ते शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. हनुमंत पाटील यांनी आभार मानले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांगोला नगरपरिषद निवडणुकीसाठी ३३ हजार ६९८ मतदार

### निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.६ नोव्हेंबर -**



सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी एकूण मतदार संख्या ३३ हजार ६९८ असून यामध्ये स्त्री मतदार संख्या १६ हजार ८३८, पुरुष मतदार संख्या १६ हजार ८५८ व इतर २ अशी असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार संतोष कणसे यांनी दिली. सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२५ अनुषंगाने तालुकास्तरीय अधिकारी, राजकीय प्रतिनिधी व पत्रकार बांधव यांची बैठक पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे संपन्न झाली. यावेळी सहा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी, सहा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार सोमनाथ साळुंखे, सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे, नगरपरिषदचे कार्यालयीन अधीक्षक सचिन पाडे उपस्थित होते.

नामनिर्देशन पत्र राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर भरण्याचा कालावधी दि.१० ते १७ नोव्हेंबर (दु.२ पर्यंत), नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्याचा कालावधी दि.१० ते १७ नोव्हेंबर (दु.३ पर्यंत) रविवार या सुट्टीच्या दिवशी नाम निर्देशन पत्र स्वीकारण्यात येणार नाहीत.

नामनिर्देशन पत्राची छाननी व वैदरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दि.१८ नोव्हेंबर स.११ वाजेपासून, नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपील नसेल तेथे दि.१९ ते २१ नोव्हेंबर दु.३ वाजेपर्यंत, अपील असल्यास दि.२५ नोव्हेंबर पर्यंत, निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरीत्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दि.२६ नोव्हेंबर, मतदानाचा दि.२ डिसेंबर स.७.३० पासून ते सायं.५.३० पर्यंत, मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दि.३ डिसेंबर स.१० वाजल्यापासून, शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करणे दि.१० डिसेंबर पूर्वी कलम १९ मधील तरतुदीनुसार अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे यांनी दिली. यावेळी निवडणूक विषयक आचारसंहिते बाबत मार्गदर्शन करून लोकसभा, विधानसभा प्रमाणे सांगोला नगरपालिका या निवडणुका शांततेत पार पाडाव्यात असे आवाहन सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी केले.

एकुण मतदान केंद्र संख्या ४० आहे. तसेच खर्च मर्यादा थेट नगराध्यक्ष यांच्यासाठी ७ लाख ५० हजार तर सदस्य यांच्यासाठी २ लाख ५० हजार इतकी आहे. आचार संहिता कालावधी हा दि.४ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर असून, जाहीर प्रचार कालावधी हा दि.२७ ते ३० नोव्हेंबर पर्यंत आहे. जाहीर प्रचाराची ठिकाणे छत्रपती शिवाजी महाराज चौक, नेहरू चौक, जय भवानी चौक, महात्मा फुले चौक, न्यू इंग्लिश स्कूल मैदान ही आहेत.

**- डॉ.सुधीर गवळी, सहा.निवडणूक निर्णय अधिकारी**

# डॉ. रेवती कामत आणि आरती कुंडलकर यांच्या शास्त्रीय संगीत मैफिलीने पंढरपूरकर तृप्त

### नादब्रह्म कला फाऊंडेशन आणि आरती मंडप मनमाडकर परिवार यांचे वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ नोव्हेंबर -**

अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रचार आणि प्रसारासाठी नादब्रह्म कला फाऊंडेशन करकंब आणि आरती मंडप मनमाडकर परिवार यांचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या डॉ. रेवती कामत आणि आरती कुंडलकर यांच्या सुश्राव्य अभिजात शास्त्रीय संगीताच्या मैफिलीला पंढरपूरकरांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

सुरुवातीला आरती कुंडलकर, डॉ. रेवती कामत, सुयोग कुंडलकर,संजय देशपांडे, डॉ.अनिल जोशी, शुभांगी जोशी, डॉ.विनय भोपटकर, भगवान भाऊ मनमाडकर,शुभांगी मनमाडकर, ज्ञानेश्वर दुधाणे, रामदास रोंगे, डॉ.प्रसाद कुलकर्णी यांचे हस्ते विठूरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी करत त्रैमासिक संगीत मैफिलीचा उद्देश सांगत पण पं.शौनक अभिषेकी यांच्या मार्गदर्शनाखाली तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान पुणे यांचे वतीने मार्च २०२६ मध्ये पं.जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर प्रथम सत्रात डॉ.रेवती कामत यांच्या गायनाने मैफिलीला सुरूवात केली. त्यांनी राग बिहागडा विलंबित तीनतालात सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. नंतर बंदिश,तराणा आणि तुकाराम महाराजांचा अभंग सादर केला. त्यानंतर द्वितीय सत्रामध्ये आरती ठाकूर -कुंडलकर यांच्या गायनाला सुरुवात झाली त्यांनी सुरुवातीला राग मधुकंस विलंबित ऐकताला मध्ये आए री शाम सुंदरवा सादर करत राग जनसमोहिनी मधील मत्त तालातील बंदिश आणि डॉ प्रभाताई अत्रे यांच्या अजरामर कलावती मधील बंदिशी तन मन धन तोपे वारु, सादर करत सुखा लागी करीशी तळमळ ,अभंग सादर करत सादर करत विठूरायाच्या गजराने भैरवी सादर केली. यावेळी आरती कुंडलकर यांनी आपल्या स्वरांनी गुरु डॉ प्रभाताई अत्रे यांची क्षणाक्षणाला आठवण करुन देत मैफिल रंगवत कार्यक्रमाची सांगता केली. त्यांना तितकीच सुंदर आणि उठावदार साथसंगत हार्मोनियम - सुयोग कुंडलकर, तबला- संजय देशपांडे, पखवाज- ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ - माऊली खरात आणि तानपुरा- पारुल पारमार यांनी करत कार्यक्रमाला रंगत आणली. यावेळी पंढरपूर आणि पंचक्रोशीतील कलासाधक कलाप्रेमी आणि कला रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम ाचा आस्वाद घेतला. कार्यक्रम अगदी वेळेवर सुरू केला आणि पुढेही अशाच पध्दतीने वेळेवर कार्यक्रम सुरू करावा सांगत कार्यक्रम आयोजकांच्या वतीने यशस्वी केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आरती मनम ाडकर यांनी करत राजेश खिस्ते यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर दुधाणे, धनंजय मनमाडकर, ज्ञानेश्वर खरात, डॉ.अनिल जोशी शुभांगी जोशी, निलेश सावळे, माधुरी सावळे यांनी परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला.





## महत्वाचे...



### महादेव मंदिरात मैत्रेय क्लबतर्फे दीपोत्सव

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

मैत्रेय क्लबतर्फे महादेव मंदिर परिसरात आनंदात दीपोत्सव दी.५ नोव्हेंबर रोजी महादेव नगर श्रीशैल नगर जुळे सोलापूर येथे साजरा करण्यात आला. मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाला होता. या वेळी अनेक भक्तांनी उपस्थित राहून भगवान महादेवाच्या चरणी दीपप्रज्वलन केले. कार्यक्रमाची सुरुवात महादेव पूजनाने झाली. त्यानंतर सर्व सदस्य आणि नागरिकांनी एकत्र येऊन मंदिर परिसरात दिवे लावले. दीपोत्सवाच्या निमित्ताने समाजात एकता, शांतता आणि सकारात्मकतेचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन मैत्रेय क्लबच्या सदस्यांनी मोठ्या उत्साहाने केले. क्लबचे पदाधिकारी यांनी सांगितले की, ''दीपोत्सव हा फक्त प्रकाशाचा नव्हे, तर सेवा, श्रद्धा आणि संस्कृतीचा उत्सव आहे. कार्यक्रमाला मान्यवर वैजिनाथ हत्तुरे, सुरेश कामशेट्टी सोलापूर मैत्रेय क्लब चे संचालक सुधाकर काम शेट्टी नीलकंठ पटणे नवनाथ गुरव चिदानंद पटणे अंकुश माळी नरेंद्र कामशेट्टी अशोक पाटणे आणि नागरिक, महिला, युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्वांनी हर हर महादेवच्या जयघोषात दीपोत्सवाची सांगता करण्यात आले.



### विडी घरकुल गोविंदराज नगरात दीपोत्सव आणि संगीत संध्या कार्यक्रमात रसिक तल्लीन

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

गोविंदराज नगर गणेशोत्सव मंडळ आणि अवनी डेव्हलपर्स अँड कन्स्ट्रक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दीपावली कार्तिक एकादशीनिमित्त भव्य दीपोत्सव आणि वेणूज् संगीत संध्या या कार्यक्रमाने तेथील परिसर भक्तीत तल्लीन झाले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन अवनी डेव्हलपर्सचे संचालक लक्ष्मण सिध्दूल, चार्टर्ड अकौंटंट चंद्रकांत इंजामुरी आणि अरिहंत स्कूलचे संस्थापक डॉ. अजय पोन्नम, यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आले. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या संगीत संध्या कार्यक्रम तल्लीन होऊन मनमोकळेपणाने नृत्य करीत आनंद लुटला. या कार्यक्रमाने परिसरातील वातावरण अगदी भक्तीमय झाला.यामुळे आनंद, भक्तीभाव आणि ऐक्याची भावना अनुभवायला मिळाली. या कार्यक्रमास विशेष उपस्थिती डॉ सुर्यप्रकाश कोठे, विभागीय खाण खनिज अधिकारी भानुचंद्र कोलप्याक, माजी नगरसेवक विठ्ठल कोटा, वासू यलदंडी, नरेश कोलप्याक, दिपक दोंता, अमर गुर्रम, निशांत पोरे, दिपीका यलदंडी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वेणूज् आर्केस्टाचे वेणुगोपाल उत्तूर, महेश चव्हाण, रविंद्र तुम्मनपल्ली, नरेश आरसिद, अनुराधा गंगुल, वर्षा सोनवले यांनी तेलुगु, मराठी, कन्नड आणि हिंदी गाण्याने कार्यक्रमाची मैफील रंगवली. यावेळी रसिकांच्या वन्स मोअर प्रतिसादाने गायकांचीही प्रशंसा झाली. यावेळी रसिकांना आणि विडी घरकुल परिसरातील नागरिकांना मनसोक्त आनंद घेता आला. यावेळी अवनी डेव्हलपर्सचे संचालक लक्ष्मण सिध्दूल आणि हिरालाल माकम यांनीही आपल्यातील कला यावेळी सादर करून वाह ..वाह.. मिळवली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# शेत जमिनीतून वळवला नाल्याचा प्रवाह

- **महापालिका कर्मचारी, विकासकानी संगनमतातून प्रताप केल्याचा आरोप**
- **सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टची महापालिका आयुक्तांकडे तक्रार चौकशी करून संबंधितांवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ नोव्हेंबर-**

जुना कारंबा नाका जवळील श्री. सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्टीच्या तब्बल दीड एकर शेत जमिनीवरून बेकायदेशीरिता बनावट नकाशाच्या आधारे महापालिका कर्मचारी आणि बिल्डर (विकासका)च्या संगनमतातून नाला (ओढा) वळविण्यात आला असल्याची तक्रार ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे यांनी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे केली आहे.

दरम्यान, संबंधितांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. ओढ्याचे पात्र पुर्ववत करण्यात यावे. ते ले-आऊट रद्द करण्यात यावे, अशी मागणी केली आहे. श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्ट तर्फे चिफ ट्रस्टी मोहन बोड्डू व मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे यांनी



यासंदर्भात आयुक्तांकडे तक्रार दिली आहे. दरम्यान, आज त्यांनी आवश्यक ते पुरावे आणि कागदपत्रेही सादर केली आहेत. शहरातील जुना कारंबा नाका परिसरात श्री. सदगुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्टच्या मालकीची गट नं. २१ हि ६ एकर शेतजमीन कसबे सोलापूरमध्ये आहे. त्यापैकी तब्बल दीड एकर शेत जमिनीवर बेकायदेशीर हा ओढा वळविला आहे. या ठिकाणी महापालिका आयुक्त यांच्या बनावट आदेशाच्या आधारे व आदेश नसताना सोलापूर महापालिका कर्मचारी, अधिकारी व विकासक नंदकिशोर पंचारिया यांनी संगनमतानी दिशाभूल करून सरकारी रस्त्याची व डी.पी. रोडच्या जमिनीमधून मोठा सांड पाण्याच्या ओढा तब्बल ९० अंशामध्ये दोन ठिकाणी जवळ जवळ १०० फुट इतका वळवला आहे, असा खळबळजनक आरोप आणि तक्रार ट्रस्टीने केली आहे. येथील कसबे सोलापूर येथील गट नं. २१ चे दक्षिणेस व सि.स. नं.टी.पी. ४ फायनल प्लॉट नं.३३ व ३४ चे उत्तरेस असलेला नैसर्गिक ओढ्याचे पात्र बेकायदेशीर रित्या वळवून फायनल प्लॉट नं. ३३ व ३४ मध्ये बेकायदेशीर रित्या ले-आऊट मंजुर करून घेतला आहे व दक्षिणेकडील डि.पी. रोड व ओढापडची जागा हडप केली आहे, असा आरोप केला आहे. ट्रस्टीच्या शेत जमिनीवरून तब्बल दीड एकर परिसरात हा ओढा वळविला असल्याने शेतजमीन नापीक झाली आहे. केली पाच वर्षापासून ट्रस्टीला हे नुकसान सहन करावे लागत आहे. प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्टच्या जमीनीमधून आयुक्त यांचा कोणताही आदेशा नसताना फसवणुक, नुकसान करण्याच्या उद्देशाने व सरकारी रस्त्याची जमीन हडप करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर रित्या सांड पाण्याचा मोठा ओढा वळवून ट्रस्टच्या जमिनीचे नुकसान केले. बोगस नकाशे व आदेश दाखवून बनावट ले-आऊट मंजुर करून घेतले असा आरोप ट्रस्ट पदाधिकाऱ्यांनी केला आहे. हे ले-आऊट रद्द करून ओढयाचे पात्र पुर्ववतची मागणी केली आहे. बेकायदेशीर रित्या ओढयाचे पात्र वळवल्याप्रकरणी नंदकिशोर पंचारिया व पालिकेचे संबंधित कर्मचारी अधिकारी यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. ओढ्याचे पात्र पुर्ववत करण्यात यावे.टी. पी. ४ फायनल प्लॉट नं. ३३ व ३४ मधील ले-आऊट रद्द करण्यात यावे, अशी मागणी ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे केली आहे.

## पानगावजवळ अपघात; दुचाकीस्वाराचा मृत्यू

**बार्शी, दि. ६ नोव्हेंबर-**

बार्शी-सोलापूर मार्गावरील पानगाव येथील शिंदे वस्तीजवळ दुचाकी व टेम्पो यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच ठार झाला. हा अपघात मंगळवारी सायंकाळी झाला. मृत व्यक्तीचे नाव नितीन महादेव वरपे (वय ३७, रा. मसा, ता. कळंब,जि. धाराशिव) असे आहे.



फिर्यादी गजानन दिपक काटकर (वय ३०, रा. जुने रेल्वे स्टेशन रोड, बार्शी) यांच्या दिलेल्या माहितीनुसार,ओडिशा राज्यातील टेम्पो चालक बसंता कुमार परिदा (रा. हारिपुर, जि. नयागढ) हा त्याचा टेम्पो क्रमांक (ओडी ०२ सी क्यू ५६७६) निष्काळजीपणे चालवत होता. शिंदे वस्तीजवळ समोरुन येत असलेल्या नितीन वरपे यांच्या दुचाकी क्रमांक एमएच १३ ईएच ८७१४ ला जोरदार धडक दिली. यामध्ये नितीन वरपे गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाले. बार्शी तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. टेम्पो चालक बसंताकुमार परिदा याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.







# सोलापूर बाजार समितीत सोयाबीनची ५२३ क्विंटल आवक; दर पोहोचला ४५०० रुपयांवर

- **साठवणुकीची ज्वारी बाजारात दाखल; सुमारे ४१ क्विंटलला सरासरी ३,२०५ रुपयांचा दर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ नोव्हेंबर**

सोलापूर सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुरुवार दि.६ नोव्हेंबर रोजी सोयाबीनची सुमारे ५२३ क्विंटल इतकी आवक आली होती. लिलावात सोयाबीनला सर्वात कमी ३,५०० रुपये तर सर्वाधिक ४,५१५ रुपये आणि सरासरी ४,२०० रुपये असा प्रति क्विंटल दर मिळाला.

सोयाबीन नंतर सर्वात जास्त पिकवले जाणारे कडधान्य म्हणून उडदाकडे पाहिले जाते. उडदाचा उतारा देखील मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने, शेतकरी उडीद पेरतो. बाजार समितीत उडदाची सुमारे १५० पिशव्या आवक आली होती.

उडदाला सर्वात कमी २,८०० रुपये, सर्वाधिक ७,२०० रुपये तर सरासरी ५,२०० प्रतिक्विंटल असा दर मिळाला. तर जिल्ह्यात तुरीचे उत्पादन क्षेत्र देखील बऱ्यापैकी आहे. तूरची ८५ पिशव्या आवक बाजारात आली होती. तुरीला सर्वाधिक ७,००० रुपये तर सर्वात कमी ५,८०० रुपये आणि सरासरी ६,४०० रुपये असा प्रतिक्विंटल दर प्राप्त झाला. त्याचप्रमाणे लोकल हरभऱ्याला कमीत कमी ५,५०० रुपये तर सर्वाधिक ६,००० रुपये तर अण्णगिरी हरभऱ्याला ६,००० ते ६,१०० रुपये प्रति क्विंटल असा दर मिळाला. कडधान्याच्या खरेदीसाठी राज्य शासनाकडून हमीभाव खरेदी केंद्र सुरू केले जाणार आहे. केंद्र सुरू करण्यासाठी लवकरच रजिस्ट्रेशन सुरू होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याच्या प्रतिक्षेत शेतकरी असल्याचे दिसत आहे.

**साठवणुकीची ज्वारी बाजारात**

कडधान्याच्या आवक झाल्यानंतर बाजारपेठेत ज्वारीची देखील आवक वाढत आहे. सध्या बाजारात साठवणुकीची ज्वारी विक्रीसाठी दाखल होत आहे. गुरुवारी बाजार समितीत साठवणुकीतील मालदांडी ज्वारीची आवक सुमारे ४१ क्विंटल इतकी होती. लिलावात ज्वारीला बोली लावण्यात आली. आडते आणि खरेदीदार यांच्या बोलीतून ज्वारीला कमीत कमी २,३१० ते सर्वाधिक ३,७४८ रुपये तर सरासरी ३२०५ रुपये प्रति क्विंटल असा दर मिळाला.

**प्रतीनुसार सोयाबीनचे दर :** गेल्या काही दिवसांपूर्वी सोयाबीनचे दर चार हजारापर्यंत होते. सध्या बाजारात आवक आणि दर दोन्ही वाढत आहेत. चांगल्या दर्जाचा शेतमाल विक्रीसाठी येत असल्याने खरेदीदार देखील यामध्ये उत्सुकता दाखवत आहेत. लिलावात कडधान्याला चांगला दर मिळत आहे. अतिवृष्टीमुळे सोयाबीन भिजले तरी, सोयाबीन वळवून शेतकरी बाजारपेठेत विक्रीसाठी आणत आहेत.

**- सुनील माने, खरेदीदार**

**सोयाबीन प्रमाणेच ज्वारीला देखील भाव :** सोलापूर सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन तसेच ज्वारीच्या उत्पादनाला चांगले दर मिळत आहेत. साठवणुकीची ज्वारी बाजारात विक्रीसाठी दाखल आहे. ज्वारीला देखील चांगला दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हाताशी आलेला सोयाबीन उडीद तूर खराब झाल्याने दर प्रतवारीनुसार ठरत आहेत.

**- बसवराज इटकळे, अडते**

**भाव वाढीची अपेक्षा :** सोयाबीनचे हमीभाव केंद्र सुरू होणार आहे. केंद्रामध्ये सोयाबीनला चांगला दर मिळेल अशी आशा आहे. ज्वारीचे दर सध्या वाढत आहेत. अशीच दर वाढीच्या पेक्षा आहे.

**- औदुंबर मस्के, शेतकरी**

## ज्ञान आणि कर्माच्या संयोगातूनच मानवी जीवनाची धन्यता

- **ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर**
- **विकास सहकारी बँकेच्या 'वाग्यज्ञ' ला सोलापूरकरांचा उदंड प्रतिसाद**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ नोव्हेंबर**

ज्ञान आणि कर्माच्या संयोगातूनच मानवी जीवनाची धन्यता साध्य होते, असे प्रतिपादन ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांनी केले. विकास सहकारी बँकेतर्फे हेरिटेज लॉन्स येथे आयोजित तीन दिवसीय 'वाग्यज्ञ' च्या दुसऱ्या दिवशी गुरूवारी ह.भ.प. देगलूरकर महाराजांनी मार्गदर्शन केले.

यंदाच्यावर्षी ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर 'म्हणोनि जेथ श्री श्रीमंतु (कर्तुत्व आणि कृपा) या श्री ज्ञानेश्वरीतील १८ व्या अध्यायातील ओवीवर प्रवचन केले. यावेळी त्यांनी मानवी जीवनातील ज्ञान आणि कर्माची व्याख्या, महत्व आणि गरज विशद केली. ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले, योगेश्वर श्रीकृष्ण ज्ञानाचे प्रतीक आहेत. तर धनुर्धारी अर्जुन कर्तव्याचे प्रतीक आहेत. केवळ ज्ञानमार्ग, केवळ कर्ममार्ग किंवा फक्त आंधळी भक्ती उपयोगाची नाही. या तिन्हीच्या समन्वयातून मानवी जीवन संपन्न होते. परमार्थ ही दिखाव्याची बाब नाही तर ती प्रत्यक्ष जगण्याची बाब असते. अनुभव नसलेले ज्ञान ही केवळ माहिती असते. कर्मासोबत असलेले ज्ञान जीवनात समृद्धी आणते. ज्ञानच मनुष्याला वस्तुस्थितीची जाणीव करून करून देते, असेही ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांनी सांगितले. कर्म हे ज्ञानाचे साधन झाले पाहिजे. ज्ञान आणि कर्म दोन्ही महत्वाचे आहे. पण ज्ञानाचे महत्व अधिक असते. तथापि ज्ञानाचा अधिकार प्रत्येकाला आहे. पण ज्ञानाला निष्काम कर्माची जोड दिल्यामुळे मनुष्याला विशेषत्वाची प्राप्ती होते, असेही ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले.

संजीव कुसुरकर यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी विकास सहकारी बँकेचे अध्यक्ष कमलकिशोर राठी, उपाध्यक्ष राजगोपाल चंडक, ज्येष्ठ संचालक राजगोपाल मिणियार, हरीनिवास जाजू, पांडुरंग मंत्री, मनीष बलदवा, ज्योती आसावा, प्रवीण बजाज, सुनील माहेश्वरी आदी उपस्थित होते. संजीव कुसुरकर यांनी सूत्रसंचालन केले.

**सोलापूरकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन**

ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या रसाळ वाणीतून होणाऱ्या 'वाग्यज्ञा' चा शुक्रवारी समारोप होणार आहे. सायंकाळी ६.३० वाजता गांधीनगर येथील हेरिटेज लॉन्स येथे सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विकास सहकारी बँकेतर्फे करण्यात आले आहे.

# सराफ दुकानावर दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या चौघांना अटक

- **शहर गुन्हे शाखेची कारवाई; अन्य दोघे फरार**
- **अल्पवयीन मुलाचाही गुन्ह्यात समावेश**



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ नोंव्हेबर -**

सोलापूर शहरातील आरटीओ कार्यालय परिसरातील समर्थ ज्वेलर्सवर दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळीतील चौघांना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना अटक केली आहे. या गुन्ह्यात एका अल्पवयीन मुलाचा समावेश असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले असून या टोळीतील अन्य दोघे अद्याप फरार आहेत. या गुन्ह्यात पोलिसांनी दरोड्याचे कलम वाढविले आहेत.

साहिल दशरथ गायकवाड, समर्थ समीर गायकवाड, सार्थक दशरथ गायकवाड आणि अनिकेत पांडुरंग गायकवाड (सर्व रा. भैरू वस्ती, लिमयेवाडी, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणात अजिंक्य चव्हाण (रा. वारजे माळेवाडभ, जि. पुणे) आणि विशाल जाधव (रा. तुळजापूर) हे दोघे फरार आहेत. विजापूर रोडवरील आरटीओ कार्यालय परिसरातील गणेश नगर बस स्टॉपजवळ दिपक दिगंबर वेदपाठक यांचे समर्थ ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. १ नोव्हेंबर रोजी रात्री पावणे आठच्या सुमारास वेदपाठक यांच्या समर्थ ज्वेलर्स या दुकानात मोटारसायकलवरून आलेल्या चोरट्यांनी कोयता व पिस्टलचा धाक दाखवित वेदपाठक व दुकानातील कर्मचाऱ्यांना दमदाटी करीत दुकानातील सोन्याचे दागिने लुटण्याचा प्रयत्न केला.

यावेळी चोरट्यांनी कोयत्याने मारून दुकानातील काचे फोडून १० हजारांचे नुकसान केले होते. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेताना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळाच्या परिसरातील तसेच शहराच्या विविध भागातील सुमारे १२५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या चित्रीकरणाची तपासणी करून संशयित आरोपींची ओळख पटविली. या गुन्ह्यातील संशयित तीन गुन्हेगार हे एमएच १३ ईए २५७८ क्रमांकाच्या दुचाकीवर यतीमखान्याजवळील मोकळ्या मैदानात थांबल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले. त्यांनी त्यांची नावे साहिल, समर्थ, सार्थक अशी सांगितली. या तिघांकडे करण्यात आलेल्या चौकशीमध्ये त्यांनी हा गुन्हा त्यांच्या एका अल्पवयीन साथीदार मुलासह अजिंक्य चव्हाण व विशाल जाधव याच्या मदतीने केला असल्याचे सांगितले. तिघांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी अनिकेत यास अटक केली.

या चौघांकडून पोलिसांनी दोन दुचाकी, एक कोयता, दोन मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शैलेश खेडकर, शंकर धायगुडे, विजय पाटील, मुकेश गायकवाड, निलेश पाटील-सोनवणे, तुकाराम घाडगे, दत्तात्रय काळे यांच्या कर्मचाऱ्यांनी केली.

**अजिंक्य, साहिल व विधीसंघर्षित बालक पोलिसांच्या रेकॉर्डवरील**

या गुन्ह्यातील आरोपी अजिंक्य चव्हाण याचे पुणे येथे रेकॉर्ड आहे. त्याच्याविरुध्द पुणे पोलिसांकडे गुन्हे दाखल आहेत. तर साहिल गायकवाड आणि अजिंक्य चव्हाण यांच्याविरुध्द वळसंग पोलिस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. तसेच विधीसंघर्षित बालकदेखील रेकॉर्डवरील असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले.

**अशी घडली घटना...दिशाभूल करण्यासाठी दुचाकीचा कलर बदलला...**

दरोड्याचा गुन्हा करण्यापूर्वी यातील सर्व आरोपी हे दमाणी नगर परिसरातील गोल्ड जिम समोरील मैदानात एकत्र आले. त्याठिकाणी समर्थ ज्वेलर्स दुकान लुटण्याचा कट रचला. त्यावेळी अजिंक्य चव्हाण याने त्याच्याकडे पिस्टल व ३ काडतुसे आणि साहिल गायकवाड याने लोखंडी कोयता घेतला. अजिंक्य चव्हाण याच्या ताब्यातील विना नंबर प्लेटची पांढऱ्या रंगाची ॲक्टीव्हा गाडीला स्प्रे पेंटींगद्वारे निळा कलर स्प्रे ने मारला. त्यानंतर निळ्या दुचाकीवर अजिंक्य, विशाल आणि साहिल हे तसेच समर्थ, सार्थक व विधीसंघर्षीत बालक हे मोटारसायकलवरून समर्थ ज्वेलर्स दुकानाजवळ आले. त्यावेळी अजिंक्य, साहिल यांनी तोंडास मास्क बांधून दुकानात शिरले तर विशाल हा बाहेर गाडीवरच थांबला. उर्वरीत तिघे हे दुकान लुटताना काही गडबड झाल्यास त्यांना मदत करण्यासाठी दुकानाच्या आसपासच थांबून राहिले होते. दुकानात शिरलेल्या अजिंक्यने दुकान मालकाला पिस्टलचा धाक दाखवित दमदाटी केली तर साहिलने बॅग टाकून सोन्याचे दागिने बॅगेत भर असा दम दिला. साहिलने कोयत्याने मारून काऊंटरवरील काच फोडली. दुकान मालकाने आरडाओरड करण्यास सुरुवात केल्यानंतर साहिल, अजिंक्य हे दोघे निळ्या रंगाच्या गाडीवरून पळून गेले. त्यानंतर ते सर्वजण एकत्रित लिमयेवाडीतील समर्थच्या घराजवळील बोळात आले व निळ्या रंगाच्या गाडीचा रंग पेट्रोलने धुतला.

PRECISION FOUNDATION

सस्नेह निमंत्रण

प्रिसिजन फाउंडेशन आयोजित...

प्रिसीजन गप्पा

पर्व १७ वे

शुक्रवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०२५

कार्यक्रम सर्वांसाठी खुला

गौरी थिएटर्स प्रस्तुत
प्रशांत दामले फॅन फौंडेशन प्रकाशित

संकर्षण VIA स्पृहा
निखळ मनोरंजनाचा हलका फुलका प्रयोग!

कलाकार
संकर्षण कऱ्हाडे । स्पृहा जोशी

सहकलाकार
गंधार जोग । विनय चेऊलकर



संकर्षण कऱ्हाडे यांची रसाळ विनोदबुद्धी,
मार्मिक कविता आणि
स्पृहा जोशी यांच्या भावस्पर्शी कवितांची गुंफण !
संस्कृती म्हणजे केवळ परंपरा नव्हे,तर ती काळाशी नाते सांगणारी जिवंत संवेदना आहे.
कथा, कविता आणि किश्शांचा भरघोस नजराणा...

Soham Ads

वेळ : सायं. ६:२५ वा स्थळ : शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वीरशैव लिंगायत समाजातील पोटजातीचा १४ डिसेंबरला वधू-वर मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

येथील वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्या वतीने रविवार १४ डिसेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सोलापुरातील लिंगशेट्टी मंगल कार्यालय, कस्तुरबा मार्केट जवळ ११ वा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती मार्गदर्शक ॲड. बसवराज सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली. मेळाव्यात महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोटजातींच्या युवक -युवती सहभागी होणार आहेत. काशीपीठाचे जगद्गुरू ज्ञान सिंहासनाधीश्वर श्रीश्रीश्री १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी व श्रीशैल पीठाचे जगद्गुरु श्री श्री श्री १००८ डॉ. चन्नसिद्धाराम शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आशीर्वादाने हा मेळावा होणार आहे.

मेळाव्याच्या स्वागताध्यक्षपदी मुंबईचे विधीज्ञ ॲड. प्रदीप सलगर यांची निवड करण्यात आली आहे. मागील १० वर्षांत मेळाव्याच्या माध्यमातून जवळपास ५ हजार ८६६ जणांचे विवाह जुळविण्यात प्रतिष्ठानला यश आले आहे. मेळाव्यात इच्छुक वधूवर व त्यांच्या पालकांचे परिचय, तसेच मागील वर्षातील नोंदणीचे पुस्तक उपलब्ध असणार आहे. नाव नोंदणीसाठी ५०० रुपये फी आहे. नाव नोंदणीसाठी वीरशैव लिंगायत प्रतिष्ठान, कुंभारवेस सोलापूर येथील कार्यालयात सकाळी ११ ते संध्या ७पर्यंत सुनील शरणार्थी यांना संपर्क साधावा, असे असे आवाहन ॲड. बसवराज सलगर आणि अध्यक्ष राजशेखर विजापुरे यांनी केले आहे. यावेळी सुनील शरणार्थी, शशिकांत बिराजदार, मनोज कोल्हे, तम्मा कडगंची, आप्पासाहेब मनगुळी, गिरीश तांबे, बाबुराव कलदी, मनोज कोल्हे, प्रदीप सलगर उपस्थित होते.

# शरद राष्ट्रवादी सोडली लगेच अजित राष्ट्रवादीत प्रवेश

## ● काँग्रेसनंतर शरद पवार राष्ट्रवादीत जावून तुतारी घेतलेले सुधीर खरटमल आता हातात घड्याळ घेवून सज्ज

- निवडणुकीच्या तोंडावर शरद पवारांच्या राष्ट्रवादीत घमासान
- नाट्यमय घडामोडीनंतर सुधीर खरटमल यांनी आपल्या अध्यक्षपदाचा दिला राजीनामा
- ऐन निवडणुकीच्या तोंडावर शरद पवारांच्या राष्ट्रवादीत पक्षांतर्गत कुरघोड्या



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ला मोठा धक्का बसला आहे. सोलापुरातील शरद पवार गटाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी अधिकृतपणे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटामध्ये प्रवेश केला आहे.

हा पक्ष प्रवेश मुंबई येथे सोलापूर महापालिकेच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेसने आयोजित केलेल्या आढावा बैठकीत झाला असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्री. खरटमल यांच्या गळ्यात राष्ट्रवादीचा शेला घालून त्यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर, पक्षाचे सोलापूर संपर्क मंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे, शहराध्यक्ष संतोष पवार, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, किसन जाधव, तसेच राज्य पातळीवरील नेते आणि पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

श्री. खरटमल यांच्या पक्ष प्रवेशामुळे सोलापूर शहराच्या राजकारणात मोठे फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. श्री. खरटमल यांचे कार्यकर्ते देखील अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार लवकरच सोलापूर दौऱ्यावर येणार असून त्यावेळी असंख्य कार्यकर्ते तसेच माजी महापौर दिग्गज नेते देखील अजित पवार यांच्या राष्ट्रवादी प्रवेश करणार असल्याचे श्री. खरटमल यांनी सांगितले.

दरम्यान, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पार्टीमध्ये गेल्या काही दिवसांपासून अध्यक्ष विरुद्ध पदाधिकारी असा वाद सुरू झाला होता. श्री. खरटमल यांच्या विरोधाचे लोण थेट गोविंद बागेच्या अंगणात जाऊन थडकले होते. गत सोमवारी शरद पवार यांच्या बारामती येथील "गोविंदबाग " या निवासस्थानी जाऊन शहराच्या काही पदाधिकाऱ्यांनी थेट आपले गाऱ्हाणे राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यासमोर मांडले. त्यामध्ये मुंबई येथे शरद पवार यांनी बोलावलेल्या बैठकीमध्ये श्री. खरटमल यांनी बैठकीस स्वतः न जाता आपल्या कार्यकर्त्याला पाठवल्याचा विषय चिघळला. याच मुद्द्यावरून शरद पवार यांनी श्री. खरटमल यांची चांगलीच कान उघडणी केल्याची माहिती समोर आली होती. काही निवडक पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत हा विषय गाजला होता. यावेळी मात्र श्री. खरटमल यांनी शरद पवार यांच्यासमोर घडलेल्या घटनेनंतर आपल्या चुकीची कबुली दिली होती. मात्र पक्षांतर्गत सुरू असलेल्या राजकारणाला वैतागून हा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले .

दरम्यान, याच घटनेवरून आता काही पदधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर येत आहे. राष्ट्रवादीचा अंतर्गत वाद उफाळून येत असताना शहराध्यक्षांच्या बाजूने राजीनामा नाट्य सुरू असल्याचे दिसून येत आहे. पक्षांतर्गत घडलेल्या या घटनेनंतर नाराज असलेले सुधीर खरटमल यांनी टोकाचा निर्णय घेत, आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर शरद पवारांच्या राष्ट्रवादीत पक्षांतर्गत कुरघोड्या सुरु असल्याचे दिसून येत आहे. तत्पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी प्रमुख पदाधिकाऱ्यांची मुंबईमध्ये बैठक बोलावली होती. याबैठकीस श्री. खरटमल यांनी स्वतः न जाता आपल्या कार्यकर्त्याला पाठवले. दस्तुरखुद शरद पवार यांच्या बैठकीला अध्यक्षांनी दांडी मारल्याने तसेच पूर्वाश्रमीच्या भाजपचे कार्यकर्ते असणाऱ्या महेश गाडेकर यांना आपला जवळचा कार्यकर्ता म्हणून बैठकीला पाठवल्याने राष्ट्रवादीच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा राग अनावर आला. यामुळे राष्ट्रवादीचे शहरातील राजकारण चांगलेच तापले. यावरून शहर राष्ट्रवादीमध्ये अध्यक्ष विरुद्ध कार्यकर्ता असा कलगीतुरा पहावयास मिळाला होता.

### अजित पवार यांच्या सोलापूर दौऱ्यात अनेक दिग्गज नेते करणार पक्षप्रवेश

शरद पवारांच्या राष्ट्रवादीत गेल्या काही दिवसांपासून पक्षांतर्गत वाद चव्हाट्यावर येत आहे. यातूनच अनेक दिग्गज नेते नाराज असल्याचे बोलले जात आहे. या महिन्यात उपमुख्यमंत्री अजित पवार हे सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या दौऱ्यावेळी शरद पवार यांच्या पक्षातील अनेक दिग्गज नेते माजी महापौर व नगरसेवक अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

### खरटमल यांनी शहरातील विविध संघटनात्मक कामांमध्ये सक्रिय भूमिका

सुधीर खरटमल हे शरद पवार गटाचे सोलापूर शहराध्यक्ष म्हणून सक्रियपणे काम पाहत होते. त्यांनी गेल्या काही महिन्यांत शहरातील विविध संघटनात्मक कामांमध्ये सक्रिय भूमिका बजावली होती. मात्र, गटांतील अंतर्गत मतभेद आणि आगामी निवडणुकांतील संधी लक्षात घेऊन त्यांनी अजित पवार गटात प्रवेश दिला आहे. त्याचा फायदा पक्षाला होईल. **- संतोष पवार, शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट )**

### संघटनात्मक ताकद निश्चितच वाढणार

सुधीर खरटमल यांच्या प्रवेशानंतर अजित पवार गटात उत्साहाचे वातावरण आहे. ''खरटमल यांच्यासारखा मजबूत संघटनात्मक कार्यकर्ता आमच्या गटात आल्यानं सोलापुरात राष्ट्रवादी अजित पवार गट आणखी बळकट होणार आहे. सोलापूर महापालिकेच्या निवडणुकांपूर्वी राजकीय घडामोडींना वेगळे वळण लावणारा मोठा टप्पा मानला जात आहे. श्री. खरटमल यांच्या प्रवेशामुळे सोलापुरातील राष्ट्रवादी अजित पवार गटाची संघटनात्मक ताकद निश्चितच वाढणार आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### डॉ तेजस्वी गपाट यांचे सनदी लेखापाल परीक्षेत यश



**बार्शी, दि. ६ नोव्हेंबर-**

येथील डॉ तेजस्वी विजय गपाट या सनदी लेखापाल (चार्टर्ड अकौटंट) ही परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. तेजस्वी यांनी अगोदर मुंबई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून डेंटल सर्जरीतील पदवी घेतली होती. सनदी लेखापाल विजय गपाट यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्यांनी सनदी लेखापाल होण्याची जिद्द बाळगत तयारी केली. कुटुंबियांची साथ व अथक परिश्रमातून त्यांनी या परीक्षेत उज्ज्वल यश मिळवले. विजय गपाट यांचे बंधू गणेश गपाट हेही सनदी लेखापाल आहेत. एका सामान्य शेतकरी कुटुंबातुन प्रगती साधलेल्या नवनाथ गपाट यांच्या कुटुंबातील तिघे सनदी लेखापाल झाले आहेत. डॉ तेजस्वी गपाट या बार्शीतील डॉ गणेशकुमार सातपुते यांच्या भगिनी आहेत.

### सामान्य ज्ञान स्पर्धेत श्रावणी कांबळे प्रथम



**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

संजीवनी पब्लिकेशन सोलापूर आयोजित तालुकास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेत सेवासदन प्रशालेच्या श्रावणी दिपक कांबळे इ. सहावी या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक पटकाविले. संजिवनी पब्लिकेशनच्या पदाधिकारी यांच्या हस्ते श्रावणीला तीन हजार रुपयांचे धनादेश, प्रमाणपत्र, ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. यशाबद्दल मुख्याध्यापिका रनपीसे, स्मिता कोर्टीकर, संतोशी सुरवसे, सिध्दाराम तट्टे आदींनी अभिनंदन केले.

### जिजामात हॉस्पीटलजवळून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

शहरातील जिजामाता हॉस्पीटलबाहेरील बाजूस लावलेली ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याबाबत सिद्राम लक्ष्मण विटकर (वय ३६, रा. गणपती घाट, मंठाळकर वस्ती, तुळजापूर रोड, तळे हिप्परगा, सोलापर) यांच्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सिद्राम विटकर यांनी त्यांची एमएच १३ ईई ५२४४ क्रमांकाची दुचाकी ही १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी जिजामाता हॉस्पीटल बाहेर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद झाली आहे. हवालदार बाबर पुढील तपास करीत आहेत.

### ट्रॅक्टर ट्रॉलीला धडक दिल्याने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

थांबलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला धडक दिल्याने दुचाकीस्वार जखमी झाला. दिलीप जालिंदर बटाणे (वय ५२, रा. सय्यद वरवडे, ता. मोहोळ) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी राहत्या घरापासून दिलीप बटाणे हे दुचाकीवरून वरवडे येथील शेताकडे जात होते. त्यावेळी घराजवळ थांबलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला पाठीमागून धडक दिल्याने त्यात दिलीप बटाणे यांच्या डोक्याला, तोंडाला जबर मार लागला. त्यामुळे त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पिकअपच्या धडकेने रिक्षातील दोघे जखमी

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

सोलापूर ते अक्कलकोट रोडवरील वळसंगजवळील आश्रम शाळेसमोर पिकअपच्या जीपच्या धडकेने रिक्षातील दोघे जखमी झाले. चाँदपाशा नबीलाल शेख (वय ५१, रा. कुमारस्वामी नगर, शेळगी, सोलापूर) आणि प्रभाकर चंदू पिंपळे (वय ५५, रा. करमाळा) अशी जखमींची नावे आहेत. चाँदपाशा शेख व प्रभाकर पिंपळे हे दोघे ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी रिक्षामधून अक्कलकोट वरून सोलापूरकडे येत होते. वळसंगच्या अलीकडे असलेल्या आश्रमशाळेजवळ रस्त्यावर ऊसाचा ट्रॅक्टर जात असल्याने चॉदपाशा शेख याने रिक्षा थांबविली. त्याचवेळी पाठीमागून आलेल्या चारचाकी पिकअप गाडीने रिक्षाला जोरदार धडक दिली. या अपघातात रिक्षातील दोघे जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## आज जिल्ह्यातील सर्व शाळांत घुमणार वंदे मातरम्‌ची धून !

- होम मैदानावरही होणार सामुहिक गायन
- जिल्हाधिकाऱ्यांसह इतर अधिकारी राहणार उपस्थित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

देशाचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'च्या निर्मितीला १५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्त ३१ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर या कालावधीत राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये वंदे मातरम् या गीताचे गायन, त्या गीताचा इतिहास सांगणाऱ्या प्रदर्शन तसेच कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याच पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांमध्ये देखील आज, ७ नोव्हेंबर रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तर होम मैदानावर वंदे मातरम्‌चे सामुहिक गायन होणार असून, या कार्यक्रमास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व इतर अधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली.




भारत देशाचे राष्ट्रीय गीत बंकिम चंद्र चट्टोपाध्याय यांनी तयार करून त्यास ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी 'वंदे मातरम्' १५० वर्षे पूर्ण होत आहेत. राज्यातील शाळा, महाविद्यालयांमधून रोज वंदे मातरम् या गीताची काही कडवी गायिली जात असतात. मात्र, १५० वर्षपूर्तीचे औचित्याने ३१ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०२५ या कालावधी दरम्यान राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये 'संपूर्ण वंदे मातरम'चे गायन व्हावे, तसेच 'वंदे मातरम' या गीताचा इतिहास सांगणारे कार्यक्रम व्यवस्थापनाच्या वतीने आयोजित केले जावे, अशा राज्यातील शाळांना सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे आज जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालये आणि होम मैदानावर वंदे मातरम् धुन सर्वांना ऐकायला मिळणार आहे.

### दुचाकी स्लीप होऊन झालेल्या अपघातातील जखमी युवकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

दुचाकी स्लीप होऊन झालेल्या अपघातातील जखमी युवकाचा मृत्यू झाला. कृष्णा गोपाल नारायणकर (वय १८, रा. हनुमान नगर, भवानी पेठ, सोलापूर, सध्या रा. द्वारका सिटी, महाळुंगे, ता. खेड, पुणे) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. ३० ऑक्टोबर रोजी साडेदहाच्या सुमारास कृष्णा हा राहत्या घरातून दुचाकीवरून दुध आणण्यासाठी जात होता. त्यावेळी घराजवळ गाडी चिखलात स्लिप होऊन पडल्याने कृष्णाच्या पायास मुका मार लागल्याने त्यास पुणे येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने त्यास ५ नोव्हेंबर रोजी रात्री वडील गोपाळ यांनी पुढील उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले असता कृष्णाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. ओंकार तलकोकूल यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र शासनाने नायलॉन मांजाची विक्री व करण्यावर निर्बंध घातलेले आहेत.

त्याअनुषंगाने बुधवारी नई जिंदगी परिसरात पेट्रोलिंग करीत असताना विमातळाच्या पाठीमागील बाजूस एक लहान मुलगा नायलॉन मांजा वापरून पतंग उडवित असताना आढळून आला. त्यामुळे त्यांच्या पालकांना बोलावून त्यांना पतंग उडविण्याकरिता नायलॉन मांजा लहान मुलांना न देण्याची समज देऊन महाराष्ट्र पोलीस कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

तसेच नई जिंगदी परिसरात आणखी पेट्रोलिंग करीत असताना बिलाल इब्राहिम शेख (वय-३४ आनंद नगर-१, मजरेवाडी) हा स्वतःचे फारुख किराणा या लहान दुकानामध्ये नायलॉन मांजा विक्री करीत होता. त्याच्या विरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाने नॉयलॉन मांजा विक्री करणे व वापरण्यास निर्बंध घातले असून कोणीही नायलॉन मांजाचा वापर करू नये अथवा बेकायदेशीरपणे विक्री करू नये. तसेच विमानतळाचे प्रतिबंधित क्षेत्रात कोणीही पतंग उडवू नये अन्यथा संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. कारवाई झाल्यास संबंधित व्यक्तीस पाच वर्षापर्यंत कैद व एक लाख रूपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते. असे पोलिसांकडून प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## प्रहारच्या १२ कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर -**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पोस्टरला टमाटे व दगड फेकून मारून घोषणाबाजी करणाऱ्या प्रहारच्या १२ कार्यकर्त्यांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सलीम मंगलसाब सय्यद (वय ४२, रा. शास्त्री नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अजित कुलकर्णी, खालीद मणियार, अकीब नाईकवाडी, माजिद पटेल, मुजाहिद सय्यद, जुबेर फुलारी, हजरत खान व इतर ४ ते ५ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

४ नोव्हेंबर रोजी दुपारी संगमेश्वर कॉलेजच्या भिंतीलगत प्रहार जनशक्ती पक्षाचे सोलापूर कार्यकारिणीचे पदाधिकारी अजित कुलकर्णी व इतरांनी बेकायदा जमाव जमवून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पोस्टरला टमाटे व दगड फेकून मारून अपमानित केले. तसेच विरोधात घोषणाबाजी केली. म्हणून याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत.

# जिल्ह्यातील १२ नगरपालिकेच्या १५२ प्रभागात ४ लाख ४३ हजार ६०५ मतदार

### २ डिसेंबरला मतदान आणि ३ डिसेंबरला मतमोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकांची घोषणा केली. पहिल्या टप्प्यात राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुकीची घोषणा झाली आहे. या निवडणुकीत सोलापुरातील १२ नगरपालिकांतील १५२ प्रभागात ४ लाख ४३ हजार ६०५ मतदार नव्या कारभाऱ्यांचा फैसला करणार आहेत. यासाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे आणि दुसऱ्या दिवशी ३ डिसेंबर २०२५ रोजी लगेच मतमोजणी होणार आहे.

मोठ्या प्रतिक्षेनंतर महाराष्ट्रात नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणूक जाहीर झाली आहे. राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींसाठी एकाच वेळी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. नगर परिषदा आणि नगरपंचायतीनुसार मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात किती ठिकाणी मतदान होणार याबद्दल निवडणूक आयोगाने जाहीर केलं आहे. सोलापुरातील १२ नगरपालिकांची मतदारांची स्थिती पाहिली तर बार्शी नगरपरिषद २१ प्रभाग आणि १०९००७ इतके मतदार आहेत. तर पंढरपूर १८-९४५५९, अक्कलकोट १२-३८४६२, अकलूज १३-३४४०६, मैदर्गी १०-१२४७६, दुधनी १०-१०९०५, करमाळा १०-२२११६, कुर्डुवाडी १०-२३७९१, मंगळवेढा १०-२८७३८, सांगोला ११-३३६९८, मोहोळ १०-२४४१३, अनगर १७-११०३४ अशा एकूण १२ नगरपालिकांतील १५२ प्रभागात ४ लाख ४३ हजार ६०५ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या निवडणुकीतही अनेकजण आपले नशीब अजमावणार आहेत.



### नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी महत्त्वाच्या तारखा

अर्ज-१० नोव्हेंबरपासून अर्ज भरण्यास सुरुवात आणि १७ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करता येणार, अर्जांची छाननी १८ नोव्हेंबर २०२५, अर्ज मागे घेण्याची मुदत २१ नोव्हेंबर २०२५, अपिल असलेल्या ठिकाणी अर्ज मागे घेण्याची मुदत २५ नोव्हेंबर २०२५, निवडणूक चिन्ह २६ नोव्हेंबर २०२५, मतदान - २ डिसेंबर २०२५ आणि मतमोजणी - ३ डिसेंबर २०२५

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२५९

**तुका म्हणे मोक्ष भक्ताचिया मना ।
नये ही वासना त्यांची करी ।।**

इच्छा, आशा, अपेक्षेच्या पूर्तीसाठी माणूस रात्रंदिन धडपडत असतो. त्याची ही धडपड योग्य मार्गाने असेल तर त्याला इच्छित प्राप्त होते सुध्दा पण बरेच लोक चुकीच्या मार्गानेही इच्छीत प्राप्त करतात. योग्य मार्गाने प्राप्त केलेले इच्छित सर्वांसाठी सुखदायी असते. पण अयोग्य मार्गाने साध्य केलेले इच्छित केवळ साध्य करणा-यासाठी तेवढ्या वेळेपुरते सुखकारक असते आणि त्याच्यासह इतरांसाठी मात्र ते कायमस्वरुपी दु:खदायी असते. संसारात असे अनेक लोक आहेत की जे कसल्याही आशा, अपेक्षा न करता केवळ वाट्याला आलेले कर्म, कर्तव्य व जबाबदारी म्हणून नीतीनियमपूर्वक तडीस नेत असतात. आपणाला या कार्यातून विशेष लाभ व्हावा, आपला उदोउदो व्हावा, स्वार्थ साधला जावा, असा कसलाही हेतू न ठेवता म्हणजेच फलेच्छारहीत होऊन कार्य करणारे लोक खऱ्या अर्थाने सुखी असतात. हे लोक सुख, समाधानाच्या मागे लागत नाहीत तर उलट सुख, समाधानच यांच्या मागे लागते. आई-वडीलांना दैवत मानणाऱ्या, सर्व जीवात एका ईश्वराच्या अंशाला पाहून समत्व जोपासणाऱ्या व अहंकाररहित होऊन कर्तव्यपूर्ती करणाऱ्या भक्ताला मोक्षाचे काही वाटत नाही. आपणाला मोक्ष प्राप्त व्हावा अशी स्वप्नातही आशा न बाळगणाऱ्या



भक्तांच्या मागे स्वत: मोक्षच लागतो. अशांचा सहवास मोक्षालाही मोक्ष देऊ शकतो. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, **तुका म्हणे मोक्ष भक्ताचिया मना । नये हे वासना त्यांची करी ।।**

धन, संपत्ती, सत्ता आदिच्या उपलब्धतेला सुख, मोक्ष मानणारा संसारी जीव खऱ्या मोक्षाची परिभाषा समजू शकत नाही. धन, संपत्ती, सत्ता आदिमध्येच खरे सुख, खरा मोक्ष असल्याचे मानणा-या जीवाची मानसिकता सदैव अस्थिर असते. आहे त्या नाशवंत उपलब्धतेमध्ये वरचेवर वाढ करण्यात असा जीव सुख मानतो. नाशवंत किंवा भौतिक सुखाच्या मागे लागलेला माणूस मानसिकदृष्ट्या स्थिर होऊ शकत नाही. त्याची ही अस्थिरता त्याला त्याच्या खऱ्या परिचयापासून दूर नेते. जो माणूस स्वत:पासून दूर जातो तो मोक्षाच्या जवळ जाण्याचा किंवा इतर जीवमात्राला आपले म्हणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

ज्याला सर्व जीवमात्र एका ईश्वराचे अंश वाटतात, त्याला समता, बंधूता, निस्वार्थ प्रेम, कर्तव्याची वेगळ्या प्रकारे आठवण द्यावी लागत नाही. अशा जीवाला मोक्ष प्राप्तीसाठी वेगळे कांही करावे लागत नाही. अशांना मोक्षाशी कांही देणे घेणे नसते. संसारात अडकलेला व नाशवंत देहाला मी समजणारा जीव मात्र प्रत्येक गोष्टीत, घटनेत देवाण-घेवाण करतो. त्याची ही देवाण-घेवाण मरेपर्यंत संपत नाही. अशांना मोक्ष तर सोडाच पण खरे सुखही मिळत नाही. त्यामुळे आपल्याकडून योग्य तेच घडेल याकडे लक्ष असणे योग्य होईल. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| दि. ७ नोव्हेंबर २०२५ | दिनविशेष - |
| विक्रम संवत् २०८२ | शिशु संरक्षण दिन, राष्ट्रीय |
| शके - १९४७ | कर्करोग जागरूकता दिवस |
| संवत्सर - विश्वावसु | १८७५ : 'वंदे मातरम्', |
| मास - कार्तिक कृ. २ | भारतमातेचे वर्णन करणारे |
| ऋतु - वर्षा | गीत बंकिमचंद्र यादावचंद्र |
| नक्षत्र- रोहिणी (२४.३३) | चटर्जी यांनी लिहिले. |
| योग - परिघ (२२.२७) | १८७९ : वासुदेव बळवंत |
| करण - वणिज (२१.१६) | फडके यांना जन्मठेप शिक्षा |
| ....राहू काल.... | ठोठवण्यात आली. |



## २५४ पूरग्रस्तांना मेडिकल कॉलेज कर्मचारी पतसंस्थेतर्फे अन्नधान्य स्वरूपात मदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर -**

सोलापूर जिल्हयात सीना नदीच्या पुरामुळे व अतिवृष्टीमुळे शेतकरीवर्ग, नागरीक यांचे अतोनात नुकसान झाले आहे. सदर बाधीत लोकांना मदतीचा हात म्हणून डॉ.व्ही.एम.मेडिकल कॉलेज कर्मचारी पतसंस्था मर्या, सोलापूर यांनी संस्थेचा २५-२६ या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित विविध कार्यक्रम करण्यासाठी निधी जमा केलेला होता त्यातून सुमारे दीड लाख रुपयांच्या निधीचा काही भाग हा संस्थेच्या वतीने मोहोळ तालुक्यातील सीना नदीलगतच्या शिरापूर, पिरटाकळी, शिंगोली येथील बाधीत कुटुंबीयाना तसेच वाडया वस्त्यावरील कुटुंबीयाना जीवनाश्यक वस्तु तांदुळ, तुरदाळ, तेल, मिठ, तिकट यांचे २५४ किट घरोघरी जाऊन वाटप करण्यात आले. सदर वाटप कार्यक्रम संस्थेचे व्हा.चेअरमन श्री.बंडगर, सचिव श्री.फुटाणे, संचालक श्री.माशाळ, राऊळ, जेष्ट सभासद श्री.शिंगाडे व संस्थेचे कर्मचारी यांनी पुर्ण केले आहे.

# टीईटी परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी आर्थिक देवाणघेवाण?

### शिक्षकांनी सावध राहण्याचे शिक्षण विभागाचे आवाहन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

शिक्षकांची नोकरी टिकविण्यासाठी व शिक्षक नोकरी लागण्यासाठी सर्व शिक्षकांना टीईटी म्हणजेच शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे टीईटी परीक्षा शिक्षकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळे नोकरी टिकवायची असेल आणि उतारवयात म्हणजे ५२ वर्षांच्या आतील शिक्षक असल्यास त्यांना टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे भावी शिक्षकांसह निवृत्तीच्या उंबरठ्यावर असणारे सर्व शिक्षक सध्या चिंताग्रस्त आहेत. त्यामुळे उत्तीर्ण करण्यासाठी दीड ते दोन लाख रुपये मागणी करीत असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे टीईटी परीक्षेत गैरप्रकार होण्याची शक्यता वर्तविली जात असल्याने टीईटी परीक्षा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

राज्यातील शैक्षणिक दर्जा सुधारावा, यासाठी उच्च न्यायालयाने ५२ वर्षांच्या आतील सर्व शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक केले आहे. मात्र, या निर्णयास शिक्षक व शिक्षक संघटनांमधून तीव्र विरोध होत असून, टीईटी परीक्षा रद्द करावी, अशी मागणी होत आहे. परंतु हे प्रकरण न्यायालयाकडून आल्याने सरकारकडून कोणतेही ठोस भूमिका घेण्यात आली नाही. त्यामुळे राज्यातील सर्व शिक्षकांना टीईटी परीक्षा द्यावी लागणार आहे. या गोष्टीचा फायदा एजंटाकडून घेण्यात येत असून, टीईटी परीक्षा उत्तीर्ण करुन देणार असल्याचे सागत पैशाची मागणी शिक्षकांकडे करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत टीईटी परीक्षा सुरळीत व पारदर्शक पध्दतीने घेण्याबाबत सूचना करण्यात आले आहेत.

त्यामुळे शिक्षण विभाग ॲक्शन मोडवर आहे. तरी पण टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी शिक्षक नवीन शक्कल लढवित आहेत. त्यामुळे शिक्षकांना कोणत्याही परीस्थितीत परीक्षा उत्तीर्ण व्हावेच लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणाऱ्या शिक्षकांवर करो या मरोची वेळ आली आहे.

**शिक्षण विभागाने लक्ष देण्याची गरज**

अडीच महिन्यांपूर्वी झालेल्या टीईटी परीक्षेच्या निकालावर अनेक शिक्षक व परीक्षार्थींनी आश्चर्य व्यक्त केले होते. शिवाय अनेक हुशार शिक्षक व परीक्षार्थींना अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याने नाराजीही व्यक्त केले हाते. त्यामुळे या निकालावर संशय व्यक्त करण्यात येत होते. त्यामुळे टीईटीच्या परीक्षांवर शिक्षण विभागाने विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगण्यात येत आहे.

**तुरूंगाची हवा खावी लागेल**

टीईटी परीक्षा अतिशय पारदर्शक व सीसी टीव्ही कॅमेराच्या नियंत्रणाखाली होणार आहे. पुणे परीक्षा मंडळाच्या कार्यालयात परीक्षा केंद्रातील घडामोडी दिसणार आहेत. त्यामुळे शिक्षकांनी बोगस परीक्षार्थी बसविण्याचें विचारही करू नये. शिक्षकांबरोबर बोगस परीक्षार्थीवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रात जाताना परीक्षार्थींचे मुखावलोकावन करण्यात येणार आहे. त्यामुळे शिक्षकांनी अशा एजंटापासून सवाध राहावे. अन्यथा परीथार्थी व एजंट या दोघांनाही तुरूंगाची हवा खावी लागेल.

**-सचिन जगताप,** माध्यमिक शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद सोलापूर

## माध्यमिक शिक्षण विभागाला मिळाले दोन उपशिक्षणाधिकारी

### शिक्षकांची कामे गतीने होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

मागील काही वर्षापासून रिक्त असलेल्या पदावर शासनाने पदोन्नतीने उपशिक्षणा धिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. त्यासंदर्भातील शासन निर्णय ४ नोव्हेंबर २०२५ रोजी अवर सचिव सिद्धार्थ घोरपडे यांच्या सहीने प्रसिद्ध झाले आहे.

महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट ब मधील उपशिक्षणाधिकारी व व तत्सम या संवर्गात मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१७ अन्वये शिफारस प्राप्त ३३ उमेदवारांना पदोन्नती देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील ३३ जणांना उपशिक्षणाधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. त्यातील तिघांची पदोन्नती सोलापुरात करण्यात आली आहे. प्रकाश ईश्वरराव नांगरे व सुरेश भानुदास वाघमारे यांची जिल्हा परिषदेच्या माध्यमिक उपशिक्षणाधिकारी पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. ३० दिवसांच्या आत पदोन्नतीच्या पदावर रुजू व्हावे, तसेच संबंधित अधिकारी पदोन्नतीच्या ठिकाणी रुजू झाल्याबाबतचा अहवाल आयुक्त (शिक्षण) यांनी शासनास सादर करावा, असे अवर सचिव सिद्धार्थ

**माध्यमिक शिक्षण विभागाचा कारभार सुरळीत अन् वेगाने**

बऱ्याच महिन्यांपासून माध्यमिक शिक्षण विभागातील उपशिक्षणाधिकारी पदाची दोन पदे रिक्त होती. त्यावर दोघांची नियुक्ती झाल्याने आता माध्यमिक शिक्षण विभागाचा कारभार आणखीन सुरळीत अन् वेगाने होणार आहे. ते अधिकारी रुजू झाल्यानंतर कामांचे वाटप होईल.

**-सचिन जगताप,** माध्यमिक शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद सोलापूर.

## स्वयंचलित वाहन सुरक्षेसाठी अभिनव संशोधन

### डॉ. बब्रुवान सोळुंके यांना पीएच.डी.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**



येथील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. बब्रुवान रामराव सोळुंके यांना ''ऑब्जेक्ट डिटेक्शन यूजिंग नोव्हेल मशीन लर्निंग अल्गोरिदम्स फॉर ॲडव्हान्स्ड ड्रायव्हिंग असिस्टन्स सिस्टीम'' या विषयावरील संशोधनासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

स्वयंचलित वाहनांच्या सुरक्षिततेसाठी विकसित केलेल्या त्यांच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणालीमुळे रस्त्यावर दिसणारे वाहन, पादचारी, प्राणी व सिग्नल यांचे अचूक ओळख आणि वर्गीकरण करून अपघात टाळणे शक्य होते. त्यांनी ''रॅट स्वार्म हेनरी गॅस सोल्युबिलिटी ऑप्टिमायझेशन प्रशिक्षित डीप क्वांटम न्युरल नेटवर्क'' ही अभिनव पद्धत विकसित केली असून ती कमी प्रकाश, धुके व गर्दीतही प्रभावी ठरते. डॉ. सोळुंके यांचे संशोधन हे स्वयंचलित वाहन सुरक्षा तंत्रज्ञानातील मोलाचे योगदान ठरले असून आणि सोलापूरच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानास्पद आहे.

या यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, प्राचार्य डॉ. विजय आठवले, मार्गदर्शक डॉ. सचिन गेंगजे आणि सीएसई विभागप्रमुख डॉ. अनिता पुजार यांनी अभिनंदन करून त्यांच्या संशोधनवृत्तीचे कौतुक केले.

## अल्पसंख्याक शाळा अनुदानासाठी प्रस्ताव दाखल करा

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार २०२५-२६ या वर्षासाठी धार्मिक अल्पसंख्याकबहुल शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका, नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेअंतर्गत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचाविण्यासाठी व धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनासोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शासन निर्णयातील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पात्र संस्थांनी परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन शाखा यांच्याकडे १४ नोव्हेंबर २०२५ पूर्वी सादर करावेत. असे आवाहन जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी दिलीप पवार यांनी केले आहे.

## ड्रीम फाउंडेशनला शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कार; सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**



सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कार हा ड्रीम फाउंडेशन संस्थेला प्रदान करण्यात आला. संस्थापक काशीनाथ भतगुणकी यांनी सहकुटुंब हा सन्मान स्वीकारला. महात्मा बसवेश्वर समता, मन्मथ माऊली यांचे अध्यात्मिक गुरु, राष्ट्रसंत सिद्ध शिवाचार्य महास्वामी यांचे राष्ट्र उभारणी कार्यातून लोकांनी प्रेरणा घ्यावेत असे आवाहन सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले.

शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ठ सेवाधारी संस्था पुरस्कार व विविध क्षेत्रातील मान्यवरांचे पुरस्कार सोहळा श्रीक्षेत्र कपिलधार येथे बुधवार सहकार मंत्री ना बाळासाहेब पाटील, डॉ अर्चना पाटील चाकुरकर व शिवा संघटना राष्ट्रीय अध्यक्ष प्रा मनोहर धोंडे आदींच्या हस्ते वितरण करण्यात आले. याप्रसंगी ड्रीम फाउंडेशनच्या सचिवा संगीता पाटील, मार्गदर्शक गजरा, गुरूषंत, सुरेश वाघमोडे, गीता वाघमोडे, बसवराज भतगुणकीसह ड्रीम फाउंडेशन पदाधिकारी उपस्थित होते.

ड्रीम फाउंडेशन मागील २० वर्ष पासून विविध सामाजिक उपक्रम राबवित आहे ग्रामीण भागातील युवकांना स्पर्धा परीक्षा व करियर मार्गदर्शन, युवा कौशल्य विकास, महिलांना भाकरी उद्योग, पर्यावरण जागर उपक्रम,जल साक्षरता संमेलन, सेंद्रिय शेती मार्गदर्शन, विविध विषयावर प्रबोधन व्याख्यान व युवा जागृती उपक्रम राबविले जाते श्री. भतगुणकी यांनी सोलापूर ते दिल्ली सायकल प्रवास करून युवा जागृती केले असून ग्रामीण भागातील युवकांना ते महात्मा बसवेश्वर यांचे समतेचे विचार व विविध महापुरू यांचे प्रेरणादायी विचार लोकांना व्याख्यानद्वारे देत आहेत हे कार्य कौतुकास्पद असल्याचे सहकार मंत्री पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष अभ्यराव कल्लावर, सचिव उमाकांत शेटे, शिवानंद सारणे, अरविंद भाडोळे पाटील, जिल्हा अध्यक्ष शरणरराज केंगनाळकर, महांतेश पाटील, शिवा मावळे उपस्थित होते.



## विश्व हिंदू परिषदेच्या समरसता आयामतर्फे श्री गुरुनानक देवजी यांना आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ नोव्हेंबर -**

शीख समाजाचे संस्थापक, श्रद्धास्थान पूज्य श्री गुरुनानक देवजी यांचा ५५६ वी जयंती निमित्ताने, अंत्रोळीकर नगर, सोलापूर येथील गुरुद्वारा येथे विश्व हिंदू परिषद समरसता आयाम तर्फे आदरांजली वाहण्यात आली.

या प्रसंगी विश्व हिंदू परिषदचे जिल्हा मंत्री संजय जमादार, विभाग सह मंत्री विजयकुमार पिसे, धर्माचार्य संपर्क प्रांत सह प्रमुख नागनाथ अण्णा बोंगरगे, बजरंग दल सह संयोजक अभय कुलथे , जिल्हा विशेष संपर्क प्रमुख प्रवीण जिल्ला , जिल्हा प्रमुख समरसता आयाम चंद्रकांत कुलकर्णी यासह पंढरपूर येथील समरसता प्रांत टोळी सदस्य रविंद्र साळे, मातृशक्ति प्रांत टोळी सदस्य मालतीताई गंभीर, दुर्गावाहिनी विभाग संयोजिका प्रगती नाकुरे, जिल्हा सह मंत्री गोपाळ सुरवसे, सेवा विभाग जिल्हा प्रमुख संभाजी राव मडके, मंगळवेढा प्रखंड पालक दत्तात्रय ताम्हणकर, दुर्गावहिणी अकलूज प्रखंड संयोजिका वैष्णवी वाघमारे तसेच मातृशक्तीचे राणी अदि्लंग आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

शीख समाजाचे ज्येष्ठ प्रमुख रमेश सिंहजी, प्रदीप सिंहजी यांनी सर्वांचे स्वागत केले आणि सर्वांना धार्मिक पुस्तक देवून आशीर्वाद दिले. सर्वांनी लंगर मधील प्रसाद ग्रहण करून श्री गुरुनानक देव जी चे आशीर्वाद घेतले.

## खड्डेमय रस्त्यांवरुन आता जबाबदारीच्या वाटेवर !

### भरपाईमुळे व्यवस्थेच्या जबाबदारीत, प्रामाणिकपणात पडलेला खड्डा बुजणार


सोलापूरसह संपूर्ण महाराष्ट्रातील रस्त्यांची अवस्था बघून कोणालाही प्रश्न पडावा की लाखो रुपये खर्च होऊनही काही दिवसांतच हे रस्ते खड्डेमय का होतात? वर्षानुवर्षे ''दुरुस्ती'', ''डांबरीकरण'', ''काम चालू आहे'' या नावाखाली जनतेच्या सहनशीलतेची कसोटी लागते. शेवटी या खड्ड्यांमुळे होणारे अपघात, मृत्यू आणि अपंगत्व ही आपली रोजची बातमी बनली आहे. पण आता परिस्थिती बदलणार आहे. कारण मुंबई उच्च न्यायालयाने या गंभीर प्रश्नावर ऐतिहासिक निर्णय देत संबंधित अधिकारी, अभियंते आणि ठेकेदारांना थेट जबाबदार धरण्याचे निर्देश दिले आहेत.त्यामुळे आता खड्डे पडले की जबाबदारी ठरली.

मुंबई उच्च न्यायालय पीआयएल (क्र.७१ / २०१३) विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर यामध्ये आयए (क्र. २९११९ / २०१३) सिद्धार्थ सोनाजी इंगळे विरुद्ध हायकोर्ट ऑन इट्स ऑन मोशन अँड ऑदर या याचिकेमध्ये दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या संदर्भातील आदेश पारित केले आहे. हे आदेश संबंधित सर्व प्रशासन आस्थापना यांना प्राप्त झाल्यानंतर सोलापूर महापालिका विधान सल्लागार कार्यालयातील विधी अधिकारी यांनी या संदर्भात महापालिकेच्या प्रभारी नगर अभियंता यांना अवगत केले आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ही याचिका दाखल झाली होती. रस्त्यांवर खड्डे पडणे आता महाग पडणार आहे. अपघातात मृत्यू किंवा जखमी झाल्यास भरपाई वसूल होणार आहे.

या आदेशानुसार रस्त्यावर खड्डे किंवा उघड्या मॅनहोलमुळे अपघात होऊन एखाद्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसांना सहा लाख रुपये भरपाई दिली जाणार आहे. तर अपघातात जखमी झाल्यास ५० हजार ते अडीच लाख रुपये इतकी रक्कम दुखापतीच्या गंभीरतेनुसार मिळणार आहे. ही भरपाई कुणाकडून येणार? तर थेट संबंधित विभागांकडून म्हणजेच महापालिका, एमएमआरडीए, पीडब्ल्यूडी, म्हाडा, एनएचआय यांसारख्या संस्थांकडून. विशेष म्हणजे, ही रक्कम अखेर ''जनतेच्या करातून'' नव्हे, तर दोषी ठेकेदार आणि निष्काळजी अधिकाऱ्यांकडून वसूल केली जाणार आहे.

या संदर्भात भरपाई समित्या स्थापन करण्याचेही आदेश न्यायालयाने दिले आहेत. महानगरपालिकेच्या हद्दीत आयुक्त आणि जिल्हा कायदेशीर सेवा प्राधिकरण सचिव असतील, तर नगरपरिषदेच्या हद्दीत मुख्याधिकारी आणि सचिव यांचा सहभाग असेल. या समित्यांनी दर पंधरवड्याला बैठक घेऊन अपघातग्रस्त प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा असे निर्देश देण्यात आले आहेत. म्हणजेच ''फाइल पुढे सरकतेय'' या प्रशासनिक बहाण्यांना आता जागा उरलेली नाही.

खड्ड्यांमुळे एखादे जीवन संपले, एखादा तरुण कायमचा अपंग झाला आणि प्रशासन म्हणते ''कंत्राटदाराला सांगितले आहे'' ही सवय मोडण्यासाठीच न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. आता प्रत्येक खड्डा म्हणजे एक संभाव्य जबाबदारी ठरवली गेली आहे. ४८ तासांच्या आत तक्रारीवर




कार्यवाही न केल्यास अधिकारी आणि ठेकेदारांवर शिस्तभंग व फौजदारी कारवाई होऊ शकते.

रस्त्यांची अवस्था ही फक्त अभियांत्रिकीची चूक नसून ती ''टक्केवारी संस्कृती''चे परिणाम आहे. ठेकेदारी व्यवहारातील भ्रष्ट साखळ्या, निकृष्ट दर्जाचे साहित्य आणि नियंत्रणाच्या अभावामुळेच दर्जा घसरतो. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची प्रणालीच हवा. आता न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार जर खरोखर वसुली आणि कारवाई झाली, तरच या निर्णयाचे महत्त्व अधोरेखित होईल. अन्यथा, कागदावर समित्या स्थापन होतील, बैठकींचे अहवाल तयार होतील आणि रस्ते मात्र पुन्हा खड्ड्यांनी भरतील. खड्ड्यांवर खडी टाकण्यापेक्षा जबाबदारीवर शिक्कामोर्तब करणे आवश्यक आहे. कारण खड्डा फक्त रस्त्यावर नसतो. तो व्यवस्थेच्या जबाबदारीत, प्रामाणिकपणात आणि संवेदनशीलतेत पडतो. उच्च न्यायालयाने आता तो खड्डा बुजवण्यासाठी जनतेच्या बाजूने ठोस पाऊल उचलले आहे.आता खड्डे पडले की रस्ता नव्हे, जबाबदारीच कोसळेल ! हा निर्णय जनतेसाठी आशेचा किरण आहे पण त्याची अंमलबजावणीच खरी परीक्षा ठरणार आहे.

## महत्वाचे...



### कोंढेजचे एपीआय शिवाजी ननवरे यांची 'इंडिया बुक'मध्ये नोंद

**करमाळा, दि.५ नोव्हेंबर-**

करमाळा तालुक्यातील कोंढेज या छोट्याशा गावातील सुपुत्र आणि सध्या नागपूर शहर पोलिस दलात सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले शिवाजी लक्ष्मण ननवरे यांनी हिमालयातील चार सर्वोच्च शिखरे सर करून अभूतपूर्व कामगिरी केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय पर्वतारोहण पराक्रमाची नोंद 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स २०२५' मध्ये करण्यात आली आहे. एपीआय ननवरे यांनी जगातील सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्ट (८८४८.८६ मीटर) सोबतच मकालू (८४८५ मी.), मनासलू (८१६३ मी.) आणि लोहसे (८५१६ मी.) ही चारही ८,००० मीटरपेक्षा अधिक उंचीची शिखरे यशस्वीरीत्या सर केली आहेत. ही दुर्मीळ आणि धाडसी मोहीम पार करणारे ते देशातील एकमेव पोलीस अधिकारी आहेत. आयुक्त रवींद्र कुमार सिंगल (भा.पो.से.), सह आयुक्त नवीन चंद्र रेड्डी, अप्पर पोलीस आयुक्त रवींद्र सिंग परदेशी, पोलीस उपायुक्त राहुल माकणीकर, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. अभिजीत पाटील, तसेच सामाजिक सुरक्षा विभागाचे पोलीस निरीक्षक राहुल शिरे यांनी त्यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले. या कामगिरीबद्दल राष्ट्रीय समाज पक्षाचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते यांनी एपीआय ननवरे यांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या पराक्रमामुळे महाराष्ट्र पोलिस दलासह नागपूर पोलिसांचे नाव भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकले आहे.

### विहिंपच्या जिल्हा प्रसिध्दी प्रमुखपदी अमोल डोळसे

**वैराग, दि.५ नोव्हेंबर-**



वैराग येथील विश्व हिंदू परिषदचे कार्यकर्ते अमोल डोळसे यांची सोलापूर शिवस्मारक येथे झालेल्या विहिंपच्या बैठकीत विहिंप जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी निवड करण्यात आली सदरची निवड ही विहिंप केंद्रीय सहमंत्री तथा सत्संग प्रमुख दादा वेदक, प्रांत सहमंत्री विजयकुमार पिसे, पश्चिम महाराष्ट्र सहमंत्री नितीन वाटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवड करण्यात आली, डोळसे यांनी आतापर्यंत केलेल्या विहिंपच्या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे या बैठकीस विभाग मंत्री जयदेव सुरवसे, जिल्हा मंत्री संजय जमादार, जिल्हा सहामंत्री बापुराव कदम बजरंग दल सोलापूर शहर प्रमुख प्रमोद यलगंटी,वैराग प्रखंड मंत्री श्रीकांत काशिद या सह बजरंग दल, धर्मप्रसार, दुर्गावाहिनी, मातृशक्ती चे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




### बार्शी बसस्थानकात प्रवासी महिलेचे १ लाख ४२ हजार रुपये किमतीचे दागिने लंपास

**बार्शी, दि.५ नोव्हेंबर-**

बार्शी बसस्थानकासमोर प्रवासादरम्यान एका महिलेची सोन्याचे दागिने असलेली पर्स अज्ञात इसमाने चोरुन नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी हिना वाहिद मासुलदार (वय ३४, रा. पारगे नगर, कोंडवा, ता. हवेली, जि. पुणे) यांनी बार्शी पोलिसांकडे फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादी हिना मासुलदार या आपल्या पती, सासरच्या मंडळी व दोन मुलांसह पुण्यात वास्तव्यास असून त्यांच्या पतीचे हार्डवेअरचे दुकान आहे. त्या दिवाळी सुटीसाठी माहेर तेर-ढोकी (ता. जि. धाराशिव) येथे गेल्या होत्या. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसहा-सातच्या सुमारास त्या आपल्या दोन मुलांसह व बहिणी मुस्कान अब्दुल्ला मासुलदार यांच्यासह श्रीगणेश ट्रॅव्हल्सच्या बसने पुण्याला निघाल्या.बस तेरढोकी-धाराशिव-बार्शी मार्गे पुण्याकडे जात असताना बार्शी बसस्थानकासमोर आल्यानंतर हिनांनी आपली मोठी पर्स पाहिली असता, त्यात ठेवलेली सोन्याचे दागिने असलेली छोटी पर्स गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. अज्ञात इसमाने त्यांची पर्स चोरुन नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.चोरीस गेलेल्या दागिन्यांची किंमत एकूण सुमारे १ लाख ४२ हजार रुपये असून त्यात खालील दागिने होते सोन्याचा राणी हार (१९ ग्रॅम), गलसर हार (११ ग्रॅम), डिझाईन अंगठी (३ ग्रॅम), सोन्याचे टॉप्स (४ ग्रॅम) असा ऐवज लंपास केला आहे. याप्रकरणी बार्शी पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.



### ओन्ली संस्थेतर्फे नूतन मुख्याधिकारी तैमुर मुलाणी यांचे स्वागत

**बार्शी, दि.६ नोव्हेंबर**

ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शीच्यावतीने बार्शीचे नूतन मुख्याधिकारी तैमूर मुलाणी यांचे बार्शी नगरपालिका बार्शी येथे सत्कार करुन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यमान मुख्याधिकारी तथा प्रशासक बाळासाहेब चव्हाण यांचे उपायुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका येथे प्रमोशन झाल्याबद्दल त्यांचे संस्थेच्या वतीने सत्कार करुन हार्दिक अभिनंदन केले. चव्हाण यांनी बार्शी नगरपालिकेचे कामकाज अतिशय छान केलेले होते. त्याचबरोबर बार्शीचा विकास करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल वाणी, सचिव अजय तिवारी, महिला तालुकाध्यक्ष सायरा मुल्ला हे उपस्थित होते.

# पिलीव गट सर्वसाधारण झाल्याने इच्छुकांची भाऊगर्दी

## ● निरा-देवधर, माचणूर उपविभागाचा पाणीप्रश्न निवडणुकीत ठरणार कळीचा मुद्दा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ६ नोव्हेंबर-**

आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींचा लवकरच बिगुल वाजणार आहे. यामध्ये पिलीव जिल्ह्य परिषद गट सर्वसाधारण झाल्यामुळे इच्छुकांची भाऊगर्दी झाली असुन ही निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याचे संकेत दिसून येत आहेत.



पिलीव जिल्ह्य परिषद गटात भाजपप्रणीत महायुती व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातच निवडणूक होण्याचे चिन्ह आहे. या दोन्ही गटाकडून निवडणूक लढविण्यास अनेकजण इच्छुक आहेत. माळशिरस तालुक्यात नव्याने नगरपरिषद व नगरपंचायती झाल्यामुळे जिल्ह्य परिषद व पंचायत समिती गटाची व गणांची पुनर्रचना झाली आहे. पण पिलीव जिल्ह्य परिषद गट याला अपवाद आहे. कारण २०१७ साली झालेला पिलीव जिल्ह्य परिषद गट आहे तसाच राहीला आहे. पिलीव व तांदुळवाडी या दोन्ही पंचायत समीती गणातील गावांमध्ये कसलाही बदल झालेला नाही. यामुळे उमेदवारांना प्रचार करणे सोपे जाणार आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीपासून तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलली आहेत कारण एकमेकांचे पारंपरिक व कट्टर राजकीय विरोधक असणारे मोहिते-पाटील व उत्तमराव जानकर हे दोन्ही गट एकत्र आले आहेत. यामध्ये मोहिते-पाटील यांना खासदारकी तर जानकरांना आमदारकी मिळाली पण सध्याच्या जिल्ह्य परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत दोन्ही गटाच्या उमेदवारांना न्याय मिळणार का? तिकीट मिळाले नाही तर बंडखोरी वाढणार का? असा प्रश्न आहे. भाजपनेही या जिल्ह्य परिषद गटात जोरदार पाय रोवले आहेत. अनेक दिग्गजांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. यामध्ये पिलीव जिल्ह्य परिषद गटाचे माजी जिल्ह्य परिषद सदस्य गणेश पाटील, पिलीवचे लोकनियुक्त माजी सरपंच नितीन मोहीते, मळोलीचे माजी उपसरपंच चंद्रकांत जाधव यांचा पुर्ण गट, फळवणीचे माजी सरपंच सचिन पाटील यांचा गट, शिंगोर्णी येथील मोठा गट, कोळेगाव येथील अनेक नेते यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. यामुळे या गटात भाजपची मोठी ताकद वाढली आहे.

पिलीव जिल्ह्य परिषद गट सर्वसाधारण पुरूषांसाठी आरक्षित झाल्यामुळे जोरदार चुरस आहे. तर पिलीव पंचायत समीती गण हा सर्व साधारण महिलेसाठी आरक्षित आहे व तांदुळवाडी पंचायत समीती गण ओबीसी महिलेसाठी आरक्षित आहे. यामुळेच या जिल्ह्य परिषद गटातील लढती रंगतदार होणार आहेत. यामध्ये तिकीटाची लॉटरी कोणाला लागते याकडे लक्ष लागले आहे.

**जिल्हा परिषद गटातील चर्चेतील मुद्दे :** सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी या कायमस्वरुपी दुष्काळी पट्ट्यातील गावांचा निरा-देवधर च्या योजनेत समावेश करावा अशी मागणी आहे. तर माचणुर उपविभागातील मळोली, तांदुळवाडी, कोळेगाव, फळवणी, शेंडेचिच या गावांचा बारमाही योजनेत समावेश तसेच कोळेगाव या गावातील बंधारे, तलाव पाण्याने भरून द्यावेत ही मुख्य मागणी या भागातील नागरिकांची आहे.

**माचणुर उपविभागातील पाण्याचा प्रश्न भाजपच्या पथ्यावर :** माचणुर उपविभागातील पाण्याचा प्रश्न माजी आमदार रामभाऊ सातपुतें यांनी मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासमवेत शेतकऱ्यांची बैठक लावुन सोडविला आहे. हा निर्णय निवडणुकीत भाजपच्या पथ्यावर पडणार आहे हे निश्चित आहे.

**गटातील जातीय समीकरण :** पिलीव जिल्ह्य परिषद गटाची मतदारसंख्या सुमारे ३७ हजार आहे. यामध्ये सुमारे १४ हजार मराठा समाज, ८ हजार धनगर समाज व इतर सर्व समाज सुमारे १५ हजार आहे. यामुळे या जिल्ह्य परिषद गटात मराठा समाजाचे वर्चस्व आहे.

**संभाव्य इच्छुक उमेदवार :** माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील, माजी पंचायत समीती सदस्य रणजीत बापु जाधव, माजी सरपंच अमोल मदने, अरविंद जाधव, अँड विजय पवार, शिवराज पुकळे, के.के. पाटील, दादा मुंजे, शहाजी महाडीक, सचिन पाटील, नितीन सावंत, चंद्रकांत जाधव, धनंजय दुपडे, राहुल मदने हे उमेदवार जि.प. इच्छुक आहेत.

**पिलीव जि.प. गटातील गावे :** पिलीव पंचायत समिती गण : पिलीव, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, कोळेगाव, तांदुळवाडी पंचायत समिती गण : तांदुळवाडी, मळोली, फळवणी, काळमवाडी, साळमुख.



## लोकसभेचे उपनेते गौरव गोगाई, पृथ्वीराज साठेंचे सोलापुरात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

आसामचे अबोर लोकसभा मतदारसंघाचे खासदार तसेच काँग्रेसचे लोकसभेतील उपनेते गौरव गोगोई व काँग्रेसचे सचिव पृथ्वीराज साठे यांचे सोलापूरमध्ये आगमन झाल्यावर शहर व जिल्हा काँग्रेसकडून स्वागत करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करून स्वागत करण्यात आले.

गौरव गोगोई हे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. अभ्यासू खासदार म्हणून त्यांची ख्याती आहे. सोलापुरात आगमन झाल्यानंतर शहर व जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी त्यांनी संवाद साधला. त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ समाधी मठ, मंदिर व अन्नछत्र मंडळ येथे दर्शन घेतले. श्री स्वामी समर्थ मंदिरात व अन्नछत्र मंडळात गौरव गोगोई व पृथ्वीराज साठे यांचा मंदिर समिती व अन्नछत्र मंडळातर्फे सन्मान व सत्कार करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, अक्कलकोट तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, अरुण जाधव, अशपाक बळोरगी, माजी नगरसेवक विनोद भोसले, युवक काँग्रेसचे गणेश डोंगरे, मीडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला, देवा गायकवाड, बसवराज म्हेत्रे, शंकर नरोटे, रुपेश गायकवाड, सुभाष वाघमारे, सुनील सारंगी, रोहित शटगर, संजय गायकवाड, सागर उबाळे, अनिल जाधव, निशांत कवडे, मुस्तफा बाळोरगी, दिगंबर मेटकरी, सौरभ साळुंखे, सुनील गुप्ता ,बापू वाघमोडे, शरण आलोळी आदि उपस्थित होते.

### फॅबटेकमध्ये होणार आंतरराष्ट्रीय परिषद

**सांगोला, दि.६ नोव्हेंबर -**

फॅब्टेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथे प्रथमच दि.२३ व २४ डिसेंबर रोजी इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ब्रेक थ्रू टेक्नॉलॉजीज फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

यामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण कल्पना यांची भुमिका स्पष्ट होईल. जगातील तज्ञ संशोधक सहभागी होणार आहेत. ही परिषद फॅब्टेकच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ.रविंद्र शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. परिषदेला बोर्ड ऑफ रिसर्च इन न्यूक्लिअर सायन्स (बीआरएनएस) कडून २ लाख निधी मंजूर केल्याचे उपप्राचार्या डॉ.विद्याराणी क्षीरसागर यांनी दिली.

## भाजपाचे चंद्रकांत इंगळे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

### जेऊर गटातून 'तुतारी' द्वारे फुंकणार रणशिंग



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तालुक्याचे आंबेडकर चळवळीतील नेते, पंचायत समितीचे माजी सभापती तथा भाजपाचे माजी जिल्हा कोषाध्यक्ष चंद्रकांत इंगळे यांनी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षात प्रवेश केला आहे.

जेऊर जिल्हा परिषद मतदार संघातून त्यांनी निवडणुकीचे रणसिंग फुंकल्याने तालुक्यात राजकीय चर्चा रंगली आहे. श्री इंगळे यांनी जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख व कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष बंदे नवाज कोरबू यांच्या नेतृत्वाखाली हा प्रवेश केला.

भाजपाची जेऊर गटात उमेदवारी मिळत नसल्याचा अंदाज आल्याने त्यांनी हा निर्णय घेतला.

मी गेल्या अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीत जिल्हा कोषाध्यक्ष म्हणून कार्यरत होतो.आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ता असल्याने मी स्वाभिमानी आहे. माझ्या स्वार्थासाठी अथवा पैशासाठी इकडून तिकडे करत खोटे नाटे बोलण्याची मला सवय नाही. यामुळे मला भाजपा मध्ये नेहमी दुय्यम स्थान मिळत आहे. फोन केले तर फोन घेणे टाळत आहेत. कार्यालयात व घरी भेटायला गेल्यावर भेट घेण्याचे टाळत आहेत. जनतेचे काम घेऊन गेल्यावर विचारत नाहीत. बोलत नाहीत अशा ठिकाणी राहून जनतेचा विकास कसा साधायचा म्हणून मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश केला आहे.

**- चंद्रकांत इंगळे,**
माजी सभापती व भाजपाचे माजी जिल्हा कोषाध्यक्ष.

## वळसंगमध्ये स्वामी भक्तांना प्रसादाचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग,दि.६ नोव्हेंबर-**



वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथे त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त पुणे आणि अनेक गावाहून येणाऱ्या स्वामी समर्थ भक्तांना वळसंग नागरिकाकडून जेवणाची व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. श्री शंकरलिंग मंदिरात लिंगराज दुधगी, रमेश दुधगी, श्री शांकरलिंग तरुण मंडळ यांच्याकडून तर श्री सिद्धेश्वर मंदिरात श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटी, श्री सिद्धेश्वर प्रतिष्ठान कडून रात्री जेवणाची व्यवस्था करण्यात आली. स्वामी भक्तांनी पहाटे स्नान करून अक्कलकोट कडे रवाना होत असताना सकाळची नाश्ता,चहाची व्यवस्था राज ऑटोमोबाईल्स असोसिएशनचे अध्यक्ष नागराज कोंडे, योगेश चनशेट्टी, सिध्दाराम सुरपुरे, पंचाक्षरी स्वामी, सलीम तांबोळी, प्रशांत देगाव, विश्वनाथ भूसणगी, सुरज चनशेट्टी, बंडू शिरासंगी, देवेंद्र शिंदे व इतर मंडळातून करण्यात आले.

## शनिवारपासून पंढरपूर-पखालपूर एसटी धावणार

**पंढरपूर :** अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या मागणीप्रमाणे प्रत्येक संकष्टी चतुर्थीला श्रीक्षेत्र पखालपूरला जाण्यासाठी पंढरपूर आगारातून जुने एसटी स्टँड येथून शनिवार दि.८ नोव्हेंबर पासून सकाळी ७ पासून एसटी बसेसची सोय करण्यात आल्याचे जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी सांगितले. प्रवाशांनी लभा घेण्याचे आवाहन आगार प्रमुख योगेश लिंगायत, स्थानक प्रमुख अंकुश सरगर, ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल, सदस्य विनोद भरते, सुभाष सरदेशमुख,जिल्हा सचिव सुहास निकते, उपाध्यक्ष विनय उपाध्ये, पांडुरंग अल्लापूरकर, तालुका उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, महेश भोसले, सदस्य सागर शिंदे, अंकुश वाघमारे, संभाजी लंगोटे, आझाद अल्लापूरकर सतिश निपाणकर यांनी केले आहे.

# शिवरायांचा पुतळा संतभूमीच्या वैभवस्फूर्तीचे प्रतिक

## ● चेअरमन संजय आवताडे : मंगळवेढ्यात छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.५ नोव्हेंबर-**

छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा हे मंगळवेढा संतभूमिच्या वैभवस्फूर्तीचे ऐतिहासिक प्रतीक असल्याचे प्रतिपादन आवताडे शुगर्सचे चेअरमन संजय आवताडे यांनी केले. शिवप्रेमी चौक मंगळवेढा येथे अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पूर्णाकृती पुतळ्याचे ऐतिहासिक लोकार्पण तमाम शिवप्रेमींच्या उपस्थितीत मंगळवार दि. ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. लोककल्याणाचा ध्यास, न्यायीपणा, सर्व धर्मांचा आदर करणारे लोकोत्तर शासक छत्रपती शिवरायांचा दुरदर्शीपणा, शौर्य आणि राष्ट्रभक्तीचा आदर्श येणाऱ्या कित्येक पिढ्यांसाठी आदर्श आहे. त्यांच्या प्रेरणेने आणि स्फुर्तीने आपण सदैव कार्यरत राहू अशी भावना उद्योजक संजय आवताडे यांनी यावेळी व्यक्त केली.

मंगळवेढा संत भूमीमध्ये छत्रपतींच्या तेजस्वी,अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण होताच वातावरण जय भवानी जय शिवाजी या घोषणांनी आसमंत अक्षरश:दुमदुमून गेला होता. प्रत्येक शिवप्रेमींमध्ये उत्साह, अभिमान आणि एकतेचा अपूर्व असा माहोल यावेळी पाहायला मिळाला. इंग्लिश स्कूलच्या उपप्राचार्या तेजस्विनी कदम यांनी दामाजी चौकातून महिला पुरुष व विदयार्थ्यांनी भगवे फेटे परिधान करून भव्य रॅली काढली. श्रीराम फाऊंडेशनच्या सुप्रिया जगताप यांनीही महिलांची भगवा फेटे रॅली काढली. यावेळी दामाजी शुगर्सचे माजी व्हा.चेअरमन रामचंद्र वाकडे, सकल मराठा समाज जिल्हा समन्वयक माऊली पवार, धनश्री व सिताराम परिवाराचे संस्थापक प्रा.शिवाजीराव काळुंगे, जकराया शुगर्सचे संस्थापक चेअरमन अॅड.बी.बी.जाधव, भैरवनाथ शुगर्सचे चेअरमन अनिल सावंत, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, युटोपियन शुगर्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, विठ्ठल शुगर्सचे माजी चेअरमन भगिरथ भालके, डी.व्ही. पी.उदयोग समुहाचे अध्यक्ष अमर पाटील, माजी नगराध्यक्षा अरूणा माळी, शिवसेना माजी तालुका प्रमुख प्रा.येताळा भगत आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी व्हा.चेअरमन बबनराव आवताडे, अॅड. नंदकुमार पवार, रतनचंद शहा बँकेचे माजी व्हा.चेअरमन रामचंद्र जगताप, अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण, जिजामाता परिवाराचे संस्थापक रामकृष्ण नागणे, श्री दामाजी संस्थेचे अध्यक्ष विष्णूपंत आवताडे, पुतळा सोहळा समितीचे अध्यक्ष अजीत जगताप, युटोपियन शुगर्सचे कार्यकारी संचालक रोहन परिचारक, शिरोळ नगरपरिषदेचे प्रशासक निशिकांत प्रचंडराव, दामाजीचे संचालक मुरलीधर दत्तू, औदुंबर वाडदेकर, भारत बेदरे, गौरीशंकर बुरुकूल, माजी संचालक राजेंद्र सुरवसे, शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ.प्रियदर्शनी कदम, संचालिका उपप्राचार्या तेजस्विनी कदम, मुर्तीकार महेंद्र थोपटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, शिवाजीराव वाकडे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडुभैरी, माजी उपनगराध्यक्ष मच्छिंद्र कोंडूभैरी, मुरलीधर दत्तू, चंद्रकांत घुले, माजी नगरसेवक दत्तात्रय यादव, प्रविण खवतोडे, विठ्ठल शुगर्सचे संचालक सचिन पाटील, विठ्ठल घुले, शिवाजीराव मोटे, संतोष रंदवे यांचेसह पुतळा समितीचे सर्व सदस्य, शहर व तालुक्यातील शिवप्रेमी, उपस्थित होते. दानशूर व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. अजीत जगताप यांनी प्रास्तविक केले. संतोष मिसाळ व भारत मुढे यांनी सुत्रसंचालन केले. सचिव राहूल सावंजी यांनी आभार मानले.





- या सोहळ्याच्या निमित्ताने ध्येयमंत्राचे पठण करण्यात आले.
- पुतळ्याच्या सभोवताली असणाऱ्या सुशोभिकरणासाठी आमदार समाधान आवताडे यांनी भरीव निधी दिल्याबद्दल त्यांचे यावेळी सर्व शिवप्रेमींनी आभार मानले. सोहळ्याचे नियोजन ही त्यांच्याकडेच होते.
- राजनंदिनी चेळेकर हिला मिळालेले खाऊचे पैसे तिने जमा करून ठेवलेली जी रक्कम होती ती रक्कम पुतळ्यासाठी देणगी म्हणून दिल्याबद्दल सत्कार यावेळी करण्यात आला.
- सकल मराठा समाजाचे नेते माऊली पवार हे मंचावर आले व त्यांनी मनोज जरांगे पाटील यांना फोन लावला व त्यांच्या शुभेच्छा शिवप्रेमींना ऐकवल्या.
- शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. सुजित कदम, डॉ.सुभाष कदम, डॉ. मिनाक्षी कदम, तेजस्विनी कदम, प्रियदर्शनी कदम- महाडिक यांच्या संकल्पनेतून इंग्लिश स्कूल मधून शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक, सर्व कर्मचारी या सर्वांची भगवा फेटा रॅली मंगळवेढ्यातून काढण्यात आली.
- या सोहळ्याच्या निमित्ताने ढोल-ताशे, हलगी, देखावे सादर करण्यात आले.
- या कार्यक्रमात भव्य रांगोळी साकारण्यात आली होती.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विठ्ठल भक्तांकडून मंदिर समितीला संगणकासह साऊंड सिस्टीम भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.६ नोव्हेंबर -**

पुणे येथील अनिलभाई भन्साली यांनी आहुजा कंपनीचे विद्युत साहित्य व साउंड सिस्टम, तसेच नितीन वरघडे (पुणे) यांनी संगणक साहित्य श्री विठ्ठल चरणी देणगी स्वरूपात अर्पण केले आहे.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने भाविकांच्या सेवेसाठी सतत विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याच पार्श्वभूमीवर ही देणगी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या सदस्य निगडे मॅडम यांच्या उपस्थितीत स्वीकारण्यात आली. या देणगी वस्तूंचा उपयोग मंदिर प्रशासनाच्या कार्यात व भाविकांच्या सेवेसाठी करण्यात येणार आहे.

समितीच्या वतीने दोन्ही देणगीदारांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले असून, त्यांच्या या भक्तिपूर्ण कार्याला श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची कृपा लाभो, अशी शुभेच्छा व्यक्त करण्यात आली आहे.







### महत्त्वाचे




## कुंभारीत आमदार कल्याणशेट्टी यांच्या वाढदिनी शिबिरात १२७ जणांचे रक्तदान

**वळसंग,दि.६ नोव्हेंबर-**

कुंभारी (ता.द.सोलापूर) येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त डीके मित्रपरिवार तसेच महादेव शिंदेबांदे मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिबिरात १२७ जणांनी रक्तदान केले. यावेळी भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार यांनीही सहभाग घेत रक्तदान केले. शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी डीके मित्रपरिवार व महादेव शिंदेबांदे मित्रपरिवार यांच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर सर्व रक्तदात्यांचा सत्कार करण्यात आला. सर्व आयोजक, रक्तदाते आणि कार्यकर्त्यांचे युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार यांनी अभिनंदन केले.

## बार्शीत टॅम्पोतून ४ लाखांची साऊंड सिस्टीम चोरी

**बार्शी, दि.६ नोव्हेंबर**

शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील संभाजी नगर परिसरात उभी असलेल्या टॅम्पोतून तब्बल ४ लाख १० हजार रुपयांची साऊंड सिस्टीमची उपकरणे चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी आकाश नागनाथ मस्के (वय ३२, रा. संभाजीनगर, बार्शी) यांनी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी आकाश मस्के हे साऊंड सिस्टीमचा व्यवसाय करतात. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांनी आपल्या व्यवसायासाठी रेड कलर बास अँप्लिफायर, क्रॉसओव्हर, मिक्सर मॉडेल,मीडिया प्लेअर व साऊंड वायरिंग अशी एकूण ४ लाख १० हजार रुपयांची उपकरणे घेतली होती. ही सर्व साऊंड सिस्टीमची यंत्रे त्यांनी आपल्या टेम्पो एम एच ४३ इ ४९८९ मध्ये ठेवून ती आदर्श गारमेंटच्या पाठीमागे लॉक करुन पार्क केली होती. दि. २६ ऑक्टोबर रोजी टॅम्पो बंद करुन ते घरी गेले होते. दरम्यान, दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी टेम्पो स्वच्छ करण्यासाठी गेल्यावर त्यांना डाव्या बाजूचे लॉक फेट्याने बांधलेले व दरवाजा उघडा दिसला. तपासल्यावर साऊंड सिस्टीममधील सात यंत्रे चोरीस गेल्याचे आढळले. फिर्यादीने आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला, मात्र चोरीस गेलेली उपकरणे सापडली नाहीत. त्यामुळे त्यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. चोरी गेलेल्या साहीत्यांची एकूण किंमत सुमारे ४ लाख १० हजार इतकी असून, चोरी गेलेले साहित्य मिळाल्यास फिर्यादीने ओळख पटवून देण्याची तयारी दर्शविली आहे. बार्शी शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला आहे.

## संजीवन समाधी सोहळ्यासाठी श्री पांडूरंगाच्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ नोव्हेंबर -**

श्री संत ज्ञानेश्वर संजीवन समाधी सोहळयासाठी मंदिर समितीमार्फत श्री विठ्ठलाच्या पादुका २०१४ पासून ह.भ.प. विठ्ठल महाराज वासकर यांचे पायी दिंडी सोबत आळंदी येथे नेण्यात येतात. सदरचा पालखी सोहळा कार्तिक शुध्द १५ ते मार्गशिर्ष शुध्द पौर्णिमा या कालावधीत आळंदी येथे जाऊन परत येत असतो. प्रतिवर्षीप्रमाणे या सोहळ्याचे दि. ५ नोव्हेंबर रोजी प्रस्थान झाले असल्याची माहिती प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.



कार्तिक शुध्द १५ रोजी गोपाळपूर येथे गोपाळ काला होऊन सर्व संतांच्या दिंड्या मार्गस्थ झाल्या. कार्तिकी यात्रेची सांगता झाली. परंपरेनुसार श्रींच्या पालखींची नगर प्रदक्षिणा झाली. यावेळी श्रींच्या पालखीचे अबाल, वृध्द, अनाथ, दुर्बल, भाविकांनी दर्शन घेतले. सदरचा पालखी सोहळा कार्तिक शुध्द पोर्णिमा म्हणजे दि.५ नोव्हेंबर रोजी श्रीक्षेत्र पंढरपूरहून प्रस्थान करून कार्तिक वद्य अष्टमी दि १२ नोव्हेंबर रोजी आळंदी येथे पोहचणार असून, त्यानंतर दुस-या दिवशी इंद्रायणी स्नान, पालखी प्रदक्षिणा, द्वादशी क्षिरापत व दि. १७ नोव्हेंबर रोजी श्री संत ज्ञानोबाराय संजीवन समाधी सोहळा संपन्न होत आहे.

पालखी सोहळा प्रस्थानावेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख-जळगांवकर, सोहळा मार्गदर्शक तथा सदस्य सल्लागार परिषद ह.भ.प. विठ्ठल महाराज वासकर, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते.

सदरचा पालखी सोहळा मार्गशिर्ष शु. नवमी दि. २९ नोव्हेंबर रोजी श्रीक्षेत्र पंढरपूरला परत येत आहे. या पालखी सोहळ्याच्या पायी मार्गावर आवश्यक त्या सोई सुविधा उपलब्ध करून देणेबाबत कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित प्रशासकीय अधिकारी यांना पत्रव्यवहार करून सोई सुविधा उपलब्ध करून घेण्यात येत आहेत.

याशिवाय पालखी सोहळा संपर्क प्रमुखपदी मेघराज महाराज वळके-पाटील (मो०८८३०२१७३१२) नियुक्ती करून जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच या पालखी सोहळ्यासोबत पौराहित्य करणारे कर्मचारी पूर्णवेळ उपस्थित राहणार असल्याचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी यावेळी सांगीतले.

## अखेर अकरा वर्षीय बालकाच्या हातात पादुका देत महाद्वारकाला उत्साहात

### हरिदास कुटूंबाने सुरू ठेवली परंपरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ नोव्हेंबर -**

मागील अकरा पिढ्यापासून सुरू असलेली महाद्वार काल्याची परंपरा यंदा हरिदास कुटुंबात घडलेल्या अघटीत घटनेमुळे खंडित होणार का ? असा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र हरिदास कुटुंबातील अकरा वर्षीय बालकाच्या हातामध्ये श्री विठ्ठलाच्या पादुका देत काल्याची परंपरा साजरी करण्यात आली.

आषाढी व कार्तिकी वारीमध्ये हरिदास व नामदास घराण्याच्या वतीने महाद्वार काला करण्याची परंपरा आहे. संत पांडुरंग महाराज हरिदास यांना प्रत्यक्ष श्री विठ्ठलाने दिलेल्या पादुका मस्तकावर धारण करून महाद्वार काला करण्याची परंपरा आहे. दरम्यान यंदा हरिदास घराण्यातील एका तरुणाचे अचानक हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्यामुळे महाद्वार काला साजरा होणार का असा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र जवळपास ४०० वर्षाची परंपरा खंडित न करण्याचा निर्णय हरिदास, पुजारी व संत नामदेव महाराजांचे वंशज नामदास महाराज यांनी घेतला. त्यानुसार मदन महाराज हरिदास यांचे अकरा वर्षाचे नातू





अमोघ याच्या गळ्यात पागोटे व हातात पादुका देण्यात आल्या. नामदास महाराज यांनी अमोघ हरिदास यास खांद्यावर घेऊन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पाच प्रदक्षिणा, दहीहंडी फोडणे.यानंतर चंद्रभागेच्या वाळवंटात पादुकास नदी स्नान, माहेश्वरी धर्मशाळा, आराध्ये गल्ली, हरिदास वेस येथे दहीहंडी फोडून काला करण्यात आला.

## लिहून घ्या..! मंगळवेढा नगरपालिकेचा नगराध्यक्ष भाजपचाच

### जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण : प्रदेशकडून अधिकृत 'एबी' फॉर्म मिळाले

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ६ नोव्हेंबर**

मंगळवेढा-पंढरपूर मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे हे भाजपचे आमदार असल्यामुळे मंगळवेढा नगरपालिकेचा नगराध्यक्ष सुध्दा भाजपचाच असणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी केले.



जिल्ह्यातील पंढरपूर, मंगळवेढा, अक्कलकोट, अनगर, दुधनी, मोहोळ, मैंदर्गी या नगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार निश्चितीनंतर त्यांना पक्षाचा एबी फॉर्म देण्याची जबाबदारी जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांच्यावर देण्यात आली. सध्या जिल्ह्याच्या राजकारणामध्ये सर्वच पक्षाकडे राजकीय उठबस कायम राहावी या दृष्टिकोनातून अनेकांनी आघाडीवर निवडणुका लढवण्याचा पर्याय शोधून ठेवला होता. मात्र सगळ्यात अगोदर जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी सोलापूर लोकसभा निवडणुकीच्या पराभवानंतर पक्ष वाढीसाठी त्यांच्या निवडीनंतर नेटाने काम सुरू केले. जिल्ह्यात पक्ष वाढवण्याची जबाबदारी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सचिन कल्याणशेट्टी ,आ. देवेंद्र कोठे, आ. सुभाष देशमुख,आ. विजयकुमार देशमुख, आ. समाधान आवताडे यांच्याबरोबर शशिकांत चव्हाण यांनी घेतले असून सध्या जिल्ह्यात अनेकांना भारतीय जनता पार्टीत प्रवेश करून भाजप मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. अशा परिस्थितीत येणाऱ्या निवडणुका पक्ष चिन्हावर लढवण्याच्या दृष्टीने त्यांनी आपली भूमिका यापूर्वी स्पष्ट केली आहे. त्यामुळे सध्या एबी फार्म देण्याची जबाबदारी त्यांच्यावर आल्यामुळे सध्या जिल्ह्यात उमेदवार निवडी बरोबर निवडून येण्याची शाश्वती असणाऱ्यांना पक्षाची उमेदवारी दिली जाणार आहे. त्यामुळे सध्या जिल्हाध्यक्ष चव्हाण यांची भूमिका यामध्ये निर्णायक ठरणार आहे. आज त्या संदर्भातील एबी फॉर्म भाजप प्रदेश समन्वयक सुधीर देऊळगावकर, प्रदेश चिटणीस आ.विक्रम पाटील तसेच प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांच्याकडे सुपूर्द केले.

## पांडुरंग कारखान्यातर्फे ऊस वाहतुक वाहनांना रिफ्लेक्टर वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ६ नोव्हेंबर-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास उसाचा पुरवठा होत असलेल्य ट्रक, ट्रॅक्टर, बजाट या वाहनांना अकलूज विभागाचे उप-विभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके व अकलूज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नीरज उबाळे यांचे हस्ते व कारखान्याचे संचालक तानाजी वाघमोडे, बाळासो यलमर, शामराव साळुंखे व कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या उपस्थितीत रिप्लेक्टर लावण्यात आले.



याप्रसंगी उप-विभागीय पोलीस अधिकारी वाळके यांनी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांना विना-अपघात वाहन चालवणेबाबत सुचना करत महाराष्ट्र राज्याच्या वाहन कायदयामध्ये सुधारणा झाली असून यात अपघात होऊन सुद्धा ड्रायव्हरने त्या अपघाग्रस्त व्यक्तीकडे दुर्लक्ष करून निघून गेल्यास त्याच्यावर कडक कायदेशिर कारवाई करण्यात येत आहे. तरी सर्व वाहन चालकांनी याची नोंद घेऊन आपल्या वाहनांमुळे इतर कोणालाही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी असे सांगितले. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ.कुलकर्णी यांनी वाहन चालकांनी रस्त्यावरून वाहन चालवीत असताना टेप रेकॉर्डर लावू नये. मोबाईलवर बोलू नये. तसेच दुसऱ्या वाहनास ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करू नये. पाठीमागून व समोरुन येणाऱ्या वाहनाबरोबर अपघात होणार नाही याची खबरदारी घेणेचे आवाहन केले.

याप्रसंगी कारखान्याचे प्रोडक्शन मॅनेजर एम.आर. कुलकर्णी, केन मॅनेजर एस.सी. कुमठेकर, चीफ अकौंटंट आर.एम. काकडे, वैद्यकीय अधिकारी डॉ . सुधीर पोफळे, वर्क्स मॅनेजर ए.डी. बारटक्के, चीफ इंजिनियर एस. एस.विभुते, शेती अधिकारी एस.पी. भालेकर, सिव्हील इंजीनिअर एच एस.नागणे, कॉम्प्युटर इन्चार्ज टी.एस.भोसले, कार्यालयीन अधीक्षक बी.एस.बाबर, पर्यावरण अधिकारी सचिन ताम्हाणे, केन यार्ड सुपरवायझर राहुल साठे आदी उपस्थित होते.

## करमाळ्यात उडीद खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू : बागल

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.६ नोव्हेंबर-**

एनसीसीएफ नाफेड मार्फत उडीद, मुग, सोयाबीन खरेदी सुरू करण्यासाठी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन तर्फे करमाळा तालुक्यासाठी श्री विठ्ठल सर्वसाधारण सहकारी संस्थेस खरेदी केंद्र मंजूर झाले असल्याची माहिती श्री विठ्ठल सर्वसाधारण सहकारी संस्थेचे सचिव सुजित बागल यांनी दिली.

ज्या शेतकऱ्यांना या कडधान्याची विक्री करावयाची आहे अशा शेतकऱ्यांनी सन २०२५-२६ ची पिकाची नोंदणी असलेला सातबारा उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक, आठ अ आदी कागदपत्रे घेऊन संस्थेच्या करमाळा मार्केट कमिटीच्या आवारातील डीसीसी बँकेचे शेजारील कार्यालयात आपली कागदपत्रे घेऊन नोंदणी करावी असे आवाहन श्री.बागल यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संस्थेचे व्यवस्थापक अजिनाथ मोरे (मो.नं. ९४२१० २३२९६) वर संपर्क करावा असे आवाहन श्री बागल यांनी केले आहे.

## श्रवण भक्ती श्रेष्ठ म्हणून भागवत कथेस महत्व

### गोपाल महाराज कारखेलकर : श्रीपूर येथे श्रीमद्भागवत कथेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.६ नोव्हेंबर**

कलियुगाचा विचार केल्यास श्रवण भक्ति श्रेष्ठ मानली आहे. भवतापापासून मुक्ती मिळण्यासाठी भागवत कथा महत्वाची आहे म्हणून तिचे श्रवण केले पाहिजे असे प्रतिपादन श्रीमद्भागवत कथाकार गोपाल महाराज कारखेलकर यांनी केले.

श्रीपूर येथील चंद्रशेखर विद्यालयाच्या प्रांगणावर भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याप्रसंगी प्रथम पुष्प गुंफताना ते निरूपण प्रसंगी बोलत होते. सुरुवातीस कारखेलकर महाराज यांनी या ठीकाणी भागवत कथेस दहा वर्ष पूर्ण झाली आहेत. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज व अन्य साधू संतांच्या पालख्या या मार्गावरून जातात परमात्मा पांडुरंगाचे अधिष्ठान लाभलेला हा भाग म्हणूनच कोरोना सारख्या महामारीतही या ठीकाणी भागवत सप्ताह मोठ्या उत्साहात पार पडला हे मोठे भाग्य असल्याचे सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, भगवंताला काय प्रिय आहे हे आपल्या थोर साधू संतानी आपणांस सांगितले आहे. त्याप्रमाणे भाव व लक्ष एकत्र होणे म्हणजेच भक्ति होय. मनाला कामादी विकारापासून आवरणे, विषयाच्या चिंतनातून मुक्ती देणे, साधूंचा संग, श्रीमद्भागवत कथेचे श्रवण व भगवंताचे नाम घेणे, कठोर वचनांचा त्याग, पूर्वग्रह



दुषीतता, वस्तू व संपत्तीचा अधिक संग्रह न करणे म्हणजेच भक्ति होय. यातूनच जीवन समाधानी होते असे सांगितले. महाळुंग-श्रीपूर पंचायत समितीचे माजी सदस्य अनिल जाधव व मित्र मंडळाच्या वतीने बुधवार दि. ५ नोव्हेंबर (त्रिपुरारी पोर्णिमा ) ते मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ असे भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. अनिल जाधव ,अनिल मुंडफणे, अजित पोखरे, भानूदास पिसाळ, राजकुमार काळेल, उद्योजक संदीप घाडगे, नितीन जाधव, सतीश लांडगे, नितीन मिस्कर, सुरेश पवार, प्रशांत घाडगे, दादा पवार, प्रितम मांडवे परिश्रम घेत आहेत.

## आ. अभिजीत पाटील यांना मुख्यमंत्र्यांचा आशीर्वाद

### आमदार प्रविण दरेकर : श्री विठ्ठल कारखान्याच्या पहिल्या ५ साखर पोत्यांचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ नोव्हेंबर -**

श्री.विठ्ठल सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रातील साखर कारखानदारीचे वैभव आहे. मध्यंतरी कारखान्याला लागलेली घरघर आ. अभिजीत पाटील यांनी थांबवली. कारखान्याच्या व सभासदांच्या रक्षणासाठी त्यांनी उडी घेतली. त्यांच्या नेतृत्वावर तुम्ही सर्वांनी विश्वास ठेवला व कारखान्याचे नेतृत्व त्यांच्याकडे दिलेत. कारखानदारीशी संबंध नसतानाही केवळ तुमच्याविषयी प्रामाणिक संवेदना होती म्हणून हा कारखाना आज प्रगतीकडे जाताना दिसत आहे. आमदार पाटील यांना मुख्यमंत्री फडणवीस यांचा आशिर्वाद असल्याचे प्रतिपादन भाजपा गटनेते व महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयंसमूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांनी केले.

#### आ.पाटील यांना विठ्ठलच पावला

यावेळी बोलताना दरेकर म्हणाले, आ. अभिजीत पाटील यांना विठ्ठल एवढा पावला कि विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष होत असताना विधिमंडळाच्या सभागृहात येण्याची संधी तुम्ही त्यांना दिली.



#### मुंबई बँक आ.पाटील यांच्या मागे ताकदीने उभी आहे

दरेकर म्हणाले, मुंबई जिल्हा बँकेचे मुंबई हे कार्यक्षेत्र आहे. परंतु ग्रामीण भागातील कारखाने अडचणीत आले तर त्या कारखान्यांना ताकद देण्याचे, उर्जितावस्थेत आणण्यासाठी मदत आम्ही करतो. पण धाडसाने कारखाना अडचणीतून बाहेर काढण्याचे काम आ.अभिजीत पाटील यांनी केले. त्यामुळे मुंबई बँक त्यांच्या मागे ताकदीने उभी असल्याची ग्वाही देखील यावेळी आपण देत असल्याचे आ.दरेकर यांनी सांगितले.

#### आ.अभिजीत पाटील शेतकऱ्यांना ताकद देणारे नेते

दरेकर म्हणाले कि, आ.अभिजीत पाटील यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आशीर्वाद दिलाय. ते कुठल्या पक्षाचे आहेत त्यापेक्षा शेतकऱ्याला ताकद देत असून असा होतकरू तरुण ताकदीने मैदानात उभा आहे तर त्याला ताकद दिली पाहिजे या भावनेतून आम्ही सर्वजण विठ्ठल कारखान्याच्या सभासद आणि संचालक मंडळासोबत आहोत. जो लोकांच्या भल्याची चिंता करतो, जो आपल्या राज्याच्या विकासासाठी हातभार लावणारा प्रकल्प हिमतीने यशस्वी करत असेल तर त्याला ताकद देणे, त्याच्या पाठीशी उभे राहणे हे आमचे कर्तव्य आहे. भविष्यातही पाटील शेतकऱ्यांसाठी जे प्रकल्प हाती घेतील त्यासाठी मी आणि मुख्यमंत्री त्यांच्या मागे असेच उभे राहू, असा विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला.

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ सुरू असलेल्या गळीत हंगामातील पहिल्या ५ साखर पोत्यांचे पूजन आमदार दरेकर, त्यांच्या सुविद्य पत्नी सायली दरेकर, डॉ. यश दरेकर व त्यांच्या कुटुंबियांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार व कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील, संचालक संभाजी भोसले, कालिदास पाटील, दिनकर चव्हाण, बाळासाहेब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, सचिन वाघाटे, जनक भोसले, प्रविण कोळेकर, नवनाथ नाईकनवरे, दत्तात्रय नरसाळे, सिताराम गवळी, अशोक जाधव, सिध्देश्वर बंडगर, महेश खटके, विठ्ठल रणदिवे, दशरथ जाधव, अशोक तोंडले, अंगद चिखलकर, अशोक घाडगे, तानाजी बागल, समाधान गाजरे, धनाजी खरात, उमेश मोरे, गणेश ननवरे, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी वर्ग, कार्यकर्ते, सभासद व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकारी संचालक डी. आर. गायकवाड यांनी आभार मानले.